म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ६६४




REFBK-0069875

# राजा शिव छत्रपती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे



REFBK-0009875

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.

## भाग पहिला : जन्म आणि पूर्वस्थिति

चित्रकार  ‖ रा. दलाल
मुद्रण  ‖ आनंद
प्रकाशन  ‖ राजहंस

मूल्य रु. तीन फक्त  ‖ सर्वाधिकार स्वाधीन

प्रकाशक : ब. मो. पुरंदरे, राजहंस प्रकाशन, १५०० सदाशिव, पुणें २.
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २४४७६ वि. चारित्र
क्रमांक ४६४ नों: दि: १२-२-५०

## : : भूमिका : :

इ. स. १९२० सालापासून महाराष्ट्रांतच नव्हे, तर साऱ्या भारतवर्षांतच इतिहासविषयाच्या अध्ययनाला व ऐतिहासिक लिखाणाला ओहोटी लागल्याचें आपणांस दिसून येईल. कै. वि. का. राजवाडे आणि खरेशास्त्री यांनी निर्माण केलेली इतिहाससंशोधकांची परंपरा, त्यांच्या पुढच्याच पिढीच्या अखेरीस जवळजवळ लुप्तच झालेली आहे. कै. राजवाडे–खरे यांच्यानंतर श्री. दत्तोपंत आपटे, श्री. स. ग. जोशी, श्री. कृ. वा. पुरंदरे, श्री. पां. न. पटवर्धन, श्री. शं. श्री. देव, श्री. स. म. दिवेकर, श्री. द. बा. पारसनीस, म. म. द. वा. पोतदार, डॉ. य. खु. देशपांडे, डॉ. गो. स. सरदेसाई, श्री. शं. ना. जोशी, श्री. ग. ह. खरे वगैरे अतिशय निष्ठावंत व गाढ संशोधक-विद्वानांनी संशोधनकार्य चालू ठेवलें हें खरें. परंतु या दुसऱ्या पिढीनंतर तिसरी पिढी कोणत्या व किती संशोधकांची —की जी सुमारें इ. स. १९२५ पासून इ. स. १९५० पर्यंतच्या कालखंडाची वारस म्हणून दाखवितां येईल? आपल्याला असें स्पष्ट दिसून येईल की, हा प्रवाह कमी कमी होत आला असून आता चौथ्या पिढींत तर इतिहास-संशोधकांच्या व अभ्यासकांच्या आखाड्यांत जवळजवळ शुकशुकाटच आहे! यवतमाळच्या संशोधन-मंडळाला (शारदाश्रम) कुलूप लागलें आहे. धुळ्याच्या राजवाडे संशोधक मंडळाची व समर्थ-वाग्देवता-मंदिराची स्थितीहि एकखांबी तंबूसारखीच दिसून येते. वरील थोर संशोधकांच्या यादींतील हयात असलेली मंडळी सत्तरीच्या आगेमागे येऊन पोहोचलेली आहेत. या कार्यांत नवीन भर नाही. नवें रक्त नाही. अनुभव असा येतो आहे की, ग्रंथालयांतील ग्रंथ धूळ झटकली जाण्याइतकेहि हाताळले जात नाहीत. नवीन कागदपत्रें मिळविणें तर दूरच राहो, पण वरील मंडळींनी मिळवून

ठेवलेल्या कागदांना निष्ठावंत नव्या संशोधक-अभ्यासकाचा स्पर्शहि घडत नाही. डॉक्टरेटच्या पदवीसाठी चार दिवस कागदपत्रांची उलथापालथ करणारे स्वातंत्र्ययुगांतील आमचे तरुण, पदवी मिळाल्यानंतर फक्त नोकऱ्याच करतात. इतिहास-मंडळाकडे ते पुन्हा डोकावतहि नाहीत.

संशोधकांप्रमाणेच, अभ्यासकांची आणि लेखकांचीहि वाण आहेच. हें झालें शास्त्रीय इतिहासाबद्दल. परंतु कै. हरिभाऊ आपट्यांच्या नंतर ललित लिखाणांतून इतिहासाची गोडी वाढविणारा वा टिकविणारा त्यांच्यासारखा एक तरी प्रभावी लेखक झाला काय? आजहि असा कोणी नाहीच. गडकऱ्यांचें ‘ राजसंन्यास ’ एकदा जें अपूर्ण राहिलें तें कायमचेंच ! याप्रमाणे संशोधन, इतिहासग्रंथांचें लेखन, ऐतिहासिक काव्य, नाटक, कादंबरी इत्यादि सर्वच ऐतिहासिक प्रकारांना इ. स. १९२० नंतर ओहोटी लागत गेली आणि इतिहास व ऐतिहासिक म्हणजे ‘ जुनाटपणा ’, ‘ मागासलेपणा ’ असा सर्वसाधारण शिक्का या सर्वच वाङ्मयप्रकारांवर ठोकला गेला.

या परिस्थितीला मुख्यतः दोन कारणें आहेत असें मला वाटतें. हीं कारणें, सुशिक्षितांच्या मानसिक जीवनाचा थोडा बारकाईने कानोसा घेतला तर कोणाच्याहि ध्यानीं येतील. सुशिक्षितांच्या मनावर गेल्या तीस पस्तीस वर्षांत दोन प्रमुख विचारसरणींचा प्रभाव विशेष जोरदारपणें पडलेला आहे. यांतील एका विचारसरणीचा उगम महात्मा गांधींच्या अहिंसेच्या शिकवणुकींत आहे तर दुसरीचा मार्क्सच्या समाजवादांत आहे. समाजांत आज अनेक विचारसरणींचे प्रवाह वाहात असले तरी या सर्वांचे तळ हे दोनच आहेत. दोन्हीहि विचारसरणींची प्रकृतीच अशी आहे की, त्यांना राजकीय इतिहासविषय मानवत नाही. स्वाभाविकपणेंच या दोन्हीहि विचारसांप्रदायांनी राजकीय इतिहासाची पद्धतशीर उपेक्षाच केली. गांधीजींच्या अहिंसा दर्शनामुळे मागील सर्व इतिहास घातपात व सशस्त्र संघर्षांनी भरलेला असल्यामुळे तो सर्वथैव त्याज्य आहे व इतिहासांतील शिवाजी–

प्रतापसिंह इत्यादि अनेक व्यक्ति जरी थोर असल्या तरी अहिंसेच्या युगांत आणि मार्गांत त्या व्यक्तींच्या प्रेरणा निरुपयोगी, किंबहुना घातक आहेत असा समज सुशिक्षितांच्या मनांत घर करून बसला. दुसऱ्या बाजूस मार्क्सने राजकीय संघर्ष हेच मुळीं आर्थिक संघर्षाचे दुय्यम परिणाम आहेत; खरा इतिहास म्हणजे उत्पादनसाधनांच्या विरोध-विकासाचा इतिहास; त्यांत व्यक्तीला स्थान नाही; महापुरुषांच्या प्रेरणेला स्वतंत्र असें कांहीहि मोल नाही, हा विचार मांडून गतेतिहासाबद्दल वाटणाऱ्या प्रेरक अभिमानाची सगळी वाफच सुशिक्षितांच्या मनांतून काढून घेतली. शिवाजी म्हणजे एक सरंजामशाही युगांतील राजा ( Feudal King ) असा दृष्टिकोन तयार झाल्यावर त्याविषयी अभिमान बाळगण्याचें किंवा त्याच्यापासून प्रेरणा घेण्याचें कारणच काय उरावें ?

या वादांची खोल पाण्यांत शिरून चर्चा करण्याचें हें स्थानहि नाही आणि तशी माझी इच्छाहि नाही. इतिहासाची उपेक्षा गेल्या तीस-चाळीस वर्षांत कोणत्या प्रमुख कारणांनी झाली तेवढेंच मला येथे नेमकें दाखवायचें आहे. पण आता ही परिस्थिति पालटल्याचीं कांही कांही सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. एक मोजकेंच उदाहरण मी येथे देतों. दि. २९ नोव्हेंबर १९५७ रोजीं आपले पंतप्रधान पं. नेहरू यांनी प्रतापगडावर येऊन छत्रपति शिवाजीमहाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचें अनावरण केलें तोच प्रसंग नजरेसमोर आणा. या समारंभाची मूळ प्रेरणा व संपूर्ण नियोजन सत्ताधारी गांधीवादी पक्षाने केलें होतें. उलट कांही विशिष्ट कारणासाठी या समारंभाला प्रखर विरोध करणारा जो प्रभावी पक्ष तयार झाला तो मुख्यतः मार्क्सच्या विचारधारेवर पोसला गेलेला होता. या घटनेच्या वेळीं गांधीवादी संयोजक व मार्क्सवादी विरोधक या दोघांनीहि शिवाजीच्या नांवाचा केवळ जयघोषच चालविला होता. हा प्रसंग वैचारिक संघर्षाचा होता असें मला मुळींच म्हणायचें नाही. परंतु जनतेच्या हृदयाचा कबजा घेण्याची

उभयतांनाच निकड होती आणि त्यासाठी नेमकी फुंकर कशावर घालावी हा प्रश्न जेव्हा पडला तेव्हा सर्वांनाच ‘ शिवाजी ’ हें एक ‘ जागृत देवस्थान ’ सापडलें आणि मग शिवाजीबद्दलची निष्ठा, प्रेम, भक्ति, आदर, अभिमान व्यक्त करण्यांत उभयतांमध्यें जणू कांही विलक्षण चढाओढच सुरू झाली. कालपरवापर्यंत ज्याला ‘ वाट चुकलेला देशभक्त ’ किंवा ‘ सरंजामदार ’ म्हणून उपेक्षिलें गेलें तोच आज एकदम ‘ मानबिंदु ’ होऊन बसला. एक तर केवळ तात्कालिक राजकीय डाव-प्रतिडाव खेळण्यासाठी शिवाजीचें चलनी नाणें वापरलें गेलें असेल किंवा मूलभूत प्रामाणिकपणा गृहीत धरला तर खरोखरच शिवाजीची आवश्यकता या संयोजक-विरोधकांना मनःपूर्वक पटली असेल ! पहिलें कारण असेल तर या देशाचें दुर्दैव अद्याप संपलें नाही एवढेंच म्हणतां येईल. दुसरें असेल तर त्यामागे जरा खोलांत जाऊन पाहिलें पाहिजे !

‘ शिवाजी ’ हें नांव दोघांनाहि घ्यावें लागलें याचें कारण एकच आहे की, त्याशिवाय सामर्थ्यनिर्मिति करणें त्यांना अशक्य वाटलें. ‘ शि-वा-जी ’ या तीन अक्षरांत विलक्षण जादू भरलेली आहे. जनतेच्या हृदयांत शक्तीचा, सामर्थ्याचा, पराक्रमाचा, महत्त्वाकांक्षेचा, हिरिरीचा, कर्तृत्वाचा संचार होण्याची आवश्यकता असते त्या वेळीं ‘ शिवाजी ’ हा महामंत्र उच्चारण्याशिवाय गत्यंतरच नसतें. न्या. रानडे, वासुदेव बळवंत, विष्णुशास्त्री चिपळूणकर, ज्योतिबा फुले, लो. टिळक, इतिहासाचार्य राजवाडे, चाफेकरादि क्रांतिकारक, कादंबरीकार हरिभाऊ, नाटककार गडकरी, सुभाषचंद्र बोस वगैरे निरनिराळ्या क्षेत्रांत अलौकिक कामगिरी करणाऱ्या थोर पुरुषांची व त्यांच्या चळवळींची प्रेरणा ‘ शि-वा-जी ’ या मंत्रांतच होती. सध्या व यापुढेहि ज्या ज्या वेळीं जनतेला एखाद्या प्रचंड संघर्षासाठी खडे करण्याची आवश्यकता असेल त्या त्या वेळीं अशाच प्रभावी मंत्राचा वापर कोणत्याहि विचाराच्या वा पक्षाच्या धुरीणांना

करावाच लागेल. भाकरीचीं वा पगार-भत्तावाढीचीं आंदोलनें उभीं करण्यास कदाचित् एवढी मोठी फुंकर घालावी लागणार नाही. पण विशाल राष्ट्रीय संघर्षासाठी जी चिवट, कणखर, ज्वलंत आणि रसरशीत राष्ट्रीय अस्मिता जागून उठावी लागते, ती ' शिवाजी ' यासारख्या एखाद्या समर्थ मंत्रावाचून उठणें सुतराम् अशक्य आहे. राष्ट्रव्यापी कर्तृत्व जागें करायचें असेल तर राष्ट्रीय महापुरुषांच्या पराक्रमी वीर–गाथेपासूनच प्रेरणा घेतली पाहिजे, अन्य तरणोपाय नाही.

अखेर ' राष्ट्र ' ' राष्ट्र ' म्हणजे तरी काय ? एक अविच्छिन्न व एकात्म समाजजीवनच ना ? ही एकात्मता किंवा समरसता कशी निर्माण होते ? समान ऐतिहासिक परंपरेमुळेच ना ? ही समान ऐतिहासिक परंपरा म्हणजे तरी काय ? इतिहासकालांत या समाजाच्या धारणपोषणासाठी व त्यांतल्या त्यांतहि हा समाज समूळ उध्वस्त होण्याच्या संकटांत असतां ज्यांनी आपल्या पौरुषाने त्याला वर काढलें, संरक्षिलें व समर्थ केलें अशा पराक्रमी वीरांच्या चिरंतन स्मृतीच ना ? सांगा, या चिरंतन स्मृतींशिवाय समाजाला एका सूत्रांत ठेवणारें दुसरें कोणतें बंधन मनुष्यमात्राला आजवर सापडलें आहे ? हें बंधन नाही म्हणजे राष्ट्रच नाही. फक्त उरला विस्कळीत समाज. ज्याला कोणींहि झोडपावें, कोणींहि आक्रमावें, त्यावर राज्यें करावींत, त्याची धनदौलत लुबाडावी, त्याचे लचके तोडावेत.

कोणी असें म्हणतील की, परकीय सत्तेशीं वा विरोधी शक्तींशीं झुंझायच्या वेळीं इतिहासाच्या स्मृतींना उजळा देणें आवश्यक असतें; परंतु आता स्वातंत्र्यकाळांत आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांत प्रचंड विधायक कार्यें उभीं असतां या स्मृतिजागरणाचा व सामर्थ्यसंजीवनीचा काय उपयोग ? आता शांतताकालीन विधायक मनोवृत्तीची जोपासना केली पाहिजे ! होय ! आपण म्हणतां तें बरोबरच आहे. मलाहि तें मान्य आहे. मीहि याच विचारसरणीचा पाठराखा आहें की, लढाई संपली की, आपला

दारूगोळा फुकट घालवूं नये. पण याचा अर्थ दारूच्या कोठारावर पाणी ओतून, तिकडे दुर्लक्ष करावें असा नाही ना ? इतिहासांतील सत्कृत्यांच्या व सत्पराक्रमांच्या स्मृति प्रेरणेसाठी कायमच्याच जतन करावयाच्या असतात. महायुद्धांत उध्वस्त झालेला जर्मनी, अवघ्या दहा वर्षांत जगाच्या बाजारांत पुन्हा दंड थोपटून प्रचंड सामर्थ्यानिशी उभा राहातो तो कशाच्या जोरावर ? इस्रायल-सारखें नवजात बालक-राष्ट्र दहा वर्षांतच वाळवंटांत नंदनवन फुलवून सुंदर, समृद्ध व समर्थ बनतें तें कोणत्या जादूमुळे ? आमच्या विधायक नेतृत्वाचे श्रेष्ठ आदर्श साथी जयप्रकाश नारायण यांना इस्रायलचे पंतप्रधान बेन गुरिया यांनी नुकतेंच विचारलें की, तुमच्या देशांत नवसमाज-निर्मितीसाठी सर्वस्वाचा होम करून किती तरुण खडे आहेत ? यावर साथी जयप्रकाशजींनी सांगितलें की, आज असे पांच हजार तरुण खडे आहेत. यावर बेन गुरियांनी आश्चर्याने म्हटलें की, काय ? फक्त पांचच हजार ? इतके तरुण तर आमच्या अगदी लहानशा देशांतच या कार्यासाठी बाहेर पडलेले आहेत ! तुमचा देश तर चाळीस कोटींचा, प्रचंड ! त्या मानाने ही संख्या अधिक नको काय ?

यावर जयप्रकाशजी कांहीच सांगूं शकले नाहीत.

जर्मनी, चीन, जपान, इस्रायल इत्यादींची राष्ट्रभावना, राष्ट्रीय अस्मिता जागी आहे. आमची नाही ! म्हणजे स्वातंत्र्यकाळांत, शांततेच्या काळांतहि ज्वलंत व तिखट अस्मितेची जरूरी आहे ना ? कां या देशांतील तरुणांत ती दृष्टि, ती धमक, तो पीळ, तो प्रचंड ध्येयवाद निर्माण होत नाही ? कारण, ' हें राष्ट्र माझें आहे; त्यासाठी मला महत्त्वाकांक्षेने जगलें पाहिजे, त्याचा सर्वांगांनी सर्वतोपरी विकास करण्यासाठी मला तनमनधनपूर्वक झटलें पाहिजे, ही कर्तव्यभावनाच आमच्यांत नाही. ती नाही तोंपर्यंत पंचवार्षिक योजना, धरणें, कारखाने, विकासयोजना, भरघोसपणें यशस्वी होणारहि नाहीत आणि कोणत्याच बाबतींत, प्रबळ राष्ट्र म्हणून आमची मान ताठ राहाणारहि नाही.

याचा अर्थ येतां जातां अन् उठल्या बसल्या ऐतिहासिक महापुरुषांचे उत्सव साजरे करीत आणि त्यांचे पुतळे गल्लोगल्लीं उभारीत सुटावें अन् त्यांच्या पूजेचे देव्हारे माजवावे, असा नाही. आंधळ्या उपेक्षेइतकीच ही आंधळी भगतगिरीहि घातक असते. इतिहासापासून प्रेरणा घ्यायची असते. अनुभव घ्यायचे असतात. टिळकांनी शिवाजीपासून प्रेरणा घेतली म्हणजे काय, आपल्या कचेरींतील कंपॉझिटर्सची फौज घेऊन तोरण्यावर चाल केली ? त्यांनी स्वराज्याची प्रेरणा शिवचरित्रांतून घेतली. स्वातंत्र्यकालांत कार्यांचीं क्षेत्रें व मार्ग वेगवेगळे असतील, परंतु राष्ट्रीय प्रेरणा आणि अस्मिता समानच असली पाहिजे. या समान राष्ट्रीय प्रेरणांशिवाय ‘ राष्ट्रीय चारित्र्याची घडण ’ होणें केवळ अशक्यच आहे.

सर्वच ऐतिहासिक महापुरुषांच्या व विशेषतः शिवाजीमहाराजांच्या इतिहासाची उपयोगिता, माझ्या मताने अशी आहे व त्याच दृष्टीनें मी या चरित्रांकडे पाहातों. प्रस्तुत शिवचरित्र मीं एका सूत्रान्वयें लिहिलें आहे. ‘ शिवाजी ...... एक प्रेरक शक्ति. ’ त्यानुसार शिवजीवनाचा संपूर्ण चित्रपट वाचकांपुढे मी मांडणार आहें. कोणत्याहि घटनेची किंवा मुद्द्याची चर्चा न करतां, प्रत्येक प्रसंग मी सरळ यथासांग कथन करणार आहें. तो करीत असतांना ऐतिहासिक सत्याचा विपर्यास किंवा अतिशयोक्ति न घडण्याची सावधता मीं कटाक्षाने ठेविली आहे. प्रत्येक प्रसंगाचें कथन साधार केलें आहे. आधार अस्सल व अव्वल दर्जाचे वापरले आहेत. यांत अभिमान जरूर आहे, पण अभिनिवेश यत्किंचितहि नाही. शिवचरित्र मूळांतच इतकें नाट्यपूर्ण, ओजस्वी व रहस्यमय आहे की, त्यांत खोटा अभिनिवेश आणण्याची गरज नाही. विशेषतः आजच्या काळांत तर ऐतिहासिक लिखाण पूर्ण साधार, अभिनिवेश टाळून यथातथ्य लिहिलें गेलें तरच तें अवश्य तें मार्गदर्शन करूं शकेल, असें मला वाटतें.

हें शिवचरित्र लिहिण्यांतील प्राथमिक हेतु आणि इच्छा एकच आहे.

वाचकांनी न कंटाळतां तें शेवटपर्यंत वाचावें! शिवचरित्रविषयक ऐतिहासिक कागदपत्रांचे व अन्य साधनांचे अनेक ग्रंथ प्रसिद्ध झालेले आहेत. त्या भयंकर क्लिष्ट व अवघड वाङ्मयगडावर चढण्याचें सहसा कोणी धाडसच करीत नाही. किंबहुना इतिहासग्रंथ वाचायचा म्हटलें म्हणजे बहुतेकांच्या अंगावर काटा उभा राहातो! स्फूर्तीने नव्हे, भीतीने! इतिहासविषयाशीं सलोख्याचे संबंध फारच थोड्या वाचकांचे असल्याचें दिसून येतें. म्हणून सत्याचीं सर्व बंधनें सावधपणें सांभाळून, त्यांच्या कक्षेंतूनच शक्य तेवढ्या ललित भाषेंत मी हें ऐतिहासिक चरित्र सांगत आहें. काव्य आणि शास्त्रशुद्ध इतिहास यांचें एकमेकांशीं फारसें पटत नाही. प्रस्तुत चरित्रांत सत्य इतिहासाला पचेल तेवढेंच काव्य व तेंहि जास्तींत जास्त सावधपणाने मीं अधून मधून ललित भाषेंत गुंफलें आहे. मधून मधून जीं भाषणें व संभाषणें निरनिराळ्या व्यक्तींच्या तोंडीं घातलेलीं सापडतील तीं अगदी मूळ अधिकृत कागदपत्रांतून घेतलीं आहेत. त्यामुळे कोणत्याहि प्रकारें इतिहासाचा विपर्यास न होऊं देण्याची दक्षता मीं घेतली आहे.

शिवचरित्राच्या साधनसाहित्याविषयी थोडेंसें सांगायला हवेंच. शिवचरित्राचीं अस्सल साधनें आता खूपच उपलब्ध झालीं आहेत. तरी पण तीं पुरेशीं मात्र नाहींत. अजून कितीतरी घटनांचा खुलासा होत नाही. कित्येक वर्षांच्या वर्षें अज्ञात आहेत. कांही घटनांचे पुरावे संशयास्पद आहेत. जीं साधनें उपलब्ध आहेत तींहि तौलनिक दृष्टीने व संदर्भासह जर अभ्यासलीं नाहीत, तर गणपतीचा मारुति फारच झटकन् होतो असें अनुभव आहेत. अस्सल साधनें व बखरी यांची सांगड घालणें म्हणजे खरी परीक्षाच! सभासदाच्या बखरींतहि चुका आहेत. शिवराजवटीला सर्वांत जवळची साक्षीदार बखर कृष्णाजी अनंत सभासदाचीच आहे. बाकीच्या सर्व बखरी फार उशिरा लिहिल्या गेलेल्या आहेत. चुका करण्याच्या बाबतींत त्यांच्यांत चढाओढ लागलेली आहे! पण एक गोष्ट

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २४४७६ अंकरा ९ ....
क्रमांक ८६४ नों: दि: ....

मात्र मला दिसून आली आहे की, उशिरा लिहिल्या गेलेल्या बखरींतहि कित्येक गोष्टी पूर्णपणें ऐतिहासिक आहेत. ज्या बखरकाराला जो ऐतिहासिक अस्सल धागा उपलब्ध झाला तो त्याने आपल्या बखरींत वापरला. मल्हार रामराव चिटणिसांना असे सर्वांत जास्त अस्सल धागे सापडले. ते त्यांनी आपल्या कल्पनेप्रमाणे गुंफले. म्हणूनच बखरी निर्धास्तपणें स्वीकारतांहि येत नाहीत व बेपर्वाईने टाकूनहि देतां येत नाहीत. टाकल्या तर शापतात, घेतल्या तर बाधतात. म्हणून बखरसाधनांचा वापर अत्यंत सावधपणें करावयास हवा.

हीच गोष्ट पाश्चात्त्य समकालीन व्यक्तींनी लिहिलेल्या पत्रांच्या व ‘ प्रवासी ’ हकीकतींच्या बाबतींत लक्षांत ठेवणें जरूर आहे. हे पाश्चात्त्य लेखक कित्येकदा ऐकीव माहिती लिहून ठेवीत. त्यांना नांवें, नातींगोतीं, रीतरिवाज, मागचे पुढचे संदर्भ आणि कित्येकदा घटनांचें सत्यस्वरूप न कळल्यामुळे ते सांगणाराच्या जिभेवर व लेखणीच्या टोकावर जें येईल तेंच उतरवून ठेवीत. उदाहरणार्थ, एका पाश्चात्त्याने लिहिलें आहे की, शिवाजीची आई जिजाबाई ही एका सुताराची मुलगी होती ! दुसऱ्या एका सद्‌गृहस्थाने शोध लावला आहे की, शिवाजी हा एका पोर्तुगिझाचा मुलगा होता ! तिसऱ्या एकाने लिहिलें आहे की, अफजलखानाच्या भेटीला स्वतः जिजाबाई गेली व खानापुढे पदर पसरून याचना करूं लागली की, माझ्या मुलाला वांचवा ! एका पत्रांत तर, शिवाजीने जिजाबाईलाच खानाकडे ओलीस ठेवल्याचा निर्वाळा दिलेला आहे ! एकाने लिहिलें आहे की, शिवाजीने शाइस्तेखानाची मुलगी पळविली ! आणि अशा प्रकारच्या कितीतरी गमती ! मी सांगत असलेल्या या गोष्टी ‘ धक्के ’ देणाऱ्या आहेत ! या गोष्टींची ऐतिहासिक किंमत ओळखावी! याशिवाय इतर ऐतिहासिक प्रसंगांबाबतहि या परकीय प्रवाशांनी व व्यापाऱ्यांनी चुका करून ठेवलेल्या आहेत. अर्थात् त्यांचें सर्वच लिखाण इथून तिथून चुकीचें

आहे असें मात्र नव्हे. त्यांनीहि खूप मोलाची माहिती लिहून ठेवलेली आहे. ती अभ्यासपूर्वक निवडून पारखून मात्र व्यावयास हवी.

प्रस्तुत शिवचरित्र लिहितांना अव्वल दर्जाच्या पुराव्यांचा आधार मीं घेतला आहे. जीं साधनें मीं वापरलीं आहेत त्यांची यादी दिलेली आहेच. दुय्यम दर्जाचीं साधनें सर्वस्वीं वेगळीं दाखविणें कठीण आहे. कारण एखाद्या प्रसंगाचे बाबतींत शिवभारताचा पुरावाहि दुय्यम ठरेल, तर एखाद्या बखरींतील पुरावा अव्वल ठरेल. अभ्यासकांनी या बाबतींत चिकित्सा करावी. मीं शक्यतों प्रत्येक घटनेचा आधार नमूद करण्याचा कटाक्ष ठेविला आहे.

दंतकथा व आख्यायिकांना मी शिवचरित्रांत स्थान देत नाही. त्यांचेंहि इतिहासांत स्थान आहे. पण तें डावीकडे. म्हणून या आख्यायिकांची पंगत अगदी शेवटीं वेगळी मांडणें योग्य ठरेल.

श्रीशिवाजीमहाराजांचें चरित्र सांगत असतांना अनेक ऐतिहासिक व्यक्तींचा व सत्तांचा संबंध येणारच. औरंगजेब, अफजलखान, जयसिंह, इंग्रज, सिद्दी, व्यंकोजीराजे, विजापूरकर वगैरे व्यक्तींचा व सत्ताधाऱ्यांचा संघर्ष महाराजांशीं घडलेला आहे. या शिवविरोधकांवरहि मला लिहावें लागलेंच आहे. त्यांच्याहि बाबतींत मीं अभ्यासकाची भूमिका पाळली आहे. त्यांना त्यांच्या चुकांबद्दल व अपकृत्यांबद्दल मीं कडकपणाने दोष दिला आहे. तसेंच त्यांच्यामध्ये जें जें चांगलें व गौरवास्पद वाटलें त्याबद्दल त्यांचा गौरवहि मोकळ्या मनाने केला आहे.

मी केवळ कुमारांसाठी व सर्वसामान्य वाचकवर्गासाठी लालमहाल, प्रतापगड, पन्हाळगड, राजगड, पुरंधर व आग्रा हीं पुस्तकें लिहून शिवचरित्र लिहिण्याचाहि प्रयत्न चालविला आहे. त्यांत ऐतिहासिक साधनसाहित्या-बरोबरच दंतकथा, आख्यायिका यांचाहि वापर सर्रास केला असून थोडाफार कल्पनेचा मालमसालाहि उपयोगांत आणला आहे. तें कुमारांसाठी लिहिलेलें

गोष्टीरूप शिवचरित्र आहे. त्या पुस्तकांतील कांही मजकूर या सत्यकथन-रूप ‘ राजा शिवछत्रपतींत ’ येणें अपरिहार्यच आहे. परंतु आला तरी असा मजकूर फारच थोडा आहे. इतकें सांगितलें म्हणजे या माझ्या दोन्ही शिव-चरित्रांविषयी वाचकांचा गोंधळ व गैरसमज होण्याचें कारण उरूं नये असें वाटतें. अगदी बालांसाठी तिसरें एक शिवचरित्र लिहिण्याचाहि विचार माझ्या मनांत डोकावत असतो — पण तो मूर्तस्वरूपांत यायला किती कालावधि लागेल तें मात्र कांहीच सांगवत नाही. असो.

हें सर्व चरित्र लिहून व छापून पूर्ण करण्यासाठी मला माझ्या असंख्य बंधुभगिनींनी एवढी अमोल मदत केली आहे की, ती शब्दांत वर्णन करणें अशक्यच. त्या सर्वांचा नुसता नामोल्लेख करावयाचा म्हटलें, तरीसुद्धा कित्येक पानें भरतील. त्या सर्वांची मदत जर नसती तर कांहीच घडूं शकलें नसतें. त्या सर्वांनी माझ्याकरिता फार फार श्रम घेतले आहेत. माझी कृतज्ञता मीं कशी व्यक्त करावी हेंच मला समजत नाही.

विख्यात चित्रकार श्री. दीनानाथ दलाल यांनी सर्व चित्रें काढलीं आहेत. श्री. दीनानाथ दलालांच्या कलेचें कौतुक अचूक शब्दांत करण्याची ऐपत माझ्या लेखणींत नाही. हीं चित्रें काढण्यासाठी मीं त्यांना किती त्रास दिला आहे व त्यांनीहि सर्व त्रास सोसून चित्रांसाठी किती परिश्रम घेतले आहेत, हें फक्त मलाच माहीत आहे.

—आणि आनंद मुद्रणालयाची ही अति उत्कृष्ट छपाई आहे. श्री. दीनानाथ दलाल आणि श्री. जोशी बंधु यांनी हें शिवचरित्र सजविलें आहे, एवढें सांगितलें म्हणजे त्याच्या रूपाचीं वेगळीं वर्णनें नकोतच. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणीच राहीन.

भारत इतिहास संशोधक मंडळ आणि मंडळांतील दोन थोर विद्वान् संशोधक,...श्री. ग. ह. खरे आणि श्री. शं. ना. जोशी यांचें साहाय्य तर मला रोजच होत असतें. त्यांच्या मदतीचें मोल अन्नाएवढें आहे. तसेंच

रायगड–स्मारक–मंडळाचे चिटणीस श्री. दि. वि. ऊर्फ बापूसाहेब काळे यांनीहि मला अमूल्य साहाय्य केलें आहे. मी सदैव कृतज्ञ आहें.

बहूत काय लिहिणें ? आमचें अगत्य असों द्यावें. विज्ञापना. मर्यादेयं विराजते ।

विजयादशमी,
दि. २१-१०-५८
पुणें.

ब. मो. पुरंदरे

****

## अनुक्रमणिका


आवातन

- इये मऱ्हाठियेचिया नगरी १९
- ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ३०
- पहिला प्रलय ३८
- द्वारका बुडाली ४८
- दोनशे वर्षांची काळरात्र ५७
- पारतंत्र्याची ऐन मध्यरात्र ७२
- पहाटेपूर्वीच्या अंधारांत ८१
- वेरूळ ८८
- शिंदखेड राजा ९९
- हत्ती बिथरले १०५
- पृथ्वी आंदोळली ११४
- जिजाबाई १२३
- पुणें पेटलें १३३
- उषःकाल १४४
- तुळापूर १५८
- शिवनेरी १६९
- शहाजीराजे १७४




शिवनेरीची शिवाई — उत्सव मूर्ति

थरारली वसुंधरा । मेघें कोंदिले अंबरा ।
उधाण आलें भालुस्वरा । काळरात्र दाटली ॥ ...
धांव घे धांव अंबिके । तुळजेमाते जगदंबिके
धांव आई धांव घे । प्राण कंठीं पातले ॥



परवानगी दरवाजा — किल्ले शिवनेरी



जन्मा आला उमापति । शिवरायाच्या रूपानें ॥

— त्या स्थळाचे भग्नावशेष

# आवातन

उदो उदो अंबे ! तुझा उदो उदो !

चंडमुंडभंडासुरखंडिनी जगदंबे, उद्दंडदंडमहिषासुरमर्दिनी दुर्गे, महाराष्ट्रधर्मरक्षिके, तुळजाभवानी ये ! सुदिन सुवेळ मीं शिवराजाच्या जन्माचं कीर्तन मांडलंय्, आई तूं ऐकायला ये !

मोरगांवच्या मोरेश्वरा, आशीर्वादा ये. शिंगणापूरच्या महादेवा, डोलायला ये. जेजुरीच्या खंडेराया, दिवटी घेऊन ये. गोमंतकाचे म्हाळसाई, बुधली घेऊन ये. कोल्हापूरच्या आई, माझ्या पाठराखणी ये. चुकलंमाकलं तर तूं मला सुचवायला ये.

रामटेकच्या रामराया, झांजा वाजवीत ये. जरंड्याच्या मारुतराया, चिपळ्या घेऊन ये. पंढरीच्या पांडुरंगा, मृदंग घुमवीत ये. अमरावतीचे अंबाबाई, पाळणा गायला ये. वेरूळच्या घृष्णेश्वरा, आंदुळायला ये. बार्शीच्या भगवंता, काजळ घेऊन ये. माहूरच्या मातोशिरी, तीट लावण्या ये. अंबे जोगा जोगेश्वरी, औक्षणाला ये. ललाटीचा लेख लिहिण्या सटवाई ये. जाखाई-जोखाई, संरक्षणा ये. शिवनेरीच्या शिवाई, तूं नांव ठेवण्या ये. कोंकणच्या परशुरामा, साखर वांटण्या ये.

पंढरीच्या नामदेवा, कुंची घेऊन या. देहूच्या तुकारामा, कौतुकाला या. नामयाच्या जनाबाई, न्हाऊं घाला या. पाळण्याला सजविण्या सांवता माळी या. सोनाराचे नरहरी, घाई घाई या. बाळलेणीं राजलेणीं त्वरें घेऊन या. निंबलोण उतराया कान्होपात्रा या. दृष्टमणि गुंफोनिया बसवेश्वरा या. वाघोलीच्या रामेश्वरा, पंचांग घेऊन या. जन्मराशि-कुंडलीचं भाग्य सांगा या. मुक्ताबाई, सखुबाई, बहिणाबाई या. बाळंतविडा पदराखाली झाकोनिया या. शेखबाबा महंमदा, हळू हळू या. श्रीगोंद्याच्या पेठेंतुनी रिंगणी घेऊन या. आजोळीचे धवळे गाया महदंबा या.

शि...२

रिद्धपूरच्या चक्रधरा, लीळा करा या. सेना, निळा, रामदासा, एका, चोखा या. निवृत्तीच्या शिष्यवरा ज्ञानेश्वरा या.

महाराष्ट्राच्या गंगांनो या. कृष्णा, गोदा, पवनांनो या.
पूर्णे, वर्धे, इंद्रायणी ये. तापी, भीमे, पुष्पावती ये.
दूधसागरा फेसाळत ये. राजापूरच्या ये गंगे ये.
सहस्रशीर्षा सह्याद्रि ये. सात कड्यांसह सातपुड्या ये.
किल्ल्यांच्या तटकोटांनो या. प्रचंड अवघड बुरुजांनो या.
जलदुर्गांनो दर्यासह या. तुफान गर्जत लाटांनो या.
देवगिरीच्या यादवतख्ता, छत्रचामरमुकुटांसह ये.
राजकुलासह बिरुदांसह ये. राजसभेसह सैन्यासह ये.

देवदेवतांनो, संतसज्जनांनो, शहाण्णव कुळीच्या कुळवंतांनो, महाराष्ट्र-मंडळीनो, अवघे अवघे या ! मी शिवराजाचं चरित्र गातोय् तुम्ही ऐकायला या !

हे नवनवोन्मेषशालिनी, चातुर्यकलाकामिनी, अभिनव वाग्विलासिनी, वीणावादिनी, विश्वमोहिनी महाराष्ट्रशारदे ये ! आतां केवळ तुझ्याकरितां मी खोळंबलों आहें, तूं वीणा छेडीत ये !

* * *



# १ : इये मऱ्हाठियेचिया नगरीं

कलियुगापूर्वीची कमलपत्रावरील कथा.

अयोध्येची राजाराणी व्रताकरितां वनवास पत्करून दंडकारण्यांत आलीं. वर पाहिलें तर आकाश दिसणार नाही, अन् समोर पाहिलें तर क्षितिज दिसणार नाही, इतकें घनदाट किर्रर अरण्य. राक्षसांसारखे प्रचंड वृक्ष वाऱ्याने करकरा लवत होते. वृक्षांहूनहि प्रचंड राक्षस करकरा दांत खात होते. त्यांना संगत क्रूर पशूंची. अहोरात्र धिंगाणा चाले. राज्य सोडून राम वनवासाला आले. पावलांखाली पाचोळा चुरचुरूं लागला. सहा पावलें इथें प्रवेशलीं. लक्ष्मणाच्या पावलांनी बंधुता प्रवेशली. सीतेच्या पावलांनी प्रेम प्रवेशलें आणि रामाच्या पावलांनी संस्कृति प्रवेशली. दंडकारण्यांत सहा पावलांनी मानवता प्रवेशली.

दंडकारण्याचें रानगट रूप आपादमस्तक न्याहाळीत, थांबत थबकत पावलें टाकणाऱ्या या तिघांना पाहून साऱ्या लतावेली विस्मित झाल्या. पांखरांनी किलबील केली. वृक्षवेली आपसांत कुजबुजल्या. त्यांनी ताडलें, मानव मानव म्हणतात ते हेच.

गोदावरीच्या तीरावर पर्णशाला सजली. अरण्याचें तपोवन झालें. रानवेलींच्या पुष्पवाटिका झाल्या. सीतेच्या कोमल शब्दरवांनी आणि कंकणनिनादांनी वास्तुशांत साजरी झाली. गोदावरीच्या झुळझुळत्या

जीवनप्रवाहांत प्रथमच पवित्र आणि उत्कट प्रेमाचीं तीन प्रतिबिंबें तरळलीं. गोदा शहारली. अनंत तरंग तिच्या हृदयांत उमटले. तिने हें सुख कधी अनुभवलेंच नव्हतें. रानडुकरांच्या आणि शूर्पणखेच्या सुळेदार मुखनिवडुंगांचीं कांटेरी प्रतिबिंबेंच फक्त तिला ठाऊक होतीं. प्रसन्न प्रेम तिने प्रथमच पाहिलें. अनुभवलेंहि.

दंडकारण्याला संस्कृतीचा पहिला स्पर्श असा झाला. रानवेलींना सीतागुंफेचा लळा लागला. गोदावरीची अंगकांति पालटली. तिच्या हृदयांत एक अस्मिता उमलली. अहंकार नव्हे, पण तिला जाणीव झाली की, मी फार मोठी आहें. वेगळी आहें. माझ्या जीवनाला फार मोठा अर्थ आहे. तो अर्थ रामरायांनी मला दिला आहे. उगाच उतारावरून वहकत जाणारी उनाड मुलगी नाही मी. दक्षिणापथांतील एक पवित्र सुरगंगा आहें मी. रामचंद्रसुद्धा आपल्या भावापाशी माझें कौतुक गातात—

‘ यथाख्यातमगस्त्येन मुनिना भावितात्मना
इयं गोदावरी रम्या पुष्पितैस्तरुभिर्वृता
हंसकारण्डवाकीर्णा चक्रवाकोपशोभिता
नातिदूरे न चासन्ने मृगयूथनिपीडिता ’

दंडकारण्यांतल्या जळास्थळांत ही अस्मिता अंकुरली. कुठे राम राहिले म्हणून. कुठे राम फिरले म्हणून. कुठे विसावले म्हणून. कुठे लढले म्हणून. ह्या रम्य रामस्मृति दंडकारण्याने हृदयीं जपल्या. यांतूनच इतिहासाचें पहिलें भूर्जपत्र लिहिलें गेलें. दंडकारण्याच्या अस्मिता प्रगल्भ होत गेल्या. प्रभावी होत गेल्या. प्रखर होत गेल्या. ऋषिमुनींच्या झोपड्यांचे आश्रम झाले. आश्रमांचीं गावें झालीं. हळू हळू वाळसें येऊं लागलें. कांही गावांचीं नगरें झालीं. दंडकारण्याचा महाराष्ट्र झाला. राजा, प्रजा, राजधानी आणि सिंहासनासह महाराष्ट्र साकार झाला. तरुण झाला; बळकट झाला; आणि महाराष्ट्राचा वनवास संपला.

कौतुकाने सर्वांचें लक्ष महाराष्ट्राकडे वळलें. भगवान् बुद्धांच्या सेवक बौद्धांचीं पावलें इकडे वळलीं. महाराष्ट्राने त्यांचें हंसतमुखाने सप्रेम स्वागत केलें. ते प्रेमाची देवघेव करावयास व बुद्ध भगवानांचें नवीन तत्त्वज्ञान सांगावयास आले. त्यांनीं भगवान् तथागतांचें नवीन तत्त्वज्ञान सांगितलें. महाराष्ट्राने मन लावून तें ऐकलें. परंतु हें आपल्या उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचेंच एक अंग आहे, असें महाराष्ट्राला दिसून आलें. हें नवीन नाही अन् वेगळेंहि नाही. केवळ एकाच तत्त्वांगाचें अनुयायी होण्यापेक्षा संपूर्ण तत्त्वज्ञानाचे आहोंत तसेच अनुयायी राहण्यांत जीवनाचा सर्वांगीण उत्कर्ष आहे असें महाराष्ट्राला वाटलें. भारतवर्षांतील सर्व वैदिकधर्मीयांप्रमाणे महाराष्ट्रानेहि भगवान् बुद्धांना श्रीविष्णुनारायणाचेच अवतार मानलें.

महाराष्ट्राने केलेल्या प्रेमाची परतभेट म्हणून अन् युगानुयुगें आपली स्मृति महाराष्ट्राला रहावी म्हणून बुद्धानुयायांनी रत्नमाणकांहूनहि चमकदार आणि सोन्याहूनहि मौल्यवान अशीं अनेक सुंदर सुंदर 'लेणीं' महाराष्ट्राच्या अंगाखांद्यावर घातलीं.

या वेळीं महाराष्ट्राची राजधानी होती प्रतिष्ठान ऊर्फ पैठण.

महाराष्ट्राच्या प्रतिष्ठान राजधानीची प्रतिष्ठा भारतवर्षभर निनादली. विरक्त बौद्धांनीहि आपल्या जातककथांत प्रतिष्ठानच्या विलोभनीय ऐश्वर्याची मुक्तकंठानें कीर्ति गाइली.[२] सम्राट् शातवाहनांच्या पराक्रमाने दाही दिशा दिपल्या. त्यांच्या दानशौर्याने याचना आणि दारिद्र्य पराभूत झालें. राजा हाल शातवाहन मोठ्या अभिमानाने गोदावरी नदीस विचारी.[३]

'सच्चं मण गोदावरि पूव्व समुद्देण सहिआ सन्ती
सालाहणकुलसरिसं जइ ते कुले कुलं अत्थि ?

' हे गोदावरी ! खरें सांग, तूं उगमापासून पूर्वसमुद्रापर्यंत वाहत जातेस; तुझ्या तीरीं शातवाहनकुलासारखें एक तरी कुल आहे काय ?

महाराष्ट्रांत दिग्विजयांचें युग सुरू झालें. धर्म, शास्त्रें, तत्त्वज्ञानें, कला, विद्या, शौर्य, औदार्य विकसत चाललें. चतुरंग सेना सज्ज झाल्या. पण्डितसभा तत्त्वमंथन करूं लागल्या. कर्तृत्ववान् मनगटांतून इतिहास घडूं लागला. शूरांनी, कवींनी, राजांनी, मुत्सद्दयांनी, पंडितांनी, शेतकऱ्यांनी, शिल्पकारांनी, स्त्रियांनी, संतांनी सर्वांनीच मोठ्या भक्तिभावाने आणि हौसेने महाराष्ट्र सर्वांग सजविला. शातवाहनांपासून शिलाहारांपर्यंत अनेक राजघराण्यांनी धर्मराज्यें केलीं. राष्ट्रकूट, चालुक्य, आभीर, सेंद्रक, कलचुरी, वाकाटक, कदंब, यादव आदि सर्व राजकुलांनी राजकर्तव्यांचें आपलें माप महाराष्ट्राच्या पदरांत पुरेपूर ओतलें. कवींनी काव्यकैलास निर्मिले. शिल्पकारांनी कैलासकाव्यें काळ्या कातळांत कोरलीं.[४]

शातवाहनांपासून देवगिरीच्या सम्राट् महादेवराय यादवापर्यंत कले-कलेने महाराष्ट्राचें वैभव वाढतच गेलें. ( इ. पूर्व २०० ते इ. १२७१ ) वैभवाच्या प्रासादावर शिखर चढविलें महादेवराय यादवाने. महाराष्ट्राच्या जीवनांतील सर्व विषयांचीं दालनें समृद्ध झालीं. उणीव कुठे उरलीच नाही. महादेवराय स्वतः रुद्रासारखा शूर होता. तो स्वतःला 'श्रीपृथ्वी-वल्लभ द्वारावतीपुरवराधीश्वर परमेश्वर' म्हणवीत असे.[५] इतर राजे त्याचें नांव ऐकूनच थरकांपत. परंतु हृदयाने आणि नीतीने तो तितकाच थोर होता. प्रजेवर त्याचें व त्याच्यावर प्रजेचें अतिशय प्रेम होतें. तो शूर होता, पण क्रूर नव्हता. त्याचें व्रतच होतें—

'अयं शिशुस्त्रीशरणागतानां हंता महादेव नृपो न जातु[६]'

प्रतिस्पर्ध्याच्या बायकामुलांवर आणि शरणागतांवर राजा महादेवराय शस्त्र उगारीत नाही !

हें त्याचें व्रत ओळखूनच माळव्याच्या राजाने आपल्या सिंहासनावर एक लहान मूल बसविलें होतें. आंध्रचा राजा तर याहून दूरदर्शी. त्याने आपल्या सिंहासनावर रुद्राम्बा नांवाच्या स्त्रीलाच बसविलें होतें.[६]

हा होता यादवांचा दरारा. अन् वैभव? तें तर रत्नाकरासारखें अथांग होतें.

सा सम्पत्तदिदं यशो बलमिदं सोयं प्रतापोमहा—
नैकेकं पृथिवीभृतो भुवि महादेवस्य लोकोत्तरम्[६]

‘ पृथ्वीवरील राजांमध्यें जी सम्पत्ति, जो प्रताप, जें बल, जें यश लोकोत्तर म्हणून असेल तें तें सर्व महादेवरायाच्या ठायीं एकवटलेलें आहे ’ अशी यादवांच्या वैभवाची कीर्ति होती.

देवगिरीच्या यादव साम्राज्यांत भिल्लम, सिंघण, कृष्ण, महादेवराय यांच्यासारखे प्रतापी राजे झाले. खोलेश्वर, बिचणदेव, शंकर यांच्यासारखे पार्थपराक्रमी सेनापति झाले. मुकुंदराज आणि चक्रधरासारखे महात्मे झाले. भास्कराचार्य आणि लक्ष्मीधरासारखे खगोलशास्त्रज्ञ; केशव आणि धनेशासारखे महान् वैद्यराज; अनंतदेव, अमलानंद, चंगदेव यांच्यासारखे विद्वान् तत्त्वज्ञ; शार्ङ्गधरासारखे संगीतरत्नाकर; नृसिंह, नरेंद्र, शैल्य यांच्यासारखे प्रतिभावान् कवि यादवराज्यांत अनेकानेक उदयाला आले. शिवाय शिल्प, नृत्य, स्थापत्य इत्यादि अनेक कला व विद्यांचे अनेक उपासक यादवछत्राखालीं निवांत साधना करीत होते. महाराष्ट्राच्या कलेची, विद्येची आणि श्रीमंतीची कीर्ति खूप दूरवर पसरली होती.[४] वैभवाच्या शिखरावर कळस चढावयाचा फक्त राहिला होता.

आणि तोहि चढला !

आतां बाराव्या शक शतकाचें शेवटचें दशक नंदनवनासारखें बहरून मोहरून घमघमत होतें. देवगिरीच्या द्वारकेभंवती महाराष्ट्राचें गोकुळ गजबजलें होतें. यादवांची देवगिरी खरोखरीच सोन्याची द्वारका शोभत होती. वैभव दुधासारखें उतूं जात होतें. सम्पत्तीने देवगिरीचे कोष तुडुंब भरले होते.

या वेळच्या यादवराजाचें नांव होतें राजा रामचंद्र यादव. हाच ते

विख्यात रामदेवराव यादव. राजा फार उदार होता. गुणग्राहक होता. विद्याप्रेमी होता. न्यायी होता. धर्मशील होता. प्रजावत्सल होता. चारित्र्य-सम्पन्न होता. नम्र होता. देवागिरीच्या राजसभेंत तो देवेंद्राच्या दिमाखांत प्रवेश करी. सारी राजसभा मोठ्या आदराने आणि अभिमानाने त्याला वंदन करी. सामंत व मंत्रीगण यांचे प्रणाम स्वीकारीत तो सिंहासनाकडे पावलें टाकीत असतांनाच त्याचे प्रतिहारी आपल्या हातांतील सुवर्णदंड उंचावून तारस्वरांत राजविरुदावलीचा उद्‌घोष करीत........

"श्रीमत्प्रौढप्रताप चक्रवर्ती यादवकुलकुमुदचंद्र देवगिरीपुरवरपुरंदर एकांगवीरअभिधान सकलगुणनिधान गुर्जरकुंजरदलनकंठीरव यादवकुल-कमलकलिकाविकासभास्कर दानगुणान्वित कल्पमहीरुह महाराजा-धिराज श्रीरामचंद्रनरेंद्र महाराज ७!" असा यशकीर्तिप्रतापमहिमा राजाचा होता.

महाराष्ट्रावर शक्ति प्रसन्न होती.


राजासारखें राज्य होतें. महाराष्ट्र कल्पवृक्षाच्या तळवटी नांदत होता. देवगिरी, पाटण, पैठण, सिन्नर, धाराशिव, मेहेकर, वाशीम, नासिक वगैरे नगरें सौंदर्यपूर्ण व वैभवशाली होतीं. तेथे 'त्रिमाळिक ढवळारें' म्हणजे तीन तीन मजली घरें असंख्य होतीं. मोठमोठे वाडे, अप्रतिम राजप्रासाद, शिल्पसौंदर्याने तीळतीळ नटलेलीं देवालयें, दीपस्तंभ, भव्य अट्टालिका, उत्तुंग सौध, नद्यांचे विस्तृत आणि प्रेक्षणीय घाट, विशाल तलाव, सुंदर विहिरी व रमणीय उद्यानें अनंत होतीं. देवालयांत, मेहकरच्या शार्ङ्गधरा-सारख्या, शेंदुर्णीच्या त्रिविक्रमासारख्या, एलिचपूरच्या कार्तिकेयासारख्या लावण्यमय मूर्ति भक्तांना वेड लावीत होत्या. भद्रावती आणि वेरूळ येथे तर देवतांच्या इतक्या अप्रतिम व असंख्य मूर्ति होत्या की, जणू स्वर्गांतील साक्षात् देवसभाच! सर्व देवदेवतांच्या मूर्तींचीं हीं माहेरघरें!!

राजविदी लांब रुंद होत्या. हत्ती, घोडे, पालख्या वगैरे वाहनांनी

नगरांतील हे राजमार्ग गजबजलेले असत. बाजारपेठा श्रीमंत होत्या. लग्नांत विहिणी रुसत त्या पैठणच्या भरजरी पैठणींकरिताच! पैठणांत अत्यंत उंची व कलापूर्ण अशी रेशमी अन् भरजरी वस्त्रें तयार होत. अशोकाच्या वेळेपासून पैठणच्या वस्त्रांची कीर्ति गाजत होती. राजेलोक अहेर देण्यासाठी पैठणच्या वस्त्रांची आणि अलंकारांची निवड करीत. दगडावरती नक्षी कोरण्यांत व कापडावरती कशिदा विणण्यांत शिल्पकार आणि विणकर यांच्यांत स्पर्धा लागली होती. दोघांच्याहि बोटांवर सरस्वतीने प्रसन्न फुंकर घातली होती.

खेडींपाडीं आनंदांत होतीं. भीमा, पूर्णा, कृष्णा, वर्धा, गोदा सुप्रसन्न

*महाराष्ट्र सुखांत नांदत होत*



वाहत होत्या. सह्याद्रि व सातपुडा निवांत पहुडले होते. घरोघरचे नंदादीप प्रशांत तेवत होते. अंगणाअंगणांतलीं तुळशीवृंदावनें मंजिऱ्यांनी डवरून डोलत होतीं. ओसरीओसरीवरचे झोंपाळे मुलीबाळींनी गजबजून ओंव्या गात होते. उखळाजात्यांचे गळे धान्यांनी दाटून येत होते. दूध-दुभतें विकायची व विकत घ्यायची चालच नव्हती. घरोघरच्या राधिका मोठ्या पहाटे उठून रांगोळ्या करून ताकाचे डेरे घुमवीत होत्या. गोठ्यांत गाईवासरांची दाटी होती. सांजसकाळ तुळशीपाशी दिवे लागत होते. गृहिणी गोग्रास घातल्याशिवाय जेवत नव्हत्या.

नद्यांच्या घाटावर धुणीं धुतां धुतां घर्षून स्त्रियांच्या हातांतलें सोनें जायफळासारखें झिजे. घाटांच्या पायऱ्या सोन्याच्या किसाने पिवळ्या होऊन उन्हाने चकाकत. एखाद्याला वाटावें, यादवांच्या राज्यांत नद्यांचे घाटहि सोन्याचेच ! कुणाचीहि लक्ष्मी सोन्यामोत्यावाचून रिती नव्हती. दाराला कड्या नव्हत्या. कुलुपांची ओळख नव्हती. किल्ली हरवायची चिंता नव्हती. चोर शोधूनहि सापडत नव्हता ! पोरेंबाळें, लेकीसुना, शेतेंभातें, गुरेंवासरें, पशुपक्षी आनंदांत होते. झाडेंझुडपेंसुद्धा ! फक्त वाण होती याचकांची.

महाराष्ट्रावर लक्ष्मी प्रसन्न होती.

सरस्वती आपल्या चारहि हातांची ओंजळ करून ज्ञान ओतीत होती. विद्येचा सुगंध देवगिरीच्या राजसभेंत घमघमत होता. हेमाद्रि आणि बोपदेव हे महापंडित राजसभा शोभवीत होते. बृहस्पति आणि शुक्रच जणू कांही तारांगणीं तळपत होते. देवगिरी, पैठण, नासिक हीं तर मोठीं नगरेंच होतीं. तेथें विद्यावंतांची गर्दी असावी, यांत कांही आश्चर्य नव्हतें. परंतु नेवाशासारख्या एका खेड्यांतहि ब्रह्मविद्येचा सुकाळ प्रकटला होता. प्रत्यक्ष सरस्वतीच तेथें एका लहान मुलाशीं काव्य-कल्पनांचा सारीपाट खेळत होती. त्या मुलाचें नांव ज्ञानेश्वर ! डाव ऐन

रंगात आला होता. वीणेच्या तारा सप्तसुरांत झंकारत होत्या आणि त्या तालावर ज्ञानेश्वर अभिनव वाग्विलासाचे फासे, पैजा लावलावून आवेशाने फेकीत होते. फेकतां फेकतां हात उंचावून मोठ्याने गर्जत होते.

माझा मऱ्हाठाची बोल कौतुकें। परि अमृतातेंहि पैजा जिंके।
ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन ॥

आणि प्रतिभेचें प्रत्येक 'दान' पडत होतें ज्ञानेश्वरांना अनुकूलच. महाराष्ट्रशारदा देहभान विसरून नृत्य करीत होती. भगवद्गीतेचें एक देशीकार लेणें घडत होतें. शृंगारासारख्या मिजासखोराची मिजास पार उतरली होती. शांतरस शृंगाराच्या माथीं नाचत होता. शके बाराशे बारोत्तरी, गोदावरीच्या दक्षिणकुलीं, श्रीमहालयेच्या क्षेत्रीं, नेवासें येथे ज्ञानेश्वरांपुढे बसलेली महाराष्ट्रमंडळी तल्लीन झाली होती. किती तल्लीन?

शारदियेचे चंद्रकळे। माजी अमृतकण कोंवळे।
वेंचिती मनें मवाळें। चकोर तलगें ॥

इतक्या हळुवारपणें हा अमृतानुभव ती श्रोतेमंडळी अनुभवीत होती. ज्ञानेश्वर तल्लीन झाले होते. श्रोतेहि तल्लीन झाले होते. शांतरसांत ते न्हात होते.

शांतरसाबरोबरच इतर रसांचाहि थाट उडाला होता. शांतरसाचिया घरा अद्भुतरस पाहुणेरा आलाच होता. पण इतर रसांचीहि दाटी उडाली होती. त्यांचेंहि नटणेंथटणें चाललें होतें. चालणारच! ज्ञानेश्वरासारख्या भाषाकुबेराच्या घरीं निघालेलें हें 'कार्य!' कार्यांत नटायचें नाही तर मग केव्हा? ज्ञानेश्वर त्यांचेंहि हट्ट, लाड पुरवीत होते.

अहो वधूवरांचिये मिळणी। जैशीं वऱ्हाडिया लुगडीं लेणीं।
तैसे देशियेचिया सुखासनीं। मिरविले रस ॥

लग्नांत वधूवरांबरोबरच वऱ्हाड्यांना मानाची आणि रुसव्या फुगव्याची लुगडीं–लेणीं नाही कां मिळत? तसेंच हें!

अवघ्या सोळा वर्षांच्या एका बाळाचें हें लाघव हं! किती गोड! किती रसाळ! किती प्रेममय! छे:! उपमाच नाही. सोळा वर्षांच्या ज्ञानेश्वरांनी, चौदा वर्षांच्या सोपानदेवांनी, बारा वर्षांच्या मुक्ताईने आणि अठरा वर्षांच्या निवृत्तिनाथांनी महाराष्ट्रांत मोठें कौतिक निर्मिलें. या मराठीच्या नगरांत त्यांनी ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. इतक्या लहानपणीं एवढी बुद्धि आली कोठून? यांना हें शिकवलें तरी कोणीं? हें शिकले तरी केव्हा? खरोखर कोण हो हीं मुलें? होतीं तरी हीं कोण? नक्की नक्की आभाळींच्या चार चंद्रकळा मानवरूपाने भूतळा आल्या! स्वर्गांत बृहस्पतीने सरस्वतीला वाहिलेलीं हीं चार फुलेंच जणू तिच्या मस्तकावरून 'उजव्या कौलाने' महाराष्ट्रांत घरंगळत आलीं! नक्की नक्की तींच हीं बाळें! हीं चार बाळें म्हणजे कैवल्याचे पुतळे! चैतन्याचे जिव्हाळे! विष्णुभक्तीचे उमाळे! महाराष्ट्रसारस्वताचे सोहाळेच!

महाराष्ट्रावर सरस्वती प्रसन्न होती.

असा आनंदीआनंद यादवराज्यांत दाटला होता. मुळांत यादवांच्या घराण्याची दीप्तीच तशी. कशी? भगवान् श्रीकृष्णांनाहि यादवकुळांत जन्म घेण्याचा मोह अनावर व्हावा अशी! आणि आता तर यादवकुळांत रामचंद्र जन्माला आला होता. महाराष्ट्राच्या गोकुळांत यादवांचें रामराज्य नांदत होतें. संभ्रम पडे, देवगिरीला द्वारका म्हणावें कीं अयोध्या म्हणावें याचा! रामदेवरावाबद्दल ज्ञानेश्वरांनी म्हटलें,

तेथ यदुवंशविलासु । जो सकळकळानिवासु ।
न्यायातें पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र ॥

अयोध्येच्या सूर्यवंशी राजा रामचंद्राने महाराष्ट्राचें भूमिपूजन केलें. सर्वांनी प्रासाद बांधला अन् देवगिरीच्या चंद्रवंशी राजा रामचंद्राने त्यावर वैभवाचा कळस चढविला. स्वतंत्रता, प्रसन्नता, विशालता, प्रचंड वैभव!

सोन्याचें उन्ह! रुप्याचें चांदणें! मोत्यांचा पर्जन्य! कस्तुरीचा धुरळा! अत्तराचें दंव!

महाराष्ट्र स्वर्गीय सुखांत नांदत होता!

* * *

---

**आधार :**—( १ ) सह्याद्रि पृ. १३४ ते २६४. ( २ ) जातकसंग्रह. ( ३ ) गाथा सप्तशती. ( ४ ) मसांइ पृ. ११९, १२३ सह्याद्रि पृ. २१२ ते २२७. ( ५ ) EPGR. IND. Vol; XXIII, Page 194. ( ६ ) राजप्र. BOMBAY GAZ. Vol; I, Part II, Page 274-275 ( ७ ) IND. Vol; XXV, Page 211; Vol; XIII, Page 202. ( ८ ) मसांइ पृ. ११९.



## २ : ईश्वरनिष्ठांची मांदियाळी

टाळ–मृदंग–वीणेचा झणत्कार ऐकला की महाराष्ट्राचें मन गाहिवरतें. माहेरच्या माणसाचा शब्द ऐकला की, दळणकांडण करीत असलेल्या सासुरवाशी मुलीचें मन जसें गहिवरतें तसेंच. ती सासुरवाशीण आपलें सूनपण विसरते. तिचे हात थबकतात. नकळत तिचे पाय उठतात. कमरेला खोचलेला पदर खांद्यावर ओढून घेत ती हातचें काम टाकून धावते. महाराष्ट्राचें मन तसेंच धावतें. त्याला वैकुंठमाहेरीचा सावळा श्रीरंग आठवतो.

यादवांच्या राज्यांत वैभव दुथडी भरून वाहत होतें, तरीहि राजा आणि प्रजा नाचरंगांत दंग नव्हते. त्यांच्या जीवींची ती खरी आवडीच नव्हती. त्यांना आवड होती टाळ-मृदंग-वीणेची. मराठीच्या नगरांत प्रसन्न पहाटे गाईवासरांचीं घंटाघुंगरें रुणझुणत. गोठ्यांत झरझरत्या दुग्धधारांनी घागरी घुमत. वासरें हंबरत, गाई हुंकारत, घुसळत्या ताकाचे डेरे घुमत आणि घरोघरच्या माजघरांतून भूपाळ्यांचे सूर लहरत.

प्रशांत रात्रीं देवालयांतून टाळ-मृदंग-वीणेचे झणत्कार उठत. सर्वत्र ओव्या-अभंगांचें शब्दसाम्राज्य पसरे. महाराष्ट्र त्यांतच तल्लीन होऊन जाई.

आषाढाकार्तिकांत महाराष्ट्रांतील सर्व रस्ते पंढरपुराकडे वाहत. टाळ-मृदंग-वीणा सजीव होऊन विठ्ठलनामाचा कल्लोळ उठवीत. दिंड्या-पताका थयथय नाचत. विठ्ठलप्रेमाने सारें वातावरण धुंद होऊन जाई.

अवघी पंढरी दुमदुमे. दुसरा शब्दच उमटत नसे. विठ्ठल! विठ्ठल! विठ्ठल! विठ्ठल! पांडुरंगाला विष्णुदासांचा वेढा पडे. भक्त आणि पांडुरंग उराउरीं भेटत. अवघे गहिवरून जात.

चंद्रभागेच्या वाळवंटांत वाळूहून अधिक दिंड्यापताकांची दाटी उडे. अवघे संत जनार्दनांत साखरेसारखे विरघळून जात. लहानपण मोठेपण उरतच नसे. पंढरी हीच महाराष्ट्राची खरी राजधानी बनली होती. देवगिरीचा राजा पंढरीच्या सम्राटाचा मांडलिक शोभत होता. राजा रामदेवराव व महामंत्री हेमाद्रिपंडित हे पंढरीनाथाचे भक्त होते. दोघांनीहि विठ्ठलाला द्रव्य अर्पण करून जीर्णोद्धारांत पुढाकार घेतला होता.

याच यादवकाळांत विठ्ठलभक्तांची एक महान् दिंडी महाराष्ट्रांत अवतरली. साधें, सोपें, शुद्ध अध्यात्म प्रकटलें. देवाविषयी व एकमेकांविषयी कांही एक आगळाच प्रेमा मराठी प्रांतांत लोटला. अवघ्या जातीयातींची एकच टाळी वाजली. भागवतधर्माची ध्वजा उंच चढली. हातचीं कामें टाकून माळी, तेली, शिंपी, ब्राह्मण सगळे आषाढीकार्तिकीला पंढरीकडे धावूं लागले. नवविधा भक्तीला पूर आला. पंढरीच्या वेशींतून नामदेवांनी हाळी दिली,

'आले वो संसारा, सोडवण करा, शरण जा उदारा, पांडुरंगा!'

चोखोबांनी दवंडी पिटली. त्यांनी सर्वांना आमंत्रण केलें,

'खटनट यावे, शुद्ध होवोनिया जावे, दवंडी पिटी भावें, चोखामेळा!'

संतसज्जनांची धाव पंढरीच्या वाटेकडे पडली. गोरोबा कुंभार, सांवता माळी, नरहरी सोनार, बंका महार, जोगा तेली, जगमित्र नागा, कान्होबा पाठक, परसा भागवत, विसोबा खेचर, चोखामेळ्याची बायको सोयरा महारीण, जनाबाई, नामदेवांच्या कुटुंबांतील सर्व मंडळी आणि इतर कितीतरी संत ह्या दिंडींत सामील झाले. आळंदीची ती चार

बाळेंहि दुडूदुडू धावत आलीं आणि मग आनंदाला केवढें भरतें आलें ! पंढरीच्या गरुडपारीं एकच आरोळी उठली, ‘ जय जय पांडुरंग हरि ! ’ टाळ-मृदंगांचा एकच गदारोळ उठला. ज्ञानेश्वरांनी डावा हात हृदयीं ठेवून उजव्या हाताचें बोट उंचावलें आणि विमलस्मित करीत म्हटलें,

‘ एक तत्त्व नाम, दृढ धरी मना, हरीसी करुणा, येईल तुझी ! ’

तेवढ्यांत गोरोबा कुंभारांनी म्हटलें,

‘ निर्गुणाचे भेटी, आलों आलों सगुणासंगें, तव झालों प्रसंगें गुणातीत
म्हणे गोरा कुंभार, परियेसी नामदेवा, सांपडला ठेवा, विश्रांतीचा ! ’

मृदंग-टाळ तालबद्ध झंकारत होते. कोमल आवाजांत मुक्ताबाईने मोत्यांची ओळ गुंफली,

‘ विसाविया आलें मन, मन जाहलें उन्मन
मास मावळला ठाईं, सुखी झाली मुक्ताबाई ! ’

ह्या दिंडींत क्षणांत तल्लीन झालेले लहानगे सोपानदेव म्हणाले,

‘ सोपान प्रेमाचा, आनंद हरीचा, तुटला मोहाचा, मोहपाश ! ’

अन् मग जनाबाईने आपला गोड अनुभव सांगितला,

‘ उन्मनीच्या सुखाआंत, पांडुरंग भेटी देत
कवटाळूनि भेटीपाठी, जनी म्हणे सांगूं गोष्टी ’

नामगानांत सर्वजण तल्लीन झाले. सांवता माळ्यांची हरिनामावर दांडगी भक्ति. ते म्हणाले,

‘ नामाचिया बळें न भिऊं सर्वथा, कळिकाळाच्या माथां सोटे मारूं !
वैकुंठींचा देव आणूं या कीर्तनीं, विठ्ठल गाऊनी नाचूं रंगीं ! ’

आणि मग सर्वच संतांनी भक्तिवाङ्मयाचा पाऊस पाडला. भक्तीच्या मृग–आर्द्रा–पुनर्वसु–पूर्वा–हस्त–स्वाति आदि नक्षत्रांच्या सरीवर सरी सरसरूं लागल्या. सहाहि विकार ह्या पर्जन्यवृष्टीने वाहून गेले. भक्ति-पर्जन्यांत चिंब भिजलेला वंका महार धुंद नाचत म्हणाला,

‘ बंका म्हणे सर्वज्ञा विठोबा दयाळा, पुरवावा लळा हाचि माझा ।
वासना उडाली तृष्णा मावळली कल्पना गळाली अहंकृति । ’

संतांची उचंबळलेली ती मांदियाळी पाहून निवृत्तिनाथ कौतुकाने गुणगुणले,

‘ तल्लीन प्रेमाचे, कल्लोळ अमृताचे, डिंगर हरीचे, राजहंस ! ’

संतांचा तो प्रेमा पाहून चोखोबांची लक्ष्मी सोयराबाई गहिवरून म्हणाली,

‘ अवघा रंग एक झाला, रंगी रंगला श्रीरंग
मीतूंपण गेलें वाया, पाहतां पंढरीच्या राया
धन्य बाई मेहुणपुरी, म्हणे चोखयाची महारी ! ’

संतांच्या शब्दांची चवच न्यारी. खऱ्या प्रेमाचे ते उद्रेक ! कोणत्याहि प्रकारच्या स्वार्थी वासनेचें त्यांचें प्रेम नव्हतें. विठ्ठलावर त्यांची निरतिशय भक्ति होती. विठ्ठल त्यांचा पिता. रुक्मिणी त्यांची माता. भागवतधर्माचा भक्तिमार्ग सोपा, सुंदर, शीतळ. सर्व जाति, पंथ ह्या सोप्या वाटेनें जाऊं लागले. हा संसार विठ्ठलाचा. हळूहळू विठोबाचा हा संसार वाढूं लागला. सगळ्या जातींचीं लेकरें त्याच्या अंगाखांद्यावर खेळूं लागलीं. जनाबाई मोठ्या कौतुकाने म्हणते,

‘ विठू माझा लेकूरवाळा, संगे लेकुरांचा मेळा !
निवृत्ति हा खांद्यावरी, सोपानाचा हात धरी
पुढे चाले ज्ञानेश्वर, मागे मुक्ताबाई सुंदर
गोरा कुंभार मांडीवरी, चोखा जीवा बरोबरी
बंका कडियेवरी, नामा करांगुळी धरी
जनी म्हणे रे गोपाळा, करी भक्तांचा सोहळा !

पांडुरंग किती प्रेमळ ! सगळे त्याचे. तोहि सर्वांचा. कुंभार मांडीवर आहे; शिंपी बोटाशी आहे, महार कडेवर आहे, कुणी खांद्यावर आहे,



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकृत.
अनुक्रम २४४७८... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

ईश्वरनिष्ठांची ही महान् मांदियाळी समतेचें, प्रेमाचें आणि एकात्मतेचें तत्त्वज्ञान स्वतः आचरून लोकांना शिकवीत होती. हरीच्या मांडीवर खेळत होती. अहंकाराचीं, उच्चनीचतेचीं आणि कर्मठ धर्मकल्पनांचीं सारीं जळमटें फटकारून काढण्याचें अवघड काम त्यांनी आरंभिलें होतें. इतकें प्रेम करणें फक्त आईलाच साधावें. साध्या भक्तिमार्गानेहि परमेश्वर साधता येतो, हें त्यांनी समाजाला पटविलें. शुद्ध आचरण आणि तळमळीचें प्रेम असेल तर विठ्ठल तुमचा आहे, हें त्यांचें सांगणें. तेथे जातिभेद उरत नाही. तेथे कोणतीहि विषमता ठाकत नाही. जेव्हा ज्ञानेश्वरांनी देवाचेंच म्हणणें लोकांना सांगितलें तेव्हा लोक आनंदाने भांबावले.

तैसे क्षत्री, वैश्य, स्त्रिया । कां शूद्र, अंत्यजादि इया ।
जाति तंवचि वेगळालिया । जंव न पावती मातें ॥

'समाजाच्या दृष्टीने हीन योनींत जन्मलेले असले आणि त्यांना विद्येचा स्पर्शहि नसला, तरी माझ्याजवळ जे येतील, ते शूद्र, वैश्य, स्त्री, अंत्यज कोणीहि असोत, मग ते सर्वस्वीं माझे आहेत. तेथें जातीला, भेदाला जागा नाहीं!' हा श्रीकृष्णाचा संदेश ज्ञानेशांनी देतांच खेदावलेले शूद्र आणि खंतावलेले अतिशूद्र आनंदाने उचंबळले. आपण उपेक्षित नाही, आपल्यालाहि या मांदियाळींत स्थान आहे हा तो आनंद होता.

ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेच्या तिजोरींत अडकून पडलेलें मौल्यवान धन मराठीच्या किल्लीने उघडून लोकांच्या पुढे उधळलें. म्हणाले, 'लुटा!' जीवनाचें तत्त्वज्ञान त्यांनी मराठींतून सांगितलें. त्यांनी आणि सर्व संतांनी मराठींतून देवाला हाक मारली. देवावर मराठींतून प्रेम केलें. देवाशीं भांडले, तेंहि मराठींतूनच. त्यामुळे सर्वांना खात्री पटली की, देवाला भाषेचें बंधन नाही. हृदयाची भाषा त्याला सर्वांत चटकन् समजते.

संतांचें सर्वांशींच वागणें प्रेमाचें होतें. संतमंडळी एकमेकांवर जीवा-

पाड प्रेम करीत. त्यांच्यांत स्पर्धा, हेवा, मत्सर वा अहंकार लवमात्रहि नव्हता. कशाकरिता असेल? कीर्ति व पैशाची हाव, गुरुबाजी, टवाळ शिष्य-शिष्यिणी, गुंडागिरी, मठबाजी, ढोंगबाजी त्यांच्यापाशी नांवालाहि नव्हती. होतें फक्त प्रेम आणि भक्ति. त्यांच्या प्रेमांत कसलींहि बंधनें आड येत नव्हतीं. कोणीहि कोणाचे अभंग प्रेमाने उतरवून घेत व गात. मुक्ताबाईचे अभंग ज्ञानेश्वर कौतुकाने लिहून घेत. जोगा तेल्याचे अभंग विसोबा लिहून घेत. सांवता माळ्याचें कवित्व काशीबा गुरव टिपून ठेवीत. ज्ञानेश्वरांचा काव्यमध सच्चिदानंदांनी गोळा करून ठेवला. तर चोखोबांची अमृतवाणी वेदशास्त्रसंपन्न अनंतभट्टांनी उतरवून ठेवण्याचा छंद घेतला.[२]

बहुतेक संत संसारीच होते. कोणीहि भीक मागून देवभक्ति करीत नव्हता. कुणी मळ्यांत राबत होता. कुणी सोनारी करीत होता. कुणी चिखल तुडवीत होता. कुणी महारकी करीत होता. कुणी कांही, कुणी कांही. संसाराचीं कामें करीत करीत ते विठ्ठलाला आळवीत होते. विठ्ठल-पायीं गळा गोवीत होते.

केवळ स्वतःच्या मोक्षापुरती शिदोरी जमविण्यांत ते दंग नव्हते. लोकांच्या हिताची, कल्याणाची ते चिंता वाहत होते. दुर्गुणी, व्यसनी, विषयी, दुष्ट वा अहंकारी माणसावरहि ते प्रेम करीत. हे रोग बरे करण्याची एक विलक्षण किमया संतांपाशी होती. तिचें नांव चारित्र्य! गोरोबांनी म्हटलें,

'हो का दुराचारी विषयी आसक्त, संतकृपे त्वरित उद्धरतो'

संतांनी समाजाला चारित्र्य आणि दानत शिकविली. सदाचारी व सद्विचारी बनविलें. असा अनुभव आला की, संतांच्या प्रेमळ सहवासाने दुष्टदुर्जनांच्याहि—

'कंठीं प्रेम दाटे, नयनीं नीर लोटे, हृदयीं प्रकटे, रामरूप!'

जगाच्या सुखी जीवनाविषयींच्या संतांच्या कल्पना फार भव्य व उदात्त

होत्या. त्यांच्या पूर्तीसाठी त्यांनी सर्वस्व पणाला लावलें. सर्वस्वाचा नैवेद्य दाखविला. ज्ञानेश्वरीचा वाग्यज्ञ पूर्ण झाल्यावर ज्ञानेशांनी देवापाशी पसायदान मागितलें,

‘ जै खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मीं रति वाढो ।
भूतां परस्परें जडो । मैत्र जीवांचें ॥
दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥
वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ।
चला कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणीचें गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥’

आतां काय उरलें मागायचें ? संतांच्या हृदयाची ही विशालता अशी होती. संतांनी परमेश्वरापाशी स्वतःकरिता पोर मागितलें नाही, घर मागितलें नाही, दार मागितलें नाही, धन नाही, कांहीहि मागितलें नाही, मागितलें तें हें ! ही ईश्वरनिष्ठांची अलौकिक मांदियाळी यादवकाळीं महाराष्ट्रांत अवतरली. धर्माचा विजय व्हावा, अधर्माचा नाश व्हावा, प्राणिमात्रांत सद्‌भाव निर्माण व्हावा आणि विश्व सुस्नात होऊन सुखी व्हावें ही या संतपथकाची तळमळ होती.

संतांच्या सहवासानें महाराष्ट्रांत एक अलौकिक मांगल्य निर्माण झालें. समाजाच्या सुखी जीवनावर खरपूस खमंग साय आली. संतांनीच गोड वाङ्‌मयाची साखर तीवर पेरली अन् मग जीवनाला अवीट गोडी आली. सोनियाचे दिवस अमृताने पाहिले.

सोन्याच्या देवगिरीवर यादवांचा गरुडध्वज दिमाखांत फडकत होता.

पंढरपूरच्या राउळावर भागवतधर्माचा भगवा ध्वज त्याहून उंच फडफडत होता. महाराष्ट्राची प्रजा, धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारीहि पुरुषार्थ साधीत होती. संसार सुखाने चालले होते. प्रजा आणि गाईवासरें राजाच्या मांडीवर मान टाकून निर्धास्त विसावलीं होतीं आणि ईश्वरनिष्ठांची मांदियाळी गोड भक्तिगीतें आळवीत होती.

* * *

---

**आधार**—( १ ) चौऱ्यांशीचा शिलालेख, ज्ञानखंड, पुणें विद्यापीठ बुलेटीन. ( २ ) मवाइ॰ खं. १ पृष्ठ ५९६. शिवाय ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु आणि संतांचे गाथे.



## ३ : पहिला प्रलय

वैभवाचा पूर्णचंद्र महाराष्ट्रावर चांदणें शिंपीत होता.

अन् घात झाला ! चंद्राला अकस्मात् खळें पडलें ! कसें पडलें, केव्हां पडलें तें कुणाला समजलेंच नाही !

विंध्याचलाच्या मागून धुळीचे लोट उठले. भयंकर आरोळ्या उठल्या. घोड्यांच्या टापा खडाडल्या. लखलखीत अर्धा चाँद आणि एक चांदणी विंध्याचलावरून तळपत तळपत अत्यंत वेगाने पुढे सरकूं लागली. आरोळ्यांचा आवाज वाढूं लागला. टापांचा खडखडाट चढूं लागला. भाल्यांचे फाळ आणि तलवारींचीं पातीं झगागलीं. अन् लवलवणारें अफगाणी शिरताज, आक्रोशणारे अफगाणी कंठनाळ, शिवशिवणारीं अफगाणी मनगटें आणि फुसफुसणारीं अफगाणी छाताडें बेहाय दौडत आणि बेताल ओरडत, उधळत, उसळत दख्खनवर तुटून पडलीं. आठ हजार अफगाणी घोडा घामाळत, फेसाळत, चौटाप थडाडत होता. जमीनीवर टाप ठरत नव्हती. त्या स्वारांचा म्होरक्या अत्यंत क्रूर मुद्रेचा होता. त्याच्या हत्याराचें आणि नजरेचें टोक महाराष्ट्रावर रोखलेलें होतें. आठ हजार स्वार त्याच्या मागोमाग दौडत होते. त्यांचे पंजे, त्यांचीं मनगटें, दंड, खांदे, गर्दना, दाढ्या, डोळे, भिंवया, ओठ, छाताडें, नजर, वेष, आवेश आणि आक्रोश भयंकर कत्तलबाजांचाच होता. त्यांच्या

धिप्पाड अंगाखांद्यांवर बाणांचे भाते, कमानी, मोठमोठ्या ढाली आणि पल्लेदार भाले-समशेरी तळपत होत्या.

विंध्याचलास टापांनी मागें फेंकीत ते दौडत सुटले. एवढ्यांत त्यांना नर्मदा आडवी आली. बेगुमानपणें त्यांनी नर्मदेच्या पात्रांत घोडे घातले. निर्मल नर्मदा ढहुळली गेली. टापांनी थडाड् थडाड् पाणी उडवीत त्यांनी नर्मदा ओलांडली. अन् पुन्हा तितक्याच वेगाने ते चौखूर दौडत सुटले.

आणि सर् सर् सर् सर् जमीन कापीत ही धाड यादवराज्यांत घुसली. आठ हजार कंठनाळांतून इस्लामी पुकार अस्मान फाडूं लागला. ते आक्रंदत होते.

दीन् दीन् दीन् दीन् ! अल्ला हु अकबर ! दीन् दीन् दीन् ! अल्ला हु अकबर ! !

त्यांच्या त्या आरोळ्यांनी दिशा तडकल्या. कानठळ्या बसल्या. पांखरें उडालीं. हंबरडे आणि किंकाळ्या उठल्या. परचक्र आलें ! महाराष्ट्रावर परचक्र आलें ! बेहोष टापांखाली भूमि चेंदाळूं लागली. जमीन आणि झुडपें, जीव आणि जिवाणू टापांखाली चिरडीत, तुडवीत ती सैतानी टोळी बावन गांव वऱ्हाडांत घुसली. पहिली धाड पडली एलिचपुरावर[२] !

ही भयंकर बातमी देवगिरीवर येऊन धडकली.[३] येणाऱ्या शत्रूचें नांव–गांवहि समजलें. अल्लाउद्दीन खलजी ! महाभयंकर क्रूर कर्दनकाळ अल्लाउद्दीन खलजी ! दिल्लीच्या जलालुद्दीन खलजीचा हा पुतण्या. अर्जें ममालिक अल्लाउद्दीन खलजी !

राजा रामदेवराव खडबडून उठला. पण सैन्य कुठें होतें जागेवर ? राजपुत्र शंकरदेव यादव सैन्यासह दूर कोठेतरी गेला होता ! आता ? रामदेवरावाला भयंकर भविष्य दिसूं लागलें. त्याने होती तेवढी जवळची फौज आपल्या एका मांडलिक राजाबरोबर देऊन त्याला त्वरेने घाट लाजौऱ्याकडे रवाना केलें.[३] कोकणांतूनहि एका मांडलिकाची थोडीशी

सेना घाटावर आली. ही यादवसेना घाट लाजौऱ्यापाशी येऊन खलजीला रोखण्यासाठी शस्त्रें सरसावून बसली.

खलजी आलाच ! वाघासारखी झेप घेत भर जोषांत त्याने यादव-सेनेला धडक दिली. धुमश्चक्री उसळली आणि यादवसेना कर्दळीसारखी क्षणांत सपासप छाटली गेली ! पहिला दणका बसला. प्रतिकार पाचोळ्यासारखा उडवून अल्लाउद्दीन खलजी पुढे निघाला देवगिरीकडे[३]. हें तुफानी वादळ देवगिरीकडे फुंफाटत निघालें !

केवढें त्याचें धाडस ! अल्लाउद्दीन खलजीने थोडेच दिवस आधी भिलशाची मोहीम केली होती. त्यावेळीं त्याला देवगिरीच्या अफाट श्रीमंतीची तारीफ ऐकायला मिळाली. ती ऐकून त्याची महत्त्वाकांक्षा पान्हवली गेली. त्याने निश्चय केला की देवगिरी झोडायची, मारायची, लुटायची ![४] तो भयंकर विचार त्याच्या डोक्यांत नाचूं लागला. भिलशाच्या मोहिमेंत त्याने अपार लूट मिळविली होती. ती त्याने दिल्लीला पाठविली. सुलतान जलालुद्दीन खलजी अल्लाउद्दिनावर खूष झाला. त्याने त्याला अर्जे ममालिकी बहाल केली.[४] अर्जे ममालिकी म्हणजे शाही फौजेवरचें सर्वश्रेष्ठ अधिकारपद.

लगेच भिलशाहून अल्लाउद्दीन कऱ्हा माणिकपुरास गेला. तो तेथील सुभेदार होता. त्याने तेथे येऊन फक्त आठ हजार कडवे स्वार घेतले आणि ताबडतोब दख्खनवर मोर्चा वळविला.[४] फक्त आठ हजार स्वार ! केवढें धाडस हें ! केवढी जबरदस्त हिंमत ! आपल्यापासून पांचशे कोसांपलीकडे असलेल्या, एका स्वतंत्र व बलाढ्य म्हणून गाजलेल्या साम्राज्याच्या राजधानीवरच, फक्त आठ हजारांनिशी चालून जायला काळीज हवें वाघाचेंच !

अल्लाउद्दीन माणिकपुराहून निघाला ( डिसेंबर १२९३ ). उड्या टाकीत निघाला. माळव्यांतून विंध्याचलावर. विंध्याचलावरून नर्मदेंत.

नर्मदेंतून सातपुड्यावर. सातपुड्यावरून एलिचपुरावर आणि आता एलिचपुरावरून थेट देवगिरीवर !

माघाच्या शुक्ल पक्षाचे ते दिवस होते. राजा रामदेवराव देवदर्शनाकरिता जात होता.[६] इतक्यांत धुळीचे लोट उधळीत अल्लाउद्दीन आलाच. घाट लाजौऱ्याच्या पराभवाच्या बातम्या यायच्या आधीच त्याची पायधूळ देवगिरीवर पोहोचली. देवगिरींत धावपळ उडाली. किल्ल्यावर रणदुंदुभी वाजूं लागल्या. पण सैन्यच नव्हतें जाग्यावर ! अवघे चार हजार सैनिक होते.[७] रामदेवराव तेवढीच सेना घेऊन त्वरेनें शत्रूवर चालून गेला. देवगिरीपासून दोन कोसांवर त्याची व त्या बेफाम खलजीची गांठ



*अफगाणांच्या पंजांत यादवांची प्रजा गवसली.*

पडली. लढाई पेटली. पेटली, पण भडकायच्या आंतच विझली. कारण खलजीच्या वादळापुढे यादवसेनेचा टिकावच लागला नाही. ती परासूत होऊन किल्ल्याकडे पळत सुटली. रामदेवरावहि निरुपायाने दौडत धावत किल्ल्यांत शिरला आणि त्याने किल्ल्याचे दरवाजे बंद करून टाकले. किल्ल्याखाली देवगिरीनगर होतें. तें अगदी अलगद खलजीच्या तडाख्यांत सांपडलें[२] ! अफगाणांच्या पंजांत यादवांची प्रजा गवसली ! आणि मग–? वर्णन करणें चित्रगुप्तासहि अशक्य ! अफगाणांची पहिली झडप पडली देवगिरीच्या अब्रूवर ! स्त्रियांनी केविलवाण्या किंकाळ्या फोडल्या. पण त्या ऐकायला फक्त अफगाणच होते !

देवगिरीनगरीची अल्लाउद्दिनाने सपाटून लूट केली. शिवाय नगरांतच त्याला हजारों उत्कृष्ट घोडे व तीस हत्ती सांपडले.[३] लूट चालू असतांनाच त्याने देवगिरीच्या किल्ल्याला वेढा घातला. किल्ला अत्यंत बळकट आणि अजिंक्य होता.

वेढा घातल्यानंतर अल्लाउद्दिनाने हवेंत एक अफवा सोडून दिली की, आपण बरोबर आणलेली फौज ही केवळ आघाडीची एक लहानशी तुकडी आहे ! खरी मोठी फौज दिल्लीहून आमच्या मागोमागच निघाली आहे. लौकरच ती येऊन थडकेल[२] ! ही बातमी सर्वत्र पसरली.

ही शुद्ध थाप होती. शुद्ध अफवा ! परंतु प्रचंड सैन्य दिल्लीहून निघालें आहे, अशी बातमी ' गुप्त ' व महत्त्वाची म्हणून गडावर रामदेवाला समजली ! तो जास्तच चिंताक्रांत झाला ! आता आपलें कसें होणार ?

खलजीने उठविलेल्या अफवेचा आणखी एक परिणाम असा झाला की, दक्षिणेंतील एकहि राजा रामदेवाच्या मदतीला आला नाही. जो तो आपापल्या राज्याचें दिल्लीच्या ' त्या ' प्रचंड फौजेपासून संरक्षण कसें करतां येईल या चिंतेंत पडला[२] ! अफवांचें हें केवढें सामर्थ्य ! देवगिरीच्या गळ्याला खलजीचा अचूक फास बसला. वेढा पक्का पडला.

देवगिरीच्या किल्ल्यांत धान्य मात्र खूप भरून ठेवलेलें होतें, ही त्यांतल्या त्यांत सर्वांत भाग्याची गोष्ट होती. तेवढ्या तरतुदीवर अनेक महिने किल्ला झुंजविण्याची हिम्मत रामदेवरावांत खास होती. गडाची रचनाच इतकी बिकट होती की, शत्रूचा आंत प्रवेश होणें अशक्य होतें. जर फितुरी झाली तरच किंवा अन्नधान्य संपलें तरच किल्ला जिंकणें खलजीला शक्य होतें. एरवी अशक्य. किल्ल्यांत धान्याच्या पोत्यांची थडी लागलेली होती. लढाईच्या घाई गर्दींतच तटाबाहेर व्यापाऱ्यांनी आणून टाकलेलीं हीं पोतीं राजाने भराभरा गडांत घेतलीं होतीं.

बाणांचा मारा वरून खलजी सैन्यावर व खलजी सैन्याकडून गडावर सतत होत होता. उल्का तुटाव्या तसे बाण सरसरत होते. दहा बारा दिवस वेढा नेटाने चालू होता. एवढ्यांत एक बातमी रामदेवरावाच्या कानांत सांगितली गेली. ती ऐकून रामदेवरावाची छातीच दडपली. 'किल्ल्यांत भरलेलीं पोतीं धान्याचीं नसून त्यांत फक्त मीठच भरलेलें आहे' अशी ती बातमी होती[२]!! धान्य फक्त दोन चार दिवस पुरेल इतकेंच गडावर शिल्लक होतें! रामदेवरावाचा हात कपाळाशीं गेला!

सैन्य जागेवर नाही, धान्याचा खडखडाट, शत्रु असा भयंकर आणि मदतीची आशाच नाही हें पाहून राजा अगदी हतबुद्ध झाला. कांही कांही उपाय सुचेना. मार्ग सापडेना. मागून येणारा प्रत्येक क्षण मरणाच्या दाढेकडे गचांड्या देत नेऊं लागला. शिवाय दिल्लीहून येत असलेली प्रचंड फौज आधीपासूनच मृत्यूचा धाक घालीत होती. रामदेवरावास आता केवळ सर्वनाश दिसूं लागला. खूप विचार करूनहि मार्ग सापडेना. निरुपाय झाला. आता उरला फक्त एकच मार्ग. बिनशर्त शरणागती!

मोठ्या कठोर मनाने रामदेवरावाने अल्लाउद्दिनास कळविलें की, मी तुम्हास शरण आहें! मी तहास तयार आहें!

आणि पठाणांच्या फौजेंत फत्ते मुबारकीचा जल्लोष उडाला.

सम्राट् रामचंद्रदेव यादव नजरनजराणे घेऊन अल्लाउद्दिनाच्या छावणींत जातीने शरण गेला! महाराष्ट्राचा हा पहिला अपमान! ही पहिली शरणागती!

तहांत अल्लाउद्दिनाने मागणी केली की, 'पन्नास मण सोनें व जड-जवाहीर आमच्या पदरांत टाका! शिवाय आम्हीं केलेली देवगिरीची लूट आम्ही नेणारच! आमची मागणी आमच्या पदरांत पडली तर दोन दिवसांत आम्ही निघून जाऊं अन् जर कबूल नसेल, तर'....!

राजा रामदेवाने मागणी एकदम कबूल केली!

तह ठरला अन् रामदेवराव किल्ल्यावर परतला.

आणि तेवढ्यांत........

रामदेवरावास बातमी आली की, आपला युवराज शंकरदेव यादव खूप मोठी सेना घेऊन देवगिरीस तातडीने दौडत येत आहे. ही बातमी अल्लाउद्दिनासहि त्याच्या छावणींत समजली. अल्लाउद्दिनाच्या तोंडचें पाणीच पळालें.

दिल्लीचा अल्लाउद्दीन खलजी देवगिरीस आला असल्याची खबर युवराज शंकरदेवास समजतांच तो ताबडतोब सैन्यासह देवगिरिकडे दौडत निघाला. मूठभर सैन्याने खास आपल्या राजधानीचें वस्त्रहरण केलेलें ऐकून तो तरुण शूर राजपुत्र चवताळलाच. अपमान धुऊन काढण्यासाठी तो धावून निघाला. त्याच्यापाशी सैन्यहि खूप प्रचंड होतें.

राजपुत्र येत आहे आणि अगदी जवळ येऊन पोहोचला आहे हें समजतांच अल्लाउद्दिनाला आपलें मरण अगदी स्पष्ट दिसूं लागलें. पण तो डगमगला मात्र नाही. त्याने लढाईची तयारी केली. जिहाद!

घाबरून गेले राजे रामदेवराव. आपला मुलगा आता भावनेच्या भरांत अल्लाउद्दिनावर चालून येऊन हल्ला चढवितो की काय, अशी काळजी त्यांना लागली! कारण दिल्लीहून फार मोठी यवनसेना देवगिरिकडे येत

आहे ना ! त्या फौजेपुढे आपण मरूं ना ! रामदेव आता मैत्रीचा तह आणि शांतता[२] टिकविण्यासाठी, अल्लाउद्दिनाच्या रक्षणाकरिता तळमळूं लागला ! त्याने घाईघाईने आपला दूत शंकरदेवाकडे पाठविला[२]. शंकरदेव दौडत येत होता. तो देवगिरीपासून थोड्या अंतरावर येऊन पोहोचला. एवढ्यांत त्याला दूताने राजाचा निरोप सांगितला की, आपला व खलजीचा तह झालेला आहे. खंडणी व फक्त लूट घेऊन खलजी निघून जाण्यास तयार आहे. तरी तूं त्याच्यावर हल्ला चढवूं नकोस. भांडण वाढवूं नकोस. कारण दिल्लीहून फार मोठी फौज मागोमाग येत आहे[२] !

बापाचा हा निरोप शंकरदेवाला मिळाला. त्याने बापाचा निरोप साफ धुडकावून लावला[२]. तो चिडलाच फार. लूट केलेलें धन आणि वर खंडणी देऊन शत्रूला माघारी घालवणें म्हणजे तेल ओतून वणवा विझविण्याचा प्रयत्न करणें ! शंकरदेवाने उलट अल्लाउद्दिनालाच असा झणझणीत निरोप पाठविला की, 'तुला आपल्या जीवाची पर्वा असेल तर यादवराज्यांत केलेली लूट आमच्या स्वाधीन कर आणि असाच्या असा मुकाट्याने चालता हो[२] ! नाही तर मारला जाशील !'

हा तिखट निरोप खलजीला मिळाला. तो चरकलाच. पण त्याने लढाईचीच तयारी केली. अत्यंत बिकट प्रसंगींहि अल्लाउद्दीन खलजी अत्यंत योजनाबद्ध व शिस्तबद्ध वागत असे. तो जीवावर उदार होऊन पण कुशलतेने व धैर्याने योजना करूं लागला. त्याने एक हजार स्वार अगदी तावडतोब किल्ल्याच्या नाकेबंदीसाठी धाडले आणि उरलेली फौज स्वतः पाठीशीं घेऊन तो शंकरदेवावर चालून निघाला[२]. जिहाद !

शंकरदेवहि संतापून खलजीवर चालून आला. लढाई भडकली. शंकरदेव व त्याची सेना शर्थीने लढूं लागली. त्याची खात्री होती की, आपण खलजीला झोडपणार. तसेंच होऊं लागलें ! खलजीची फौज

चौफेर मारा खाऊं लागली.[२] या वेळीं रणधुमाळी मनस्वी उसळली. उन्हाळ्याचे दिवस होते. फुपाटा फार होता. थैमान घालणाऱ्या घोड्यांच्या टापांनी धूळ उंच उसळत होती. आरपारचें स्पष्टसें दिसेनासें झालें होतें. खलजी यादवांच्या पराक्रमाने भाजून निघत होता. त्याच्या मरणाचा क्षण जवळ येऊं लागला होता. पळूनहि सुटका होणें अशक्य होतें. आता? इतक्यांत........

किल्ल्याच्या नाकेबंदीला पाठविलेली पहिली एक हजार अफगाणांची फौज खलजीच्या मदतीला धावली! ती दौडत ओरडत येत होती. त्यामुळे धुळीचे लोट गगनाला भिडले. त्यांच्या रणगर्जनांनी अस्मानाचा घुमट घुमूं लागला. यादवसेनेला धुरळ्याचे लोट दिसले. आरोळ्या ऐकूं आल्या. फौज अस्पष्ट दिसली. यादवांना वाटलें, दिल्लीची मागाहून येत असलेली अफाट अफाट फौज ती हीच! आली! आणि शंकरदेव यादवाच्या गळ्यांत जवळ जवळ पूर्णपणें पडलेली विजयाची माळ तुटली! आणि यादवसेना घाबरून आठहि दिशांना सैरावरा पळत सुटली![२] पराभव! प्रचंड पराभव! विनाकारण पराभव! आणि उरलेल्यांची कत्तल! ( दि. ६ फेब्रुवारी १२९४, शनिवार. )[५]

रामदेवराव किल्ल्यांतून शंकरदेवाच्या मदतीस आला नाही. खलजीच्या अफवांनी गांगरून तो किल्ल्यांतच बसला. तो जर मदतीला आला असता तर अल्लाउद्दीन फौजेसकट खलास झाला असता.

अल्लाउद्दिनाने शंकरदेवाचा पाठलाग केला नाही. त्याने लगेच पुन्हा देवागिरीगडाला वेढा घातला.[२] त्यामुळे रामदेवराव जास्तच पेचांत पडला. त्याने मुठीत नाक धरून खलजीकडे तहाची याचना केली. खलजीने आपली झांकलेली मूठ झांकूनच ठेवली व आव सव्वा लाखाच्यावर आणला! तो तहाला तयार झाला, पण अरेरावीने! त्याने अवाच्या सव्वा खंडणी मागितली. रामदेवाने ती मुकाट्याने मान्य करून त्याला

दिली.[९] एकूण सहाशे मण सोनें, सात मण मोती, दोन मण हिरेमाणकें, एक हजार मण चांदी आणि रेशमी कापडाचे चार हजार ठाण व पठाणांनी केलेली लूट अल्लाउद्दीन खलजीच्या पदरांत पडली!!! शिवाय अत्यंत मौल्यवान् वस्तूंची एक लांबलचक यादी अल्लाउद्दिनाने रामदेवरावापुढे टाकली व त्या वस्तूंची मागणी केली. रामदेवाने ती सुद्धा पूर्ण केली![९] केवढी ही अफाट सम्पत्ति! गेली! एवढ्या मोठ्या सम्पत्तीवर फेरीष्याचा तर विश्वासहि बसेना.[९]

याशिवाय वार्षिक खंडणी रामदेवाने द्यावयाची व अल्लाउद्दिनाच्या या स्वारीचा खर्चहि एलिचपूर परगण्याच्या रूपाने रामदेवरावानेच द्यावयाचा! दिला सुद्धां[१०]!!

महाराष्ट्राची समृद्ध, सुंदर, प्रबळ, प्राचीन आणि प्रख्यात राजधानी अवघ्या आठ हजार अफगाणांनी पांचशे कोसांवरून येऊन पंधरा दिवसांत नग्न केली!

ही सर्व सम्पत्ति, हत्ती, उंट व घोडे यांवर लादून मोठ्या रुबाबांत अल्लाउद्दिनाने देवगिरी सोडली.[२] महाराष्ट्राच्या सोन्याच्या द्वारकेंतील लक्ष्मी तो बांधून आवळून घेऊन गेला!

* * *

---

**आधारः**—(१) ज्ञानेश्वर चरित्र–ल. रा. पांगारकर, पृ. ६. (२) BOMBAY GAZ Vol; I, Part II, Page 530–31. (३) खलजीचा भा. पृ. ३०. (४) खलजी भा. पृ. २९. (५) मंडळ अ. १८३४, पृ १३५. (६) मसांइ, पृ. १५५. (७) BOMBAY GAZ Vol; I, Part II, Page 250. (८) बराइ पृ. ५. (९) खलजी भा. पृ. २२८, BOMBAY GAZ Vol; I, Part II, Page 531. (१०) BOMBAY GAZ Vol; I, Part II, Page 251–52.



# ४ : द्वारका बुडाली

यादवांच्या गरुडाचीं पिसें झडलीं! देवगिरीचा दरारा आणि दिमाख पंधरा दिवसांत नाहीसा झाला. सिंहासनाधीश्वर सम्राट् यादवांनी खंडणी दिली! शत्रूचा येण्याजाण्याचा खर्चहि दिला! लूट नेऊं दिली! वार्षिक खंडणी कबूल केली. खंडणी म्हणजे दौर्बल्याचा दंडच! केवढी बेइज्जत! देवगिरीचें वस्त्रहरण झालें!

एक वर्ष लोटलें. दुसऱ्या वर्षीची खंडणी देवगिरीहून बिनबोभाट दिल्लीला रवाना झाली.

आणि याच वर्षी दिल्लीचें तख्त रक्ताने लाल झालें. सुलतान जलालुद्दीन खलजीचा अल्लाउद्दीनाने दगाबाजीने खून पाडला. (दि. १९ जुलै १२९५) आणि तो स्वतःच सुलतान बनला.[1] सुलतान जलालुद्दीन हा अल्लाउद्दिनाचा काका होता. त्यानेच अल्लाउद्दिनाचें जन्मापासून पालनपोषण केलें. कऱ्हा माणिकपूरची सुभेदारी दिली. सेनाधिकार दिला. इतकेंच नव्हे तर आपली मुलगी देऊन जलालुद्दिनाने त्याला आपला जावई करून घेतलें. म्हणजे अल्लाउद्दीन आपल्या चुलत बहिणीचा नवरा आणि काकाचा जावई होता![2] त्याच उपकारकर्त्या काकाचा ऊर्फ सासऱ्याचा त्याने दग्याने सहज खून पाडला!

यानंतर तिसऱ्या वर्षीचा खंडणीचा लोट देवगिरीहून दिल्लीकडे निमूटपणें वाहत गेला. एकदा झालेली ही जखम वाहतच होती.

तेवढ्यांत महाराष्ट्राला आणखी एक मुकी जखम झाली.

शके १२१८ ची कार्तिक शुद्ध एकादशी ( दि. ८ ऑक्टोबर १२९६ ). पंढरपुरांत दिंड्यापताकांची दाटी झाली. सर्व संतसमुदाय जमा झाला. आळंदीचीं तीं चार भावंडें त्यांत होतींच. ज्ञानेश्वरांनी पांडुरंगाचें दर्शन घेतलें. हें अखेरचें दर्शन ! ह्या अखेरच्या गाठीभेटी ! पांडुरंगाच्या पायीं मिठी मारून ज्ञानेशांनी म्हटलें,[3]

‘ देवा, मी आता समाधि घेणार ! आज्ञा द्या ! मला आशीर्वाद द्या ! ’

वीणेच्या तारा थरारल्या ! ज्ञानेश्वर समाधि घेणार ? वयाच्या अवघ्या बाविसाव्या वर्षी ? होय ! त्यांनी तसा निर्धारच पांडुरंगापुढे बोलून दाखविला. जिवंत समाधि ! अवघे संत भवती होते. ते हा निर्णय ऐकून विरघळले. ज्ञानेश्वर जाणार ! चालले ! निघाले ! लळा लावून कायमचे निघून चालले !

पंढरीचा, चंद्रभागेचा आणि पांडुरंगाचा निरोप घेऊन ज्ञानेश आळंदीला निघाले. त्यांच्या मागोमाग भरल्या लोचनांनी आणि थरथरल्या ओठांनी सर्व संत मंडळीहि निघाली.

इंद्रायणीतीरीं आळंदीस सर्वजण येऊन पोहोंचले.

शकें १२१८ ची कार्तिक वद्य एकादशी उजाडली ( बुधवार दि. २४ ऑक्टोबर १२९६, ). सर्व संतांच्या समवेत ज्ञानेश्वर भजन-पूजन-कीर्तनांत रंगून गेले. एकच संग, एकच रंग, राम-कृष्ण-पांडुरंग !

द्वादशी उजाडली. ज्ञानेशांनी स्नानासाठी इंद्रायणी नदीच्या प्रवाहांत पाऊल टाकलें. तिला ज्ञानेश पुन्हा कधीहि दिसणार नव्हते. इंद्रायणीचा गळा दाटून आला. ती त्यांच्या पावलांना बिलगली.

माध्यान्ह काळ झाला. सूर्य माथ्यावरून ढळला. सूर्योदयानंतर एकवीस घटकांनी त्रयोदशी लागली. संतांच्या सुखसरोवराचा बांध फुटला. त्यांच्या डोळ्यांतून घळघळा पाणी वाहूं लागलें. निवृत्तिनाथांना

आपल्या लाडक्या भावाचा वियोग साहवेना. निवृत्तींच्या मनाची उलघाल नामदेवांना पाहवेना.

'नामा म्हणे, देवा! पेटला हुताशन! करा समाधान निवृत्तीचें!'

ते पांडुरंगाला कळवळून म्हणाले. लहानग्या सोपानमुक्ताईची काय अवस्था सांगावी? तीं बाळें स्फुंदस्फुंदून रडूं लागलीं. सर्वच संतांच्या अंतरीं प्रलय उडाला. कुणीं कुणाचें सांत्वन करायचें? विटेवरचें परब्रह्महि गहिवरलें.

समाधीची जागा सिद्ध होती. सिद्धेश्वराच्या समोर नंदीमागे भूमीच्या पोटांत विवर होतें. आंत तुळशी बेल आंथरून आसन सिद्ध केलेलें होतें.

समाधीचा क्षण आला. ज्ञानेश पूर्ण प्रसन्न होते. तेथे हर्षखेद उरलाच नव्हता. होता तो अमृतानुभव, सत् चित् आनंद! विवरावरची शिळा बाजूला झाली. तुळशीमाळा धारण केलेले ज्ञानेश उठले. त्यांनीं निवृत्तींच्या पावलांवर मस्तक ठेवलें. सर्वांना नमस्कार केला. भावंडांचा निरोप घेतला आणि विवरांत पाऊल टाकलें. निवृत्तींनी हाताला धरून ज्ञानेशांना विवरांतील बिल्वासनावर नेऊन बसविलें. ज्ञानराजांनी उत्तराभिमुख पद्मासन घालून नेत्र मिटले अन् त्रिवार वंदन केलें.

'ज्ञानदेव म्हणे, सुखी केलें देवा, पादपद्मीं ठेवा, निरंतर!'

आणि उरला ॐकार! निवृत्तिनाथ बाहेर आले आणि त्यांनी, 'घातियेली शिळा समाधीसी!' (दि. २५ ऑक्टोबर १२९६, गुरुवारीं दुपारीं तीन वाजतां). समाधि बंद झाली![४] महाराष्ट्राचा आणि यादवांचा आशीर्वाद अंतर्धान पावला! यादवराज्यांतून सरस्वती उठून गेली!

निवृत्तिनाथांनी विठ्ठलाच्या गळ्याला मिठी मारून मान टाकली. मुक्ताईने धाय मोकलली आणि सोपानदेवांनी भुईवर अंग टाकलें.

'नामा म्हणे, संत कासावीस सारे, लाविती पदर, डोळीयांसी!'

दा. क्र. ९८७५

ज्ञानेशांच्या मागोमाग आठ महिन्यांच्या अंत बाकीचीं भावंडेंहि परब्रह्मांत विलीन झालीं.[५] दोन महिन्यांनी ( दि. २३ डिसेंबर १२९६ ) सोपानदेवांनी सासवडास समाधि घेतली. उदास झालेल्या मुक्ताबाईनीहि अनंताकडे प्रयाण केलें ( दि. १९ मे १२९७ ). निवृत्तिनाथहि त्र्यंबकेश्वर येथे विठ्ठलरूप झाले ( दि. १७ जून १२९७ ).

महाराष्ट्राचें मातृप्रेम हरवलें !

आणि दिल्लींत एका नव्या मोहिमेची टोलेजंग तयारी अल्लाउद्दिनाने सुरू केली. काळेभोर छत्र अफगाणी लष्करांत उभारलें गेलें.[६] अल्लाउद्दीन खलजीच्या राज्याची निशाणी म्हणजे हें काळें छत्र ![६]

फौजा दिल्लींतून बाहेर पडल्या ( दि. २८ जानेवारी १३०३ ). आणि चितोडवर धाड पडली. अल्लाउद्दीन खलजीने गेल्या गेल्याच छत्रवारी नांवाची टेकडी कबजांत घेतली व टेकडीवर बसून तो फौजेच्या हालचालीचे हुकूम सोडूं लागला. त्याच्या सान्निध अमीर खुसरो हा दरबारी तवारीखनवीस कवि हजर होता.[६]

चितोडवर प्राणांतिक संकट आलें. चितोडगड अत्यंत मोठा व अजिंक्य होता. 'गढमें गढ चितोडगढ, और बाकी सब गढीया !' अशी त्याची ख्याति होती. रजपुतांची चितोडवर अयोध्येइतकी भक्ति होती.

चितोडवर अल्लाउद्दिनाने हल्ला चढविला. घनघोर संग्राम सुरू झाला. हजारो रजपूत शर्थीने लढूं लागले. घराणींच्या घराणीं ठार होऊं लागलीं. खुद्द राजा रत्नसिंह रावळ ठार झाला. सिसोद्याचा राणा लक्ष्मणसिंह आपल्या आठहि पुत्रांसह लढत होता. त्यांच्यापैकी अजयसिंह नांवाचा एक पुत्र भयंकर जखमी होऊन पडल्यामुळे रजपुतांनी त्याला उचलून सुरक्षित स्थळीं पळविलें. तो अजयसिंह वांचला. बाकीचे सात भाऊ आणि बाप लक्ष्मणसिंह ठार झाले.[७] हजारो रजपुतांनी चितोड

चितोड करीत रणांगणावर देह ठेवले. सहा महिने हा संग्राम चालला होता. अखेर चितोड पडला ! रजपुतांची अयोध्या बुडाली ! !

चितोडच्या शिखरावर एकदम धुराचे प्रचंड लोट उठले ! हा धूर कशाचा ?

हा धूर यज्ञाचा ! हजारो तरुण व सुंदर रजपूत रमणींच्या आत्म-यज्ञाचा हा धूर ! रजपूतकुलांच्या प्रतिष्ठेकरितां व पावित्र्याकरितां रजपूत युवतींनी स्वतः होऊन हा यज्ञ चेतविला व त्यांत उड्या टाकल्या ! चितोडचा हा पहिला जोहार ! ( दि. २५ ऑगस्ट १३०३. )

अल्लाउद्दीन वखवखलेल्या उत्सुकतेने चितोडगडांत घुसला. त्याला हा भडकलेला ज्वालामुखी दिसला. सर्व सुंदर तरुणींनी ही आग भडकवून त्यांत उड्या टाकल्याचें त्याला समजलें. अल्लाउद्दीन भयंकर चिडला. आगीच्या अंतःपुरांत शिरलेली एकहि स्त्री त्याच्या हातीं लागणें आता अशक्य होतें. स्त्रिया जळत होत्या. अश्रूचा एकहि थेंब बाहेर पडूं न देतां ! अश्रूने अग्नीची दाहकता कमी होऊं नये म्हणून !

चिडलेल्या खलजीने गडावरती उरलेल्या सर्व आबालवृद्धांची कत्तल केली. एकूण तीस हजार माणसें त्याने कापलीं [६] ( दि. २५ ऑगस्ट १३०३. )

रजपुतांची अयोध्या बुडाली ! रक्तांत बुडाली !

आणि तीच पाळी आली लौकरच मराठ्यांच्या द्वारकेवर !

जबरदस्त वार्षिक खंडणी दर वर्षीं देवगिरीहून नम्रतापूर्वक दिल्लीस जात होती.

पण देवगिरीच्या स्वाभिमानाने एकदम उसळी मारली. दिल्लीला जाणारा वार्षिक खंडणीचा असह्य ओघ एकदम थांबला ! राजा रामदेवाने व युवराज शंकरदेवाने दिल्लीला एक कवडीहि पाठवावयाची नाही असें ठरविलें.[८]

महाराष्ट्राची वाहती जखम थांबली !

पण खपली बसायच्या आंतच दुसरी कुऱ्हाड कोसळली.

खंडणी बंद होतांच तीस हजार फौज घेऊन अल्लाउद्दिनाचा अत्यंत क्रूर सेनापति मलिक नायब काफूर हजार दिनारी हा देवगिरीवर येऊन कोसळला ! रामदेव आणि शंकरदेव देवगिरींतून फौजा घेऊन उठले. देवगिरीच्या देवांची आणि दिल्लीच्या दानवांची घनघोर झुंज जुंपली. शंकरदेव व रामदेव कमालीच्या शौर्याने लढूं लागले.

आणि तरीहि देवांचा सडकून पराभव झाला !

यादवसेना दाही दिशांना पळत सुटली. उरलेल्यांची कत्तल उडाली. शंकरदेवहि सुन्न होऊन निरुपायाने पळत सुटला.

अन् त्यांतच एक भयंकर रामायण घडलें ! प्रत्यक्ष राजा रामदेवरावच मलिक काफूरच्या हातीं सापडला ! देवगिरीच्या गरुडध्वजाने हें दुसरें दुर्दैव पाहिलें ! अनन्वित अत्याचार प्रजेवर करून, अपरंपार लूटमार करून आणि राजाला कैदी बनवून मलिक काफूर मोठ्या उन्मादांत दिल्लीकडे दौडत गेला. शंकरदेवाच्या आणि प्रजेच्या देखत राजाला तो घेऊन गेला. कोणीहि कांहीहि करूं शकलें नाहीं ! ( शनिवार दि. २४ मार्च १३०७. )

कां झाला असा पराभव ? काय कमी पडलें ? शस्त्रास्त्रें कमी पडलीं ? इतर युद्धसाहित्य कमी पडलें ? सैन्य कमी पडलें ? शौर्य ? नैतिक बळ ?

यांपैकी कांहीच कमी पडलें नाही. मलिक काफूरपेक्षाहि या गोष्टी यादवांपाशी ओतप्रोत होत्या. मलिक काफूरचा नीतीशीं काय संबंध होता ? तरीहि त्याचाच जय झाला ! मग काय कमी पडलें यादवांकडे ?

कमी पडला आत्मविश्वास ! कमी पडला निर्धार ! शिस्त ! योजनाबद्धता ! कडवेपणा ! अन् कमी पडलें नेतृत्व ! आणि म्हणूनच शस्त्रास्त्रें असूनहि पराभव ! शौर्य असूनहि पराभव ! सर्व अनुकूलता असूनहि

अखेर पराभव ! प्रौढप्रताप चक्रवर्ती एकांगवीरअभिधान देवगिरिविरपुरंदर सकलगुणनिधान महाराजाधिराज श्रीरामचंद्रदेव रानटी अफगाणांचा कैदी बनला !

मौल्यवान् लूट आणि मौल्यवान् कैदी घेऊन मलिक काफूर दिल्लींत दाखल झाला. अल्लाउद्दीन मलिक काफूरवर निहायत खूष झाला. दिल्लींतल्या तुरुंगांत महाराजा रामदेवरावाची रवानगी झाली. साऱ्या अफाट लुटीची अल्लाउद्दीनाच्या खजिन्यांत रास पडली.

आणि इतिहासांत महाराष्ट्राच्या बेइज्जतीची ही आणखी एक नोंद झाली !

सहा महिने राजा रामदेवराव कैदेंत होता. नंतर अल्लाउद्दिनाने पुन्हा त्याच्याकडून ' वार्षिक खंडणी न चुकतां धाडीन ! ' असें कबूल करवून घेतलें आणि त्याला सोडून दिलें.[१०]

रामदेवराव शरीराने व मनाने अगदी खंगून गेला. कोणीकडे तें सार्वभौम परम वैभव आणि कोणीकडे ही चोर-दरवडेखोरांची मांडलिकी ! ज्ञानेश्वरांनीहि स्तुति करावी असा हा महाराष्ट्रभूपति अब्रूनिशी लुटला गेला.

थकलेला सुकलेला रामदेवराव देवगिरीस परत आला. पुन्हा खंडणीचा वार्षिक हप्ता दिल्लीला रवाना झाला. शंकरदेवाला हें सहन होत नव्हतें. त्याचें मानी क्षत्रिय मन तगमगत होतें. प्रजेची लूटमार, तिच्यावरचे अत्याचार अन् बलात्कार, युद्धांत दोनदा पराभव, वडिलांची कैद, यादवांच्या सार्वभौम सिंहासनाचा घोर अपमान आणि वार्षिक खंडणीचा कलंक शंकरदेवाला असह्य होत होता. त्याच्यापुढे प्रश्न होता, हें असें किती दिवस चालायचें ?

यानंतर एकच वर्षाने रामदेवराव मरण पावला ( इ. स. १३०९. )

शंकरदेव यादवास देवगिरीच्या सिंहासनावर राज्याभिषेक झाला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
५५
अनुक्रम २४४७६ दि:
ग्रंथांक ८६४ दिनांक
72-2-५०

आणि तावडतोब त्याने दिल्लीला जाणारी खंडणी बंद केली (इ. स. १३०९).

सुलतान अल्लाउद्दिनाचे डोळे देवगिरीवर वटारले गेले. पण त्याने शंकरदेवाला चांगलेंच ओळखलेलें होतें. या पराक्रमी पोराच्या तडाख्यांतून पूर्वी केवळ नशिबानेच आपण मरतां मरतां वांचलों हें तो विसरलेला नव्हता. अल्लाउद्दिनानें खंडणीकरितां तीन वर्षें वाट पाहिली. शंकरदेवाने एक फुटकी कवडीहि पाठविली नाही !

अन् मग अल्लाउद्दिनाने अफाट फौजेची मोहीम मांडली. देवगिरीची दौलत साफ रसातळाला नेण्याच्या निश्चयाने जंगी फौज सज्ज झाली. अफगाणी फौजेचा समुद्रच जणू ! अल्लाउद्दिनाने मलिक काफूरलाच पुन्हा सेनापतिपद दिलें. अल्लाउद्दिनाचा जीहादचा हुकूम सुटला आणि या अफाट सेनासागराच्या प्रलयंकारी लाटा देवगिरीवर गर्जत, रोरावत सुटल्या ! दीन् दीन् दीन् !

लाटा महाराष्ट्रांत घुसल्या. अनन्वित अत्याचार, कत्तली व विध्वंस सुरू झाला. देवगिरीवर या लाटांची धडक आली. शंकरदेवहि युद्धास निघाला. तो महाप्रतापी होता. अत्यंत उग्र स्वाभिमानी होता. शिवाच्या तांडवासारखा तो लढूं लागला. पण अखेर बळ अपुरें पडल ! काणतें बळ ? निष्ठेचें बळ कमी पडलें. करार कमी पडला. हट्ट कमी पडला. मलिकच्या फौजेंत जोष आणि घोष होता जीहादचा. यादवांच्या फौजेंत होती ती फक्त स्वामिनिष्ठा. जीहादच्या सामर्थ्यापुढे स्वामिनिष्ठा तोकडी पडली. कारण ती फक्त एका जिवंत व्यक्तीपुरती होती. अस्मितेसाठी लढणाऱ्या एका सामान्य माणसांतहि हजार हत्तींचें बळ असतें. अस्मिताच जागी नसेल तर जोष यावा कोठून ?

शंकरदेव मराठ्यांच्या क्षात्रधर्माला शोभेसा लढत होता. रणांगण वणव्यासारखें भडकलें होतें. मुंडकीं उडत होतीं. रक्त खळाळत होतें.

अन् घात झाला ! महाराष्ट्राच्या वर्मी घाव बसला ! शंकरदेव ठार झाला[८] ! मलिक काफूरने त्याला मारलें. महाप्रलय उडाला ! पृथ्वी आक्रंदूं लागली. शेष डळमळला. कत्तल सुरू झाली. देवगिरीवर मलिक चढला. महाराष्ट्राच्या वैभवाचा, स्वातंत्र्याचा, सद्धर्माचा, सुसंस्कृतीचा, दराऱ्याचा तो गरुडध्वज कडाड्कन् मोडून पडला ! पंख तुटले ! मुंडकें उडालें ! सोन्याचें सिंहासन कोलमडलें. आग उसळली. मंदिरें फुटलीं. राजप्रासादांतील अपरंपार संपत्ति फरपटत बाहेर आली. आसूड कडाडले. अत्याचारांच्या लाटा उंच उंच चढूं लागल्या. रक्ताचें तुषार उडूं लागले. लाटा चौफेर फेसाळून देवगिरीला घेरघेरून पोटांत ओढूं लागल्या. स्वातंत्र्याचा शेवटचा आक्रोश उठला. कणा मोडला आणि महाराष्ट्राची सोन्याची द्वारका बुडाली ! राजा, राजसिंहासन, राजसभा, छत्र, सैन्य, सेनापति आणि ध्वजासह महाराष्ट्राची सोन्याची द्वारका बुडाली ! ! देवगिरी बुडाली ! ! उरले फक्त बुडबुडे !

* * *

---

**आधार :**—( १ ) BOMBAY GAZ; Vol I, Part II, Page 531 ( २ ) खलजी भा. पृ. २९. ( ३ ) ज्ञानेश्वरचरित्र पांगारकर पृ. १२०. (४) ज्ञानेश्वरचरित्र पृ. १२८. ( ५ ) श्रीक्षेत्र आळंदी पृ. १८. ( ६ ) खलजी भा. पृ. १६०. ( ७ ) राजस्थान इ. पृ. १३७६-७७. ( ८ ) BOMBAY GAZ; Vol I, Part II, Page 251-252. ( ९ ) खलजी भा. पृ. १६१. (१०) BOMBAY GAZ; Vol I, Part II, Page 532.



## ५ : दोनशे वर्षांची काळरात्र

नंदनवनाचें रणांगण बनलें. मलिक काफूरने महाराष्ट्रांत वणवे पेटविले. सुखी संसारांतील पांखरें होरपळून मरूं लागलीं. आकांत उडाला. तेराशे वर्षें राजांनी आणि प्रजाजनांनी खडतर तपश्चर्या करून निर्माण केलेलें महाराष्ट्राचें वैभव वैऱ्यांनी पायाखाली तुडवलें. आर्त किंकाळ्यांनी दिशा कोंदल्या. माणसांचा खाटीकखाना सुरू झाला. सैतानांनी संहार मांडले. जेथे मंत्रपुष्पांची वृष्टि होत होती, तेथे मांस-खंडांची वृष्टि होऊं लागली. जेथे वेदध्वनि निनादत होते तेथे सैतानांचें हास्य घुमूं लागलें. घणांच्या घावांखाली अत्यंत सुंदर सुंदर मूर्तींच्या ठिकऱ्या उडूं लागल्या. शंभर शंभर वर्षें खोदकाम करून निर्मिलेली स्वर्गीय शिल्पकला धडाधड कोसळूं लागली. गृहिणींच्या प्रेमळ हातचे गोग्रास खाणाऱ्या गाई हंबरडे फोडीत मरूं लागल्या. गोग्रास संपले. सैतानच गो-ग्रास गिळूं लागले! गो-ग्रासाच्या मेजवान्या झडूं लागल्या! नद्यांचीं उदकें रक्ताळलीं. ज्ञानेश्वरांच्या महाराष्ट्रकुळींत, कल्पतरूंच्या अरवांत, पीयूषाच्या अर्णवांत, चेतनाचिंतामणीच्या गावांत, काय हे भयंकर प्रकार! महाराष्ट्राचें रूप होतें कसें! आणि आता हें झालें कसें!

तारुण्य आणि सौंदर्य हे महाराष्ट्राच्या लेकीसुनांचे अपराध ठरावेत काय? कोणाहि हैवानाने त्यांच्या घरांत घुसावें, कोणालाहि ठार करावें, त्यांचीं मनगटें पकडावींत....!

तो हंबरडा ऐकायला वाली उरला नाही. दुःखाला क्षितिज राहिलें

नाही. हाल, दुःख, बेअब्रू....माणुसकीच संपली. गोकुळाचें स्मशान झालें. सैतानांची सल्तनत सुरू झाली. पारतंत्र्याची काळीकुट्ट रात्र पसरली. तरुणींच्या, अर्भकांच्या अन् वृद्धांच्या टाहोंनी काळोखहि गुदमरला. पण अल्लाउद्दिनाचा मात्र मलिक काफूरला खास हुकूम होता.[१]

"सैनिकों के अपराधों पर तथा अपहरण पर कोई भी ध्यान न देना!"

सुलतानी सैनिकांनी कोणतेहि गुन्हे केले किंवा स्त्रियांचीं अपहरणें केलीं तरी तूं मुळींच लक्ष देऊं नकोस! आणि मग मलिकच्या उत्साहाला सीमाच राहिली नाही. ऐकवेना! पाहवेना! सोसवेना! क्रूर वैऱ्यांच्या कामाग्नींत आणि क्रोधाग्नींत रोज नव्या नव्या समिधा पडूं लागल्या. प्रत्येक दिवस नाशाचा उगवत होता.

अल्लाउद्दीन दिल्लींत होता. त्याला जलोदर झाला होता.[२] मरणाच्या सरहद्दीवर त्याच्या अखेरच्या मुक्कामाचा तंबू उभा होता. पण तेथेहि त्याच्या क्रौर्याला उधाणच आलें होतें.[३] त्याने आपलें मरण ओळखून महाराष्ट्रांतून मलिक काफूरला दिल्लीला बोलावले. मलिक काफूर हा अल्लाउद्दिनाचा अत्यंत 'लाडका' गुलाम होता![४]

मलिकने महाराष्ट्रांत फौज व अंमलदार ठेवले व तो दिल्लीस गेला. मराठ्यांवर त्या पिसाट अंमलदारांची छळवादी जहाँदारी सुरू झाली. छळ आणि नाश हींच त्यांच्या सत्तेचीं आदितत्त्वें! सुलतानशाही अशीच चालायची! अशीच? किती दिवस? मराठ्यांतील चीड, स्वाभिमान, शौर्य, पौरुष संपलें? तारुण्य संपलें? की तरुणच संपले?

नाही! ते जिवंत होते. जागे होते. आणि तेवढ्यांत उडालाच एक फुलता निखारा! तो आतापर्यंत राखेंत दबलेला होता. त्याचें नांव हरपालदेव. प्रत्यक्ष रामदेवराव यादवाच्या मुलीचा नवरा. सूडासाठी त्याने तलवार उपसली. आणि मग हजारो तलवारी त्याच्या निशाणा-

खाली जमा झाल्या. हरपालदेवाने एकदम बंडाचा भडका उडविला. देवगिरी जिंकली! दिल्लीस जाण्यापूर्वी मलिकने मागे ठेवलेल्या फौजांचा त्याने साफ फन्ना उडविला. दिल्लीवाले सुभेदार अंमलदार पटापटा मेले. जे जगले वांचले, ते दिल्लीकडे पळत सुटले.[५] हरपालाने पुरेपूर सूड घेतला. हरपालदेवाने खलजींची सत्ता पार उखडून काढली.[६] संपूर्ण महाराष्ट्र पुन्हा स्वतंत्र झाला!

तेवढ्यांत दिल्लींत अल्लाउद्दीन मेला[५] (दि. १९ डिसेंबर १३१६). दिल्लींत सुलतानी संस्कृतीला साजेसा इतिहास घडूं लागला. सत्तेकरितां गळेकापी सुरू झाली. डोळे फुटूं लागले. खुद्द अल्लाउद्दिनाचीं पोरें आंधळीं होऊं लागलीं. अल्लाउद्दिनाच्या मृत्यूनंतर बरोबर पस्तिसाव्या दिवशीं (दि. २२ जानेवारी १३१७) मलिक काफूरचाहि खून पडला.[७] यमदूताहून भयंकर असा हा इसम होता.[८] पण असा कोण नव्हता! सगळेच तसे होते. अखेर या विषमंथनांतून एक सर्वांत जालीम जहर बाहेर पडलें. सर्वांहून भयंकर असा एक प्राणी सुलतान झाला. कुतुबुद्दीन मुबारीकखान खलजी[७]! सुलतानाला आवश्यक ते ते सर्व सद्गुण या प्राण्यांत होते! त्याने सुलतान झाल्याबरोबर मराठ्यांवर सूड उगवण्यासाठी प्रचंड फौजेसह देवगिरीवर स्वतः मोर्चा वळविला (इ. स. १३१८).

पुन्हा आग महाराष्ट्रांत भडकली. देवगिरि आणि दिल्लीची झुंज सुरू झाली. अन् संपली! हरपालदेवाची समशेर, सेना आणि सेनापतित्व दिल्लीपुढे तोकडें पडलें. त्याची सेना विस्कटली. पळत सुटली. जीं कारणें शंकरदेवाच्या पराभवाचीं, तींच कारणें हरपालदेवाच्या पराभवाचीं. फरक नाही. पाठलाग सुरू झाला आणि मुबारीकखानाच्या हातीं हरपालदेव जिवंत सापडला! सूडाने जळफळणाऱ्या त्या सुलतानापुढे हरपालदेवाला हाजीर करण्यांत आलें. त्याने भयंकर हुकूम सोडला.[९]

"उसकी खाल खींचकर देवगीरके दरवाजेपर लटका दिया जाय!"

हरपालदेवाला जिवंत सोलून देवगिरीच्या दरवाजावर टांगण्याचा हुकूम सुलतानाने फर्मावला !

लगेच कामाला सुरुवात ! रक्ताचें सरोवर साचलें. हरपालदेवाच्या अंगाची साल छिलण्यांत आली ! जास्वंदीसारखा तो लालबुंद देह यातनांनी तळमळतांना पाहून सुलतान खूष झाला ! देवगिरीच्या दरवाजावर यादवांचा जावई लोंबकळूं लागला ![१] लग्नांत सम्राट् रामदेवरावाकडून सीमेवरती भर वैभवांत सीमांतपूजन स्वीकारणारा यादवांचा जावई आज मांसाचा लोळागोळा होऊन सोललेल्या बकऱ्यासारखा वेशीवर लोंबकळत होता ! ही सुलतानांची जहाँदारी ! सुखाचें मरणहि महाग ! आजवर देवगिरीच्या माथीं गरुडध्वज फडफडत असे. आज फडफडत होतीं गिधाडें आणि कावळे ! कारण त्यांच्यासाठी एक तांबडी मेजवानी वेशीवर लटकत होती ! सूडाचा हा अखेरचा लालभडक निखारा देवगिरीच्या वेशींत विझत पडला; तो विझत विझत गेला. पार विझून गेला !

आणि मग पूर्वीहूनहि हजारपट काळोख दाटला. तेलांत खललेलें काजळहि उजळ ठरावें यापुढे. अमावास्येचा अंमल सुरू झाला. घुबडांचें फावलें. कोल्ह्याकुत्र्यांची दिवाळी उगवली. जहरी सापांचा निर्धास्त संचार सुरू झाला. दुर्गंधी आणि काळोख एकजीव झाले. अशा या काळोखांत रानटी जनावरांच्या तडाख्यांत कुणी सापडलें तर? मरायचें ! मुकाट्याने ! न ओरडतां, न रडतां !

शू: SSSS ! मोठ्याने रडायचेंसुद्धा नाही ! अहं, हुंदकेहि द्यायचे नाहीत. मनांतल्या मनांत रडायचें; मोठ्याने रडायचें फक्त कुत्र्यांनी ! त्यांनाच फक्त परवानगी ! नाही नाही ! अंधारांत चाचपडायचेंहि नाही. जर एखाद्या विळखा घालून पडलेल्या सापावर हात पडला तर? त्याची झोपमोड होईल ! तो चावेल ! चावण्याचे कष्ट त्याला पडतील. त्याची जबाबदारी कोणावर ?

चाचपडणाऱ्या जीवापेक्षा सापांची झोप महत्त्वाची होती! या अंधारांत मरेपर्यंत नुसतें जगायचीहि परवानगी नव्हती. कुणी जगायचें, कसें जगायचें, किती जगायचें, हें ठरविण्याचा अधिकार होता सुलतानांच्या हातीं! नात्यागोत्याचे व्यवहार संपले होते. उरला होता फक्त एकच सर्वांत जवळचा नातलग. त्याचें नांव मृत्यु! ताच सर्वांत प्रेमळ सखा. पण कधीकधी तोहि नसे! वनवास सुरू झाला होता. वनवास नव्हे नर्कवास हा!

प्रत्येक क्षणाला काळोख वाढत होता. रात्रच लांबत होती. दिशा समजत नव्हत्या. वेदना संपत नव्हत्या. बेभान होऊन वैतागाने कुणी धावत सुटलाच, तर एखाद्या दांडग्या वृक्षावर कपाळ आपटून तो कोलमडून पडे. घुबडें हसत. रातकिडे जास्तच जोरांत किरकिराट करीत. महाराष्ट्राच्या स्मशानांत उरलीं होतीं फक्त जिवंत प्रेतें! शेवटच्या संस्कारासाठी तीं घटका मोजीत होतीं! अग्नि मिळणारीं भाग्यवान् प्रेतें फार थोडीं! उत्तरक्रिया करावयाची गिधाडांनी आणि कावळ्यांनी, अशी नवी रीत सुरू झाली!

जखमांवर फुंकर घालायला कुणी उरला नाही. संतांची दिंडी वैकुंठाला गेली. ज्ञानेश्वरांनंतर सर्व संत भराभरा जग सोडून गेले. उरले फक्त नामदेव, जनाबाई आणि चोखामेळा. महाराष्ट्राच्या मरणाचा सोहाळा पाहणें त्यांच्या नशिबीं आलें. सर्वत्र देव पाहणाऱ्या नामदेवांनी हताश होऊन म्हटलें, 'दैत्यांचेनि भारें दाटली अवनी!'

सुलतानांच्या समदुर्बुद्धीला राजा, भिकारी, तरणे, म्हातारे, बायका, पोरें, चोर आणि संत सारखेच होते. मरणाचे मानकरी!

चोखोबांच्या मंगळवेढ्याला गावकुसूं घालायचें अंमलदारांनी ठरवलें. हें बांधकाम करवून घेण्यासाठी महारांना वेठीला धरण्यांत आलें. अनेक महार जबरदस्तीने शिरावर धोंडे वाहून नेण्यासाठी आणि रचाई

करण्यासाठी कामाला जुंपण्यांत आले. ह्या जबरदस्तींत चोखोबांनाहि रखडण्याचा मान मिळाला! तो थोर वैष्णव 'विठ्ठल विठ्ठल' म्हणत रचाईसाठी धोंडे वाहूं लागला. घमेली वाहूं लागला.

चार महिने महारांचें रक्त आटवून गावकूस उभारण्यांत आलें. प्रचंड वेस उभी झाली. आणि एक दिवशीं अनेक महार कामगार वेशीपाशी काम करीत होते. त्यांतच चोखोबाहि होते. आणि कडाड् कड्कड्कड् असा भयंकर आवाज झाला! भीतीचे आर्त चीत्कार उठले अन् प्रचंड वेस धडाडकन् कोसळली! सगळीं महारं चेंगरून, दडपून, ठेचून, कोंदून मेलीं! चोखोबाहि दगडाधोंड्याच्या पर्वतांत गप्प झाले! शके १२६०. महारासाठी कुणी रडायचें! रुक्मिणी पांडुरंग रडले म्हणे! देवांच्याहि हातीं फक्त रडणेंच उरलें!

आंसवांत अन् रक्तांत भिजत भिजत वर्षांमागून वर्षें अशींच उलटत होतीं. घणाचे घाव घालून मेख जमिनींत ठोकावी तशी सुलतानांची सत्ता खोल खोल जात होती. पूर्वी कधी काळीं एखादाच रावण निर्माण होत असे. एखादाच कालयवन निर्माण होत असे. अन् जरी निर्माण झाला तरी त्यांना मारून टाकण्यासाठी राम आणि कृष्णहि निर्माण होत होते. पण आता? रावणांच्या आणि कालयवनांच्या रांगाच्या रांगा निर्माण होत होत्या. सज्जन, सद्धर्म आणि सुसंस्कृतीचा विनाश होत होता, तरीहि त्यांच्या परित्राणासाठीं एकहि राम वा कृष्ण जन्म घेत नव्हता!

महाराष्ट्राला भरडून काढणारी पहा ही कालयवनांची केवढी मोठी रांग!

**खलजी सुलतान**:—(१) अल्लाउद्दीन खलजी (इ. १३१३ ते १९ डिसेंबर १३१६), (२) मुबारिकखान खलजी (इ. १३१६ ते १३२०)

**तुघ्लख सुलतान**:—(३) ग्यासुद्दीन तुघ्लख (इ. १३२० ते १३२६), (४) महंमद तुघ्लख (इ. १३२५ ते १३४७)

**बहमनी सुलतान**:—(५) हसन गंगू बहमनी ऊर्फ जाफरखान ऊर्फ अल्लाउद्दीन शहा ( दि. १२ ऑगस्ट १३४७ ते १० ऑगस्ट १३५८ ), (६) महंमदशाह बहमनी ( दि. १० ऑगस्ट १३५८ ते दि. २१ मार्च १३७५ ), (७) मुजाईदशाह बहमनी ( दि. २१ मार्च १३७५ ते दि. १४ एप्रिल १३७८ ), (८) दाऊदशाह बहमनी ( दि. १४ एप्रिल १३७८ ते मे १३७८ ), (९) महमूदशाह बहमनी ( मे १३७८ ते दि. २० एप्रिल १३९७), (१०) ग्यासुद्दीनशाह बहमनी (दि. २० एप्रिल १३९७ ते दि. ९ जून १३९७ ), (११) शमसुद्दीन बहमनी ( दि. ९ जून १३९७ ते १५ नोव्हेंबर १३९७ ), (१२) फेरोजशाह बहमनी ( दि. १५ नोव्हेंबर १३९७ ते सप्टेंबर १४२२ ), (१३) अहंमदशाह बहमनी ( सप्टेंबर १४२२ ते १९ फेब्रुवारी १४३५ ), (१४) अल्लाउद्दीन बहमनी ( दि.१९ फेब्रुवारी १४२५ ते इ. स. १४५७ ), (१५) हुमायून जालीम बहमनी ( इ. १४५७ ते ३ सप्टेंबर १४६१ ), (१६) निजामशाह बहमनी ( दि. ३ सप्टेंबर १४६१ ते दि. २९ जुलै १४६३ ), (१७) महंमदशाह बहमनी ( दि. २९ जुलै १४६३ ते दि. २१ मार्च १४८२ ), (१८) महंमूदशाह बहमनी ( दि. २१ मार्च १४८२ ते २१ ऑक्टोबर १५१८ ), (१९) अहमदशाह बहमनी ( दि. २१ ऑक्टोबर १५१८ ते १५२० ), (२०) अल्लाउद्दीनशाह बहमनी ( इ. १५२० ते १५२१ ), (२१) वलीउल्लाशाह बहमनी ( इ. १५२१ ते १५२४ ); (२२) कलीउल्लाशाह बहमनी ( इ. १५२४ ते १५२६ ).

**बीदरचे बेरीदशाही सुलतान**:—(२३) सुलतान कासीम बेरीदशाह ( इ. १४९२ ते १५०४), (२४) अमीर बेरीदशाह (इ. १५०४ ते १५४९), (२५) अली बेरीदशाह (इ. १५४९ ते १५६२), (२६) इब्राहीम बेरीदशाह (इ. १५६२ ते १५६९), (२७) कासीम बेरीदशाह (इ. १५६९ ते १५७२), (२८) मिर्झा अली बेरीदशाह (इ. १५७२ ते १५९२).

**वऱ्हाडचे इमादशाही सुलतानः**—(२९) सुलतान फत्तेउल्ला इमादशाह (इ. १४८४ ते कांही महिने), (३०) अल्लाउद्दीन इमादशाह (इ. १४८४ ते १५२७), (३१) दर्या इमादशाह (इ. १५२७ ते १५६२), (३२) बुऱ्हाण इमादशाह (इ. १५६२ ते १५७२).

**अहमदनगरचे निजामशाही सुलतानः**—(३३) सुलतान अहंमद निजामशाह (इ. १४८९ ते १५०८), (३४) बुऱ्हाण निजामशाह (इ. १५०८ ते १५५३), (३५) हुसेन निजामशाह (इ. १५५३ ते १५६५), (३६) मुर्तुजा निजामशाह (इ. १५६५ ते १५८६), (३७) मीरन हुसेन निजामशाह (इ. १५८६ ते १५८८), (३८) इस्माईल निजामशाह (इ. १५८८ ते १५९१), (३९) बुऱ्हाण निजामशाह (इ. १५९१ ते १५९५), (४०) इब्राहीम निजामशाह (इ. १५९५ ते १५९६), (४१) अहंमद निजामशाह (इ. १५९६ ते १६०३), (४२) बहादूर निजामशाह (इ. १५९६ एकच वर्ष), (४३) मूर्तजा निजामशाह (इ. १६०३ ते १६३०), (४४) हुसेन निजामशाह (इ. १६३० ते १६३३).

**विजापूरचे आदिलशाही सुलतानः**—(४५) सुलतान युसूफ आदिलशाह (इ. १४८९ ते १५१०), (४६) इस्माईल आदिलशाह (इ. १५१० ते १५३४), (४७) इब्राहीम आदिलशाह (इ. १५३४ ते १५५७), (४८) अली आदिलशाह (इ. १५५७ ते १५८०), (४९) इब्राहीम आदिलशाह (इ. १५८० ते १६२६), (५०) महंमद आदिलशाह (इ. १६२६ ते १६५६).

**खानदेशचे फरुकी सुलतानः**—(५१) सुलतान मलिक राजा फरुकी (इ. १३७० ते १३९९), (५२) मलिक नासीर फरुकी (इ. १३९९ ते १४३७), (५३) मीरन आदिलखान फरुकी (इ. १४३७ ते १४४१), (५४) मीरन मुबारिकखान फरुकी (इ. १४४१ ते १४५७), (५५)

आदिलखान फरुकी (इ. १४५७ ते १५०३), (५६) दाऊदखान फरुकी (इ. १५०३ ते १५१० ), (५७) आदिलखान फरुकी (इ. १५१० ते १५२०), (५८) मीरन महंमद (इ. १५२० ते १५९९).

**मोंगल सुलतान:**—(५९) सम्राट् अकबर, अहमदनगरपर्यंत सत्ता ( इ. १५९९ ते १६०५), (६०) जहांगीर ( इ. १६०५ ते १६२७ ), (६१) शाहजहान ( इ. १६२७ ते १६५७ ), (६२) औरंगझेब ऊर्फ आलमगीर ( इ. १६५८ ते पुढे ).

पहा किती दाटीने उभे आहेत हे ! एक मरायच्या आधीच दुसरा सुलतान हजर आहे ! तीनशे वर्षे महाराष्ट्रावर एकामागून एकेक हे सुलतान सुलतानी गाजवीत होते. महाराष्ट्राच्या भाषेवर त्यांचें प्रेम नव्हतें. महाराष्ट्राच्या धर्मावर त्यांचें प्रेम नव्हतें. महाराष्ट्राच्या देवांवर, लोकांवर, शास्त्रांवर, रीतरीवाजांवर, तीर्थक्षेत्रांवर, इतिहासावर, परंपरेवर, मानबिंदूवर, कशावरहि त्यांचें काडीमात्रहि प्रेम नव्हतें. उलट कडकडीत वैर होतें. असें वैर करण्यांतच ते पुण्य समजत ! मराठ्यांची जमीन आणि स्त्री आपल्या उपभोगासाठी अन् पुरुष आणि जनावरें आपल्या सेवेंत राबण्यासाठी आहेत असेंच ते मानीत.

महाराष्ट्र गुलामगिरींत होता. फटके खात खात मानेवरचें घाण्याचें जूं ओढीत होता.

एकेका सुलतानाचें चरित्र भयंकर होतें. उघड्या डोळ्याने बघणेंच अशक्य ! प्रत्येकाच्या लीला विलक्षण ! अतर्क्य !

खलजीच्या मागोमाग महमद तुघ्लख दख्खनचा सुलतान झाला. हा प्राणी विक्षिप्त होता. याच्या डोक्यांत अफाट कल्पनांचीं कारंजीं उडत ! दिल्लीची राजधानी देवगिरीस आणण्याचा उद्योग याने करून पाहिला. बर्फाळ हिमालयांतून चीनवर स्वारी करण्याची कल्पना याचीच ! क्रूर तर अतोनात. त्याच्या क्रौर्याच्या एकेक भयंकर गोष्टी प्रत्यक्ष पाहून इब्न

बतूताने लिहून ठेवल्या आहेत. अंगावर काटाच उभा राहतो! बाकीचे गुणहि पुरेपूर होते! यानेच देवगिरीची दौलताबाद केली.

जाफरखान ऊर्फ हसन नांवाच्या सरदाराने महंमद तुघ्लखाविरुद्ध बंड पुकारलें व महाराष्ट्र ताब्यांत घेतला (इ. १३४७). हाच तो हसन गंगू बहमनी. त्याने राजधानी कलबुर्ग्याला नेली. कलबुर्गा नाही म्हणायचें. आता अहसनाबाद म्हणायचें! राजधानी नाहीं म्हणायचें. महाराष्ट्रांतील गावांचीं, डोंगरांचीं, बंदरांचीं, माणसांचींसुद्धा नांवें बदलत होतीं. पारतंत्र्याचें विष अंगांत भिनत चाललें होतें.

हसन गंगू बहमनीनंतर त्याचा मुलगा महमदशाह हा सुलतान झाला[११] (दि. १० ऑगस्ट १३५८). याने दिव्य जुलूम केले. आंध्रचा राजपुत्र विनायकदेव याची जीभ छाटणारा आणि त्याला वेलिंगपट्टणच्या किल्ल्यावरून आगींत फेकून जिवंत जाळणारा हाच सुलतान[२७]. याच सुलतानाने अदोनीजवळ एकाच वेळीं सत्तर हजार माणसें कापून काढलीं.[१२] याला हीच हौस फार दांडगी होती. याने नंतर कर्नाटकाच्या सरहद्दीवर एकाच वेळीं चार लाख माणसें ठार मारलीं.[१३] ही कत्तल इतकी भयंकर होती की, त्यामुळे हा मुलूख ओसाड पडला.[१३] ज्यांची शिल्पकला पाहून परमेश्वरानेहि थक्क होऊन जावें अशीं अत्यंत अप्रतिम लावण्यमय मंदिरें या सुलतानाने फोडून तोडून उध्वस्त केलीं. आयुष्येंच्या आयुष्यें खर्च करून लिहिलेले ग्रंथ आगींत पडले. कलेचा व ज्ञानाचा हा नाश पाहून खरोखर सरस्वती ढसढसा रडली. मंदिरें नाश पावत होतीं आणि ठायीं ठायीं या विध्वंसाच्या पांढऱ्या फटक निशाण्या फडकत होत्या. ‘ बुत्कदे शुद् मस्जीद ! ’

यादवांचें रामराज्य बुडून एकशें पंचवीस वर्षें उलटलीं, तीं अशींच अखंड हालांत! आणि तसेच ते हाल पुढेहि चालूच राहिले. दहावा बहमनी सुलतान अल्लाउद्दीनशहा हा आता राज्यावर आला (इ. १४३५

ते ५७ ). हा सुलतान स्वतःला फार मोठा 'सत्पुरुष' समजत असे.[१४]

'ऐहिक व पारमार्थिक कृत्यांत श्रेष्ठ. ईश्वराचा नम्र सेवक. न्यायी, दयाळू, सहनशील व उदार असा सत्पुरुष.'

—असें तो स्वतःला म्हणवीत असे.[१४] केवढ्या मोठ्या मोलाचीं विशेषणें हीं !

एवढ्या ह्या थोर सुलतानाने आपल्या आयुष्यांत केलीं तरी कोणतीं महत्कृत्यें ? राज्यावर आल्यावर अल्लाउद्दीनशहाने प्रथम दिलावरखान नांवाच्या आपल्या एका प्रिय सरदारास कोकणांत रवाना करून त्याच्या-मार्फत कोकणांतील सोनखेडच्या एका अस्सल व नामवंत मराठा राजघराण्यांतील एक सुंदर मुलगी आणवून आपल्या जनानखान्यांत दाखल केली.[१५] शंकरराव मोरे नांवाच्या अशाच दुसऱ्या एका अस्सल कुलीन मराठ्याची अत्यंत रूपवान् मुलगी संगमेश्वराहून हुसेन अकबर नांवाच्या सरदाराने आणून बादशहास बहाल केली.[१६] निरनिराळ्या ठिकाणांहून अशाच एक हजार अति रूपसम्पन्न बायका सुलतान अलाउद्दीनशहाने गोळा करून आणल्या. एका तलावाकाठीं त्याने एक 'स्वर्गमहाल' नांवाचा महाल बांधला होता; तेथे तो सदैव उप-भोगांत दंग असे.[१७] चोवीस तास, महिनोमहिने, वर्षन्वर्ष, मरेपर्यंत ! बायका, दारू, नाच, गाणीं यांच्या मैफलींत दंग असणें हाच त्याचा राज्यकारभार[१७] ! सत्पुरुष !!

हा महापुरुष म्हणत असे की, कमींत कमी एक लाख काफरांची कत्तल करावी अशी आमच्या बहमनी घराण्याची परंपरा आहे.[१८]

हा स्वतः भयंकर दारू पीत असे पण प्रजेला बजावीत असे की, दारू पिऊं नका. मराठ्यांचा तो फार द्वेष करी. कारण ते काफीर होते मराठी ब्राह्मणांशीं तर तो बोलतहि नसे. त्यांना सरकारी नोकऱ्या मिळूं देत नसे.

या अल्लाउद्दीनशहाचा मुलगा हुमायूनशाह (इ. १४५७ ते ६१) तर इतका जुलमी, क्रूर आणि संतापी होता की, त्याचेच लोक त्याला 'जालीम' म्हणत.[१९] तो जरी भयंकर क्रूर होता तरी तख्तावर आल्यानंतर मात्र त्याने पहिली कत्तल अगदी लहानशी केली. फक्त सातच हजार माणसें त्याने ठार मारलीं.[१९] त्याच्या आवडीनिवडी भयंकर होत्या. जनानखान्यांतल्या आपल्या बायकांनी बारीकशीहि चूक केली तरी तो त्यांना ठार मारीत असे. कारण स्वतःच्या बायकांवांचून त्याचें कधी अडत नसे. प्रजाजनांत कोणाच्या लग्नाची मिरवणूक जात असली तर भर वरातींतून तो नवरीलाच पळवून नेत असे.[१९] पण त्याचा कामाग्नि एवढ्यानेहि शमत नसे. प्रजाजनांच्या सुंदर पोरांनाहि तो पकडून नेत असे.[१९] कशी जगत असेल प्रजा? कसा जगत असेल महाराष्ट्र?

बहमनी सुलतानांच्या अमदानींत एका माणसाची तारीफ फार गाइली जात असे. तो वजीर होता. वजीरे आझम वकील उस् सल्तनत मालिक उत्तुजार खाजेखान महंमद गावान. तो मोठा दिलपाक, रहमादिल, परवरदिगर, दिलदार इन्सान होता. विद्याप्रेमी, न्यायी, धर्मशील व सुसंस्कृत होता. मानवतेचा साक्षात् पुतळाच होता. सांस्कृतिक उच्च जीवनाचा केवळ आदर्श होता. परंतु सुंदर सुंदर मूर्तींचा चक्काचूर उडवणें, कत्तलींना पाठिंबा देणें,[२०] स्वतःहि यथाशक्य, यथामार्ग, यथामति कत्तली करणें, जीहाद पुकारून कोकणांतील मराठ्यांवर हल्ले चढविणें[२१] वगैरे गोष्टी महंमद गावानाच्या न्यायी, उदार, दयाळू, विद्याप्रेमी थोर मनांत सहज सामावत!

महंमद गावानच्या विद्याप्रेमाचा, औदार्याचा, विरक्त व त्यागी जीवनाचा महाराष्ट्राला काडीइतकाहि फायदा नव्हता. बीदरच्या त्याच्या मदर्शाचा उपयोग महाराष्ट्राला करून घेतां येत होता का? मुळींहि नाही! त्याची

मानवता ठराविक मानवांपुरतीच होती. महंमद गावानच्या वजिरीच्या कारकीर्दीत सुलतान महंमदशाहने तेलंगणांत अनेक कत्तली केल्या.[२२] निरपराध माणसें हजारोंनी मारलीं. त्यांपैकी कित्येक स्वाऱ्यांत हा थोर मानव स्वतः हजर होता.[२२] या क्रौर्याबद्दल गावानने चुकूनहि महंमदशहाचा साधा निषेधसुद्धा केला नाही. हातहि धरला नाही.

उलट एक उदाहरण गमतीचें आहे. कोंडापिलीचा किल्ला लढाई न करतां सामोपचारानेच सुलतान महंमदशहाच्या कबजांत आला. महंमदशहा किल्ल्यांत प्रवेशला. समोरच एक देवालय त्याला दिसलें. तो स्वतः तेथे गेला आणि त्याने तेथे असलेल्या निरपराध ब्राह्मणांना स्वतःच्या हाताने कापून काढलें.[२०] लगेच ते देऊळ फोडून मशीद करण्याचा त्याने हुकूम सोडला. त्याप्रमाणे तेथे मशीद तयार झाली. सुलतान महंमदशहा पुन्हा तेथे आला व या शुभ प्रसंगाप्रीत्यर्थ त्याने पुन्हा स्वतःच्या हाताने कांही लोकांना ठार केलें.[२०] आणि आश्चर्य म्हणजे या सुसंस्कृत, दयाळू, उदार महंमद गावानने या थोर सत्कृत्याबद्दल, सुलतान महंमदशहाचें 'गाझी' म्हणून मनःपूर्वक कौतुकच केलें ![२०].

महाराष्ट्रांत एक दुष्काळ पडला.[२३] दोन वर्षें तो टिकला. लोक अन्नावांचून मेले. गावानने त्यांच्याकरिता कांहीहि केलें नाही. मंगळवेढ्याचा सामान्य ठाणेदार दामाजीपंत आणि बहमनींचा असामान्य वजीर महंमद गावान यांच्यांतील मानवतेंत फारच मोठा फरक होता!

या सुलतानांच्या राज्यांत महाराष्ट्र अक्षरशः भरडून निघत होता. महाराष्ट्राचे संत भिताडाखाली चिरडून मरत होते. पण दरबारांत मात्र परदेशांतील अवलियांचे मखमलीवर सन्मान होत होते. त्यांना इराणी, अरबी वा तुर्की देशांतून मुद्दाम आणवीत. अवलिया नाही सापडला तर त्याच्या पोरानातवंडांना येथे आणवून त्यांची थाटाची सरबराई होत असे.[२४]

चैनबाजी आणि असला दानधर्म अपार खर्चाने सुलतान करीत. कर वसूल होई मराठ्यांच्या गाडग्यामडक्यांतून आणि त्यावर सुलतान उदार असत !

या सुलतानांचे चाळेच भयंकर होते. अतिमानुषी ! त्यांचे दुर्गुण किती गावेत ? लहरी, तापट, कपटी, खुनशी, मूर्ख, कत्तलबाज, दारूबाज, कामांध, लुटारू आणि चैनी नसेल तर तो सुलतान कसला ? हे तर त्यांच्या स्वभावांतील स्थायिभाव ! गादीसाठी भावांचे डोळे फोडणें किंवा खून पाडणें म्हणजे त्यांच्या हातचा मळ.[२५] त्यांच्यांतला 'न्यायी' सुलतान काय न्याय देईल याचा नेम नसे ! एखादा सुलतान 'दयाळू' म्हणून गाजे. दयाळू म्हणजे कमी क्रूर ! कोणत्या सुलतानाला कशाची लहर येईल याचा तर्क करणें देवालाच काय पण सैतानालाहि अशक्यच असे. त्यांच्यांतले सत्पुरुषहि भयंकरच ! सर्वांत भयंकर इसम म्हणजे 'गाझी' ! गाझी म्हणजे धर्मवीर ! अन् धर्मवीर म्हणजे कत्तलबाज !

सुलतानशाहींत महाराष्ट्राच्या कलांचा, विद्यांचा, शास्त्रांचा, भाषेचा, श्रद्धास्थानांचा, भावनांचा, मनांचा आणि माणसांचा चेंदामेंदा होत होता. आश्रय आणि संवर्धन तर दूरच.

वारंवार दुष्काळ पडत. एक दुष्काळ तर बारा वर्षें पडला.[२६] दुर्गादेवीचा हा दुष्काळ ( इ. स. १३९६ ते १४०८ ). महाराष्ट्राला अन्नान्न दशा आली.

यादवांचें सुखी राज्य बुडून शंभर वर्षें उलटलीं. दोनशें वर्षें उलटलीं. पारतंत्र्याची गडद रात्र संपलेली नव्हती. हाल चालूच होते. शोक तरी कशाकशाचा करायचा ? डोळ्यांत पाणीच राहिलें नव्हतें रडायला. आधार तरी कुणाचा मागायचा ? सगळेच घायाळ. सगळीकडेच अंधार. जन्माला आल्याचाच प्रत्येकाला पश्चात्ताप होत होता. एकमेकांचें दुःख

एकमेकांना सांगायचीहि चोरी होती. दुःखाला दुःख म्हणणें हाच मुळीं गुन्हा होता.


अल्लाउद्दिनाची परंपरा प्रत्येक सुलतानाने चालू ठेवली होती. एका हातांत दारूचे उसळते प्याले आणि दुसऱ्या हातीं निथळती समशेर. समशेर खाली ठेवली की तोच हात सुंदर युवतींना खेचण्याकरितां धावे. हुकुमत, शराब आणि समशेर स्वैर धिंगाणा घालीत होती. कोण विचारणार जाब यांना? या खाटीकखान्यांतून सुटायला एकच मार्ग असे—मरण!

पारतंत्र्याची ही भीषण काळरात्र होती!

* * *

---

**आधारः—** (१) खलजीभा पृ. २०६. (२) खलजीभा पृ. ९२. (३) खलजीभा पृ. ११७. (४) खलजीभा पृ. ११७ व १३०. (५) खलजीभा व बराइ. (६) खलजीभा पृ. १२९. (७) खलजीभा पृ. ११९ ते १२२. (८) खलजीभा पृ. ११७ ते १२१. (९) खलजीभा पृ. १३०. (१०) बराइ. (११) बराइ पृ. २६. (१२) बराइ पृ. ३८. (१३) बराइ पृ. ५१. (१४) बराइ पृ. १५४. (१५) बराइ पृ. १३३. (१६) मुघोघइ पृ. ८३ व ८४. (१७) बराइ पृ. १४३. (१८) बराइ पृ. १४०. (१९) बराइ पृ. १६६. (२०) बराइ पृ. १९३. (२१) मुघोघइ पृ. ११४. (२२) बराइ पृ. १९१ ते १९३. (२३) बराइ पृ. १९०. (२४) मंडळ इति. १८३४ पृ. २०६. (२५) मुघोघइ. पृ. ५९. (२६) शिचसा १ ले. २. (२७) बराइ पृ. ३१.



## ६ : पारतंत्र्याची ऐन मध्यरात्र

बहमनी दरबारांत पांच जबरदस्त सरदार होते. राज्याच्या निरनिराळ्या सुभ्यांवर या पांचांची नेमणूक केलेली होती. प्रत्यक्ष सत्ता याच पांच सुभेदारांच्या हातांत होती. सुलतान चैनबाजींत दंग असत. हे पांचजण म्हणजे, फत्तेउल्ला इमाद उल् मुल्ख, अहंमद निजाम उल् मुल्ख, कुलीकुतुब उल् मुल्ख, यूसुफ आदिलखान आणि कासीम बेरीद. या पांचांची जरब भयंकर होती. या पंचमहाभूतांच्या डोक्यांत स्वतःच सुलतान बनण्याची महत्त्वाकांक्षा पालवली. त्यांनी नखें वाढविण्यास सुरुवात केली.

सुलतान दारूंत बुडालेले होते.[१५] सुलतान महमूदशहाने[१] ( इ. १४८२ ते १५१८ ) तर आपलें ' तख्त फेरोज ' नांवाचें देदीप्यमान सिंहासन मोडून त्याचे दारू पिण्याचे प्याले बनविले ![१२] नाचेपोरे, नक्कलवाले खोजे, उनाड, कुटाळ लोक आणि बायका यांचा गराडा त्याच्याभवती सदैव असे.[१३] राज्यकारभार मग किती उत्तम चालत असेल ! बीदरच्या मदर्सा—म्हणजे पाठशाळेंतील वंदनीय गुरुजनहि दारू पिऊन तर्र असत ![१३]

वरील पांचजणांनी हळूहळू सुलतानाला गुंडाळून ठेवलें[२] आणि पांच प्रदेशांवर ते स्वतःच सुलतान बनले. ' शाह ' बनले. दख्खनमध्ये

अगदी बीनबोभाट राज्यक्रांति झाली. म्हणजे एका ऐवजी पांच सुलतान निर्माण झाले ! एलिचपुरास फत्तेउल्ला इमादशहाने, नगरला निजामशाहने, बीदरला कासीम बेरीदशाहने, विजापूरला युसुफ आदिलशाहने आणि गोवळकोंड्याला कुतुबशाहने आपआपली सुलतानी थाटली. या पांचांपैकी इमादशाह व निजामशाह हे दोघेजण निरनिराळ्या दोघा वेदशास्त्रसम्पन्न ब्राह्मणांच्या वंशांत जन्माला आलेले बटू होते ![1] पण त्यांच्यावर सुलतानाची मेहेरबानी झाली ! त्या मेहेरबानींत वेद विसरविण्याचें विलक्षण सामर्थ्य होतें !

हळूहळू या पांच सुलतानांतहि सत्तेची पिपासा वाढूं लागली. ते एकमेकांचा द्वेष व स्पर्धा करूं लागले. प्रत्येकाची इच्छा स्वतः एकमेव सुलतान होण्याची होती. पण ही तहान भागविण्यासाठी मरायचें कुणीं?

मराठ्यांनी ! नव्या सुलतानांचे लक्ष मोठ्या मायेने मराठ्यांवर गेलें. हीं माणसें संख्येनें अमूप आहेत आणि लढण्यांत शूर आहेत; आपल्या स्वार्थाच्या रोट्या भाजायला हें सरपण उत्तम आहे हें सुलतानांनी अचूक हेरलें. सत्तेच्या जुगारांत झुंजवायला घरचीं कोंबडीं त्यांना मिळालीं. त्यांनी मराठ्यांच्या फौजा बाळगायला सुरुवात केली. सुलतानांनी मराठ्यांना बरोबर ओळखलें.

मरायला माणसें मराठ्यांची चांगलीं. दुसऱ्यासाठी वक्तशीर मरतात. कडक झुंजतात. अगदी कोंबड्यांसारखी जीव खाऊन ! मालकाला यश मिळवून देतात. योग्य वेळीं त्याला जागेंहि करतात. खाण्यापिण्याचा त्रास नाही. कुठेहि चार दाणे फेकले की, तेवढे टिपीत पोट भरतात. त्यांना मालकाने कापून खाल्लें तरी त्यांची तक्रार नसते. मोठे चांगले लोक !

आतापर्यंत मराठ्यांची फक्त माणसेंच मेलीं. आता मनें मरूं लागलीं! माणसें मरणेंहि थांबलें नाहीच. पण तें काम आता मराठेच करूं लागले. आपसांत खून, कापाकापी आणि बादशहाची नम्र सेवा सुरू झाली. दोन सुलतानांच्या झगडेबाजींत बहुसंख्येने मरत दोन्ही बाजूंचे मराठेच.

पदरीं बाळगलेल्या मराठ्यांतील चांगल्या उच्च कुळीच्या मराठ्यांना सुलतानांनी सरदार बनवलें; वतनें दिलीं. वतनाकरितां भांडायला शिकवलें. वतनदारीची चटक लावली. आपापसांत भाऊबंदक्या लावून दिल्या. सुलतानांनी मराठ्यांसाठी खास बेमालुम मसाला शोधून काढला. वतनदाऱ्या, सरदाऱ्या आणि किताब! आपल्या सख्ख्या भावाशीं बेलाशक बेइमानी कशी करायची आणि बादशहाच्या याशीं अत्यंत इमानी कसें राहायचें याचें शिक्षण मराठ्यांना आपोआप मिळत गेलें.

यादवराज्य बुडाल्यापासून मराठे आदर्श सहनशीलता शिकतच होते. देवावर, देवळावर, गाईवर, बाईवर, आईवर—आणि कोणावरहि हात टाकला, तरीहि मनःशांति कशी टिकवावी याचें शिक्षण सुलतानांनी दिलेलेंच होतें. तेंहि आता बादशहाची सेवा करतांना उपयोगी पडूं लागलें.

याच वेळीं ( इ. १५१० ) गोवा बंदरांत पोर्तुगाली फिरंगी अल्फान्सो अल्बुकर्क सोजिरांसह येऊन उतरला.[५] गोमंतकाचें फिरंगाण झालें. यमदूतांचेच काय पण सुलतानांचेहि गुरु शोभतील असे हे फिरंगी नीच होते. क्रूर पशूच होते. आता महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर उकळत्या तेलांतील खास तळीव अत्याचार सुरू झाले.[६]

थोड्याच दिवसांत ( इ. १५२६ ) खैबरखिंडींतून तैमूरलंग आणि चंगीझखान यांचा थोर वंशज जहीरुद्दीन मोहम्मद बाबर हा हिंदुस्थानांत उतरला. तैमूरने पूर्वीं या हिंदुस्थान देशाशीं प्रस्थापित केलेले प्रेमाचे संबंध टिकवावेत, वाढवावेत हा जिव्हाळ्याचा हेतु! नव्या पाहुण्यांनी दिल्लीच्या सिंहासनावर कायमचा मुक्काम ठोकला! ( दि. २१ एप्रिल १५२६. )

बिचारा बाबर मध्य आशियांतील फर्घाना प्रांताचा राजा. पण त्याच्या अनुदार बांधवांनी त्याला हाकून लावलें. गरीब बापडा अगदी अगदी उघडा पडला. घर उरलें नाही. दार उरलें नाही. कुठे राहावें बरें त्याने?

कुठे जावें? कुणाच्या तोंडाकडे पाहावें? आईच्या मायेने त्याच्याकडे पाहील असा होता का कुणी? होता का कुठे आधार! माकळ्या मनाने कुणाच्या खांद्यावर मान टाकून अश्रु गाळावेत त्याने? जिकडे पाहावें तिकडे रखरखीत अफगाणी वाळवंट होतें. पण दिसला! त्याला मानवतेचा दिव्य तारा चमकतांना दिसला! विशाल मनाचा, थोर हृदयाचा, उदार विचारांचा, केवळ प्रेम जगणारा, फक्त प्रेमाचीच निर्यात करणारा महान् हिंदोस्ताँ आपल्याला प्रेमभराने बोलावीत आहे असा त्याला साक्षात्कार झाला! आणि तो आला! येथील संस्कृति किती उच्च! सर्वांना या म्हणते! जेवा म्हणते! राहा म्हणते! बाबर इथे आला. ईश्वरी कृपेने सुखरूप आला. आणि मग हिंदोस्ताँचें परमोच्च कल्याण साधणारी मुघल सुलतानी दिल्लींत स्थापन झाली! हिंदोस्ताँ केवढा भाग्यवान्!

दक्षिणेंतल्या पांच सुलतानांचीं राज्यें, त्यांचे अनाचार,[१६] अत्याचार[१७] उत्तम प्रकारें चालूच होते. विजापूरचा सुलतान पहिला इब्राहीम आदिलशाह एका दुष्ट रोगाने आजारी पडला. अनेकविध स्त्रियांशीं 'आधिभौतिक एकात्मता' साधण्याचें महान् कार्य करीत असतांनाच वाईट गुप्त रोगांनी त्या थोर सुलतानावर घाला घातला! (इ. १५५७.) त्याच्या महान् कार्यांत खंड पडला! त्याने वैद्यांना बोलावून आणलें. रोग इतके भयंकर होते की वैद्यांनी हात टेकले. वैद्य यशस्वी उपचार करूं शकेनात. आता उपाय काय? इब्राहीम आदिलशहाने त्या वैद्यांनाच हत्तीच्या पायीं देऊन ठार मारलें[१८]!! नंतर एक दिवशी तो स्वतः मेला!

या सुलतानांचा विजयनगरच्या राजांवर फार दात होता. सतत ते विजयनगरवर स्वाऱ्या करीत. असा दात असणें स्वाभाविक होतें. विद्यारण्य नांवाच्या एका संन्याशाच्या आशीर्वादाने हरिहरराय आणि बुक्कराय नांवाच्या दोन दांडग्या पोरांनी तुंगभद्रेच्या तीरावर हें राज्य स्थापन केलें.

सुलतानांच्या महान् सांस्कृतिक कार्याला त्यामुळे बांध पडला. तुंगभद्रेच्या दक्षिणेस द्राविड प्रदेशांत सुलतानांना जातां येईना. कत्तलीचें कार्य करतां येईना ! तिकडचीं तीं किचकट नक्षींचीं देवळें पाडतां येईनात. आणि हे विजयनगरचे अच्युतराय, कृष्णदेवराय, हरिहरराय वगैरे सर्वच राजे भयंकरच हेकट आणि संकुचित मनाचे होते ! सुलतानांनी विजयनगर राज्यांतल्या कोणा प्रजाजनाच्या गळ्याला नख लावलें की, लगेच त्याच्यासाठी हे राजे धाव घेत. आपलेंच राज्य तेवढें त्यांनी समृद्ध आणि सुखी करून ठेवलें होतें.[१८] व्यापार, शेती, कालवे, रस्ते, इमारती, प्रजेच्या सुखसोयी, विद्यावंतांना प्रोत्साहन, सुसज्ज सैन्य इत्यादि अनावश्यक गोष्टींवरच हे स्वार्थी राजे अफाट पैसा उधळीत. सुलतानांना मात्र एकदासुद्धा मनमोकळेपणाने लूट करूं देत नसत. अत्यंत संकुचित मनाचे हे राजे होते ! म्हणून सुलतानांचा त्यांच्यावर दात होता.

प्रजेच्या सुखसोयी, शेतीची वाढ, कालवे, उत्तम रस्ते अन् प्रजेचें कल्याण ! ह्यः ! असलीं नसतीं थेरें सुलतानांनी कधीहि केलीं नाहीत. पायींची वहाण पायांतच हवी ! हां ! सुलतानांनी इमारती बांधल्या. कोणत्या ? रंगमहाल, आरसेमहाल, स्वर्गमहाल, आयनेमहाल, मेहतर-महाल; शिवाय दर्गे, कबरी, पीर बांधले. सुलतानांच्या राज्यांत सर्वांत सुंदर कांही असेल तर कबरी आणि कबरस्तानें ! स्मशानें ! मशिदीहि बांधल्या. परंतु फार मशिदी बांधाव्या लागल्याच नाहीत. हेमाडपंताने आणि यादवादि राजांनी भावी मशिदींची भरपूर तरतूद करून ठेवलेली होती !

—तर या विजयनगरचा कायमचा काटा काढण्याचा बेत हुसेन निजामशाह, अली अदिलशाह, इब्राहीम कुतुबशाह आणि अली बेरीदशाह या थोर सज्जनांनी केला ( इ. १५६४ नोव्हेंबर ). हुसेनशाहजवळ एक अत्यंत प्रचंड तोफ होती. मुलुखमैदान ! ती त्याने बाहेर काढली. या चौघांचा सेनासमुद्र जमा झाला. लाखो फौज गोळा केली होती. शिवाय

मराठा ग्रंथ सं. । ग्र. ठाणे.
अनुक्रम २४८७६ वि: इतिहास
क्रमांक ८६४ नों: दि: १२-२-५

मोठा थोरला तोफखाना सज्ज केला. आणि हें दळ तालीकोटच्या रोखाने निघालें ( दि. २५ डिसेंबर १५६४ ).

विजयनगरहून राजा रामरायहि निघाला. त्याचा दळभारहि प्रचंड होता. नऊ लाख पायदळ, एक लाख घोडेस्वार, दोन हजार हत्ती व पंधरा हजार मदतगार नोकर एवढा संभार होता. सुलतानांची फौज याच्या निम्मी होती.

राक्षसतागडीजवळ दोन्ही महासागरांच्या लाटा फोफावत आल्या आणि संग्राम सुरू झाला. दख्खनच्या इतिहासांत पूर्वी कधीहि झालें नव्हतें आणि पुन्हा पुढे कधीहि झालें नाही असें हें महायुद्ध जुंपलें. अतिमहाभारत घडलें हें. राक्षसतागडी ! जंगे आझम राक्षसतागडी ! युद्धांत राक्षसी तागडीचीं पारडीं खालीं वर झुकत होतीं. आणि पारडें फिरलें ! विजयनगरचा राजा रामराय अचानकपणें सुलतानांच्या गराड्यांत सापडला आणि कैद झाला ! तो वयाने शहाण्णव वर्षांचा होता ! परंतु तीस वर्षांच्या तरुणासारखा लढत होता. कूटो नांवाच्या एका फिरंगी गोऱ्याने त्याची ही तडफ प्रत्यक्ष डोळ्याने पाहिली होती.

रामरायाला सुलतानी हशमांनी धरून हुसेन निजामशहापुढे नेलें. निजामशाहाला राक्षसी हर्ष झाला. त्याने हत्यार उपसलें व रामरायाचें मस्तक स्वतःच्या हाताने चिरलें.

रामराया ठार झाला. महाराष्ट्राच्या रामरायाचें राज्य पूर्वींच खलजी सुलतानांनी बुडविलें आज ( दि. २३ जानेवारी १५६५ ) कर्नाटकच्या रामरायाचें राज्य निजाम, कुतुब, आदिलादि सुलतानांनी बुडविलें. रामरायाचें शिर जल्लोषांत भाल्याच्या टोकावर धरून सुलतानी सैनिक नाचूं लागले. बारा इमामांचे झेंडेहि नाचत होते. विजयनगरचा पराभव झाला. एवढा दहा लाख फौजेचा समुद्र पराभूत झाला. केवढें आश्चर्य ! केवढें दुर्दैव ! एक लाख लोकांची कत्तल झाली.

आणि दुर्दैव हें की, आमचे मराठे सरदारहि रामरायाचे शत्रु म्हणून सुलतानांच्या बाजूने लढले.[3] हाय!! आपले कोण, हें तीनशे वर्षांच्या अनुभवानेहि कळूं नये काय?

या दिवशीं मंगळवार होता. घडलें मात्र अमंगळ. विजयनगर बुडालें.

पुढे सहा महिने सुलतानांच्या फौजा विजयनगर शहराचा सत्यानाश करीत होत्या. केवढी प्रचंड, सुंदर, संपन्न आणि अनुपम राजधानी ती. पांच कोस लांब, दहा कोस रुंद आणि वीस लाख लोकवस्तीच्या त्या नगरांत सौंदर्याने मुसमुसलेल्या शेकडो इमारती, देवळें, राजवाडे, विद्यामंदिरें होतीं. फोडून, तोडून, जाळून त्या शहराची सुलतानांनी अक्षरशः मसणवट करून टाकली! वीस लाख वस्तीच्या जागीं एकसुद्धा मनुष्य शिल्लक उरला नाही! जगांत विजयनगरच्या तोडीचें वैभवशाली व सौंदर्यशाली असें एकहि शहर नव्हतें. कूटो, फर्नाओ, नूनीज, डॉमिंगो पायेस, मॅन्युएल बर्राडास वगैरे कितीतरी परकीय गोऱ्या प्रवाशांनी विजयनगर प्रत्यक्ष पाहिलें व त्याचें वर्णनहि करून ठेविलें. हे लोक तर वैभवाने दिपूनच गेले होते.

राजा रामरायाचें मस्तक विजापूरच्या अली आदिलशहाने पोखरून काढलें. त्याने त्यांतील मांस व मेंदू काढून तें रिकामें केलें; व तें विजापुरांतील एका घाणमोरीच्या तोंडाशीं अशा कौशल्याने बसविलें की मोरींतील घाण रामरायाच्या तोंडांतून वाहात बाहेर यावी!

काय लिहावें? कोणती उपमा द्यावी आणि कोणाशीं तुलना करावी या सुलतानांची? असे होते हे सुलतान! अशांच्या जाचांत महाराष्ट्र जिणें जगत होता. एक किंवा दोन वर्षें नाही, सतत तीनशे वर्षें! तीनशे वर्ष!! सुलतानांचा अंमल आणि विषाचा अंमल सारखाच. यायचें मरणच!

आणि तरीहि महाराष्ट्राच्या मराठ्यांत लाचारीचें पीक फोफावत होतें.

क्षत्रिय, ब्राह्मण आणि सारेच आपलीं कर्तव्यें विसरले. बादशहा हाच देव आणि त्याची मनोभावें सेवा हाच धर्म झाला. भाषा, वेशभूषा, आचार, विचार, सर्व बिघडून गेलें. अमृताच्या पैजा जिंकणारी ज्ञानेश्वरांची कुलीन मराठी भाषा, सलवार तुमान पेहरून हजरत शहैनशाह बंदगान अली जिल्हे सुबहानी सुलतान आदिलशहाच्या आणि निजामशहाच्या खिदमतीस अदबीने अर्ज पेश करण्यांत मश्गुल झाली. अभिमान संपला. गुलामीचेंच भूषण वाटूं लागलें. मराठ्यांना पूर्वजांचा विसर पडला. अस्सल शहाण्णव कुळीचे आणि एकेकाळचे खरोखरीचे राजे आज केवळ पदवीचे लाचार 'राजे' बनले. हे कोण? हे राजे माने! हे कोण? हे राजे मोहिते! हे कोण? हे राजे चव्हाण! हे कोण? हे राजे निंबाळकर! हे कोण? हे राजे मोरे! हे कोण? हे राजे सुर्वे! हे कोण? हे राजे उदाराम! हे कोण? हे राजे घोरपडे! हे कोण? राजे! राजे! राजे! आज केवळ बादशहाची मर्जी सांभाळीत आणि एकमेकांचा हेवादावा करीत खुशाल बादशहांच्या पिकदाण्या धुवीत होते. वास्तविक हे फार शूर. जातिवंत मर्द. तलवार आणि घोडा हींच यांचीं कुलदैवतें. परंतु महाराष्ट्रधर्माला त्यांच्या तलवारींचा कांहीहि उपयोग नव्हता. बादशहांच्या पायापाशी गहाण पडल्या होत्या त्या. आपल्या गोरगरीब भावंडांचे हाल त्यांना दिसत नव्हते असें नाही. दिसत होते. पण मनें मेलीं की कशाचेंच कांही वाटेनासें होतें. गुलामींत अपमान वाटेनासा होतो. महारोग्याला सर्पदंशाच्या संवेदना होतच नाहीत म्हणे! तसेंच हें!

महाराष्ट्राची मसणवट झाली होती आणि हे लाचार सरदार बनले होते. या स्मशानांतले डोंब. वास्तविक हे पराक्रमी पुरुष एक झाले असते तर, दख्खनच काय, पण दिल्लीहि कोलमडली असती. पण कोणाला राजा व्हावेंसें वाटतच नव्हतें. मोठ्यांतला मोठा सरदार व्हावेंसें वाटत होतें. मोठ्यांतला मोठा सरदार म्हणजे मोठ्यांतला मोठा हुजऱ्याच ना?

पण दोष द्यावा कुणाला? देवगिरीच्या तख्ताचे औरस वारस म्हणवून घेणारे सिंदखेडचे जाधवरावच जेथे बंदे गुलाम बनून मुजरे करीत होते तेथे इतरांची काय कथा! पिढीजात पारतंत्र्याचा हा गुणधर्मच.

शंकरदेव यादवाच्या आणि हरपालदेवाच्या स्वाभिमानाचा अंशहि उरला नव्हता. पण तीनशे वर्षांपूर्वी महाराष्ट्राची माती करून गेलेल्या अल्लाउद्दिनाच्या रानटी आकांक्षेतून उठलेले हजारो अल्लाउद्दीन आजहि तितक्याच हिरीरीने कत्तलच्या रात्री गाजवीत होते. ही गुलामगिरी आणि लाचारी पाहून चिडत होता, चरफडत होता, फक्त सह्याद्रि!

* * *

---

**आधारः**—(१) मुघोघइ पृ. ७४ टीप व वऱ्हाड इति. या. भा. काळे. (२) बराइ पृ. २४२. (३) मुघोघइ बखर. (४) आघइ पृ. १६०, मुघोघइ पृ. २०४. (५) R. P. P. In India Danu. (६) Boletim Do Inst., VDG No. 68, 1952. (७) सीवेल पृ. १५१–५२. (८) सीवेल पृ. १५२. (९) सीवेल पृ. १५४. (१०) सीवेल पृ. १५६-५७. (११) सीवेल पृ. १५५, त्रिअ. (१२) बराइ पृ. २२१. (१३) बराइ पृ. २२३. (१४) आघइ पृ. ७५. (१५) आघइ पृ. ३८. (१६) आघइ पृ. ५०. (१७) मुघोघइ पृ. १९१. (१८) सीवेल पृ. ११६ ते ११८. (१९) सीवेल पृ. १५४. (२०) सीवेलचा ग्रंथ.

## ७ : पहाटेपूर्वीच्या अंधारांत

आता एका नवीन सुलतानाचें लक्ष दख्खनवर खिळलें. तो दिल्लीचा मोंगल सुलतान अकबर. मेवाडच्या रजपुतांची शिकार करून दमलेला अकबर रक्तशोषणाकरितां दख्खनकडे वळला. शाहजादा मुरादच्या हुकमतीखाली फौजा दख्खनवर दौडूं लागल्या. मोंगल, आदिलशाह, निजामशाह आणि कुतुबशाह यांची सत्तेसाठी आपआपसांत जोराची झुंज सुरू झाली. साम्राज्यासाठी झुंजत होते सुलतान; पण मरत होते मराठे. दख्खनी फौजेंत तेच संख्येने जास्त होते. सुलतानांकरिता लढायचें आणि मरायचें मराठ्यांनी ? आणि रडायचें मराठ्यांच्या विधवा बायकांनी अन् पोरक्या पोरांनी. लढाया क्वचितच् थांबत. त्या थांबल्या तरी रोजचे हाल चालूच राहात.

सुलतान झुंजत होते साम्राज्यासाठी. मराठे मात्र वतनदारीच्या भिकार तुकड्यासाठी भाऊबंदांचे आणि शेजारपाजारच्या मराठ्यांचेच गळे कापीत होते. या काळचा मराठ्यांचा इतिहास म्हणजे वतनाच्या हाडकासाठी चाललेल्या कुत्तेझुंजीचा इतिहास.

गरीब शेतकरी आणि बलुत्यांवर जिणें जगणारे गावकामगार मात्र हैराण झाले होते. नको झालें होतें जिणें त्यांना. मावळ्यांच्या अंगाला

कपडा मिळत नव्हता. पिकवलेल्या अन्नावर त्यांचा हक्क उरत नव्हता. तो हक्क लुटारू फौजांचा. धान्यावर, बायकोवर, अन् स्वतःवर तरी त्यांचा हक्क होता कुठे ? चीड येत होती, पण बोलायचें त्यांना धाडस होत नव्हतें.

पण बोलून दाखविणारा गोरगरिबांचा एक नाथ त्याहि कठीण काळांत पैठणमध्यें जन्माला आला होता. मोकळ्या मनाने सर्वांना भवती जमवून तो विठ्ठलाची भक्ति करी. महारापोरांवरहि मनापासून प्रेम करी. कथा-कीर्तन करी. पुराण सांगे. भागवत सांगे. सांगतां सांगतां सुलतानांचा असह्य जाच भागवतांतच गुंफून बोलून दाखवी. तो म्हणे—

ऐशिये वर्ततां मोहस्थिति । पूर्ण कळीची होय प्रवृत्ति ।
तेव्हां नीच ते राजे होती । प्रजा नागविती चोर प्राय ॥
अपराधेविण ते वितंड । भले त्यासी करिती दंड ।
मार्गस्था करिती कोंड । करिती उदंड सर्वापहरण ॥
गाईब्राह्मणांसी जाण । पीडा करिती दारूण ।
क्षेत्रवित्तदाराहरण । स्वार्थ प्राण घेताती ॥

हें दुःख बोलून दाखवितांना लोकांचा तो नाथ लोकांच्याहि नादानी-बद्दल कानपिळ्या देत असे.

दावलमलकाची पूजिती गदा । वर्षांतून फकीर होती एकदा ।
मग डोला होता थंडा खाती मलिदा । तुर्कांचें खरकटें ॥

बादशाही जुलमांची रास चढत असतांहि ब्राह्मणांचें सोवळें-ओवळें, क्षत्रियांची लाचारी, वैश्यांची लांडीलबाडी कमी होत नव्हती. सामान्य जनांना कोणाचाहि आधार नव्हता. सर्व बाजूंनी गांजणूक होत होती. प्रेमाचे शब्दहि महाग झाले होते. त्यांच्याशीं गोड बोलत होते एक नाथ.

ही स्थिति समाजाची होती. कित्येक पवित्र तुळशीवृंदावनेंहि भांगेच्या वनवासांत पडलीं होतीं. कुणाचें तिकडे लक्ष जाणार ? कुणी स्वार्थांत बुडाला

होता. कुणी अश्रूंत बुडाला होता. भागवतधर्माच्या महापुरुषाची समाधीहि वनवासांत पडली होती. नाथांचें लक्ष आळंदीकडे वासरासारखें खेचलें गेलें. ते समुदाय घेऊन आळंदीला लगबगा आले. तेथे पाहातात तों काय ? सर्व अरण्यमय ! आळंदीचें अरण्य बनलें होतें.[२] ज्ञानेश्वरांची समाधी त्या अरण्यांतील जाळ्या झुडपांत कुठे लुप्त झाली होती कोण जाणे ! झाडींत शिरायलाहि रीघ नव्हती. एका महान् योगीराजाच्या समाधीची ही स्थिति ! ही अनास्था ! हें पारतंत्र्याचें वरदान ! झाडींत शिरण्याच कुणालाहि धाडस होईना.[२] नाथ स्वतः ओरबाडे ओरखाडे सोशीत आंत शिरले. त्यांनी समाधी शोधून काढली.[२] झाडी, फांद्या, मुळ्या त्यांनी कापून काढल्या. भागवतधर्माच्या गळ्याला लागलेल्या ह्या मुळ्या नाथांनी काढल्या. समाधीचा जीर्णोद्धार केला. वारकऱ्यांची पताका उभी केली. लोक छपत छपत जमा होऊं लागले. विठ्ठल विठ्ठल म्हणूं लागले.

नाथांनी ज्ञानेश्वरीची श्रमपूर्वक जुळवणी करून शुद्ध प्रत सिद्ध केली. पिचल्यापिडलेल्या लोकांच्या–महारांच्यासुद्धा–घायाळ हृदयावर नाथ फुंकर घालीत. नाथांनी दुःखितांना हाक मारली. जखमा झाकून लोक नाथांभवती व विठ्ठलाभवती जमूं लागले. टाळ मृदंग पुन्हा वाजूं लागले. मंदावलेला आवाज धीराने वाढत चालला. नाथांच्या भजन–कीर्तनांत लोकांना समाधान, भक्ति, विरंगुळा आणि सामुदायिक भजन–कीर्तनाचा प्रेममय आनंद मिळत होता. त्यांत राजकारणाचा गंध नव्हता. धार्मिक विषयाशिवाय दुसऱ्या कशाचाहि खल नव्हता. प्रचार नव्हता. करायचा म्हटलें तरीहि अशक्य होतें.

धार्मिक व सामाजिक जुलूम चालूच होता. पुणें प्रांतांत या काळांत जनाब मीर मुहम्मद झमान याने एकट्याने तेहतीस मंदिरें उध्वस्त केलीं[3] ( इ. १५८६ ). आणि मोठ्या अभिमानाने ह्या पराक्रमाचा

शिलालेख कोरून ठेवला.[३] लोक मुकाट माना खाली घालून सहन करीत होते. सुलतानांनी न्याय देण्याच्या कामासाठी नेमलेल्या काजींच्या कामांत एक काम, असा विध्वंस करण्याचेंच होतें ![४] न्यायाधीशच असे ! न्याय कुठे मिळणार ? खानदेशांत जिझिया कर जारीने वसूल होत होता.[५] आदिलशाही सुलतानांची राज्यकारभार चालविण्याचीं जीं तत्त्वें लिहून तयार होतीं, त्यांत काफर प्रजेवर दडपशाही व जुलूम करण्याचा चक्क आदेश होता.[७] सर्व सुलतान सर्वगुणसंपन्न होते ![६] गोव्याच्या फिरंग्यांनी तर कहर चालविला होता. त्यांनी तर एका धडाक्यांत सहाशे देवळें लोळविलीं.[८] जिवंत जाळणें, तेलांत तळून काढणें वगैरे जुलूम शिगेला गेले होते. ते कोणता भयंकर जुलूम करतील हें सांगणें अशक्य झालें होतें. आणि तरीहि गोमंतकाची शांतादुर्गा अशांत होत नव्हती !

अशा कठीण काळांत विठ्ठलाच्या नांवानेहि लोकांना एकत्र आणणें बिकट होतें. एकनाथांनी तें सातत्याने केलें. नाथांना लोकस्थिति पाहावत नव्हती. ते तळमळीने अध्यात्माच्याच माध्यमांतूत शक्य तेवढें शिकवीत होते. अभंत गात होते; कीर्तनें करीत होते; भारुडें करीत होते; वासुदेवाचीं, वाघ्यामुरळीचीं, रोडग्याचीं गाणीं गात होते. शिमग्याची बोंबसुद्धा तळतळून मारीत होते.[९] ! ते परमेश्वराला आर्त हाक मारीत होते. समाजाच्या चित्‌शक्तीला ओरडून आवाहन करीत होते. शुंभनिशुंभ, चंडमुंड, महिषासुरादि राक्षसांचा संहार करणाऱ्या आदिशक्ति भवानीच्या दरवाजावर मुठी आपटून एकनाथ आक्रोश करीत होते, ‘ बये दार उघड ! बये दार उघड ! दार उघड ! दार उघड ! दार उघड !

दार उघड, बया दार उघड ।
अलक्ष्यपूरभवानी, दार उघड बया ।
माहूर लक्ष्मी, दार उघड बया ।

कोल्हापूरलक्ष्मी, दार उघड बया ।
तुळजापूरलक्ष्मी, दार उघड बया ।
तेलंगणलक्ष्मी, दार उघड बया ।
कन्नडलक्ष्मी, दार उघड बया ।
पाताळलक्ष्मी, दार उघड बया ।
अष्टभुजालक्ष्मी, दार उघड बया ।
पंढरपूरनिवासिनी, दार उघड बया ।
नमो निर्गुण निराकार । मूळ आदिमाया तूं साकार ।
घेऊनि दहा अवतार । करिसी दुष्टांचा संहार ॥
दार उघड, बया दार उघड ॥
दैत्यकुळीं हिरण्यकश्यपु जन्मला । तेणें तुझा भक्त गांजिला
तें न पाहावे तुजला । त्वां उग्ररूप धरिलें ॥
तेव्हां क्रोधें स्तंभ फोडून । नारसिंहरूप धरून ।
दैत्यासी वधून । प्रल्हाद दिवटा रक्षिला ।
बया दार उघड । दार उघड ॥
सीतेचोनि कैवारें । रावण मारिला सपरिवारें ।
अठरापद्म वानरें । गोंधळ मांडिला लंकेसी ।
सागर बांधोनिया शिळीं । करिसी लंकेची होळी ।
रावण कुंभकर्ण घेसी बळी । खेळसी शिरांची चेंडूफळी ।
बया दार उघड । दार उघड ॥
कलिचा प्रथम चरण । दैवतें राहिलीं लपून ।
तीर्थे सांडिलें महिमान । अठरा वर्ण एक झाले ।
म्लेंच्छें गांजिले देवभक्तां । महिमा उच्छेदिला सर्वथा ।
न चले जपतप तत्त्वता । एकरूप सर्व झाले ।
बया दार उघड । दार उघड ॥

अर्जुनरथीं स्वार होउनी । वाग्दोर हातीं धरुनी ।
रथ फिरविसी कवतुकें । बया दार उघड ॥
गणवाद्य भम् भम् भम् । दण् दण् दण् कडक् कडाड् ।
तोचि गोंधळ अंबे तुजप्रती । बया दार उघड । दार उघड ॥
ऐसें तुज न पाहवे जाण । म्हणोनी बैसलीस मौन धरून ।
विटेवरी समचरण ठेवून । निवांत बैसलीस ? बया ॥
नवखंड तुझी चोळी । सहा पाताळीं पाउलें गेलीं ।
एकवीस स्वर्ग मुकुटीं झळाळी । बया दार उघड ॥
शंखचक्रांकित शोभली । कोटिचंद्रसूर्यप्रभा वेल्हाळी ।
एका जनार्दनी माउली । करी कृपेची साउली बया ॥
दार उघड । बया दार उघड । दार उघड । दार उघड । दार उघड ।

महाराष्ट्राच्या सर्व देवतांना आदिशक्तीच्या स्वरूपांत पाहून नाथ परिस्थितीच्या भयाण अंधारांत दार ठोठावीत होते. ते ओरडून भवानीला विचारीत होते :

' हे जगदंबे, तूं राम होऊन रावण मारलास, नृसिंह बनून हिरण्यकश्यपु फाडलास, अर्जुनाच्या रथावर बसून गीता सांगितलीस. अनेक संकटांच्या प्रसंगीं धावलीस आणि आता म्लेंच्छांनी देवभक्तांना गांजलें आहे. तीर्थक्षेत्रें भ्रष्टलीं आहेत. देवदेवता लुप्त झाल्या आहेत. लोकहि काममोहक्रोधादि सहा शत्रूंच्या तडाख्यांत सापडले आहेत. आणि तूं मौन धरून बसली आहेस ! काय हें ? तुला ही आमची अंतर्बाह्य दुःखस्थिति पाहवेनाशी झाली म्हणून का तूं दार बंद करून निवांत बसली आहेस ? माउली धाव, कृपा कर, दार उघड ! दार उघड !!....'

नाथांचा आणि अनाथांचा तो आक्रोश महाराष्ट्रभैरवीच्या कानीं आदळत होता. राज्य अंधाराचें होतें. सोळाव्या शक शतकाच्या

उंबरठ्यांत उभे राहून भवानीपुढे हात जोडून नाथ हाकारीत होते, बये दार उघड ! बये दार उघड !

आणि अंधारांतच दार किंचित् किलकिलें झालें ! अनाथांनीं अधीर मनाने हात जोडून टक लावली. किलकिल्या दाराच्या बारीक फटींतून नंदादीपाचा प्रकाशझोत बाहेर पडला............मालोजी राजे भोसले !

* * *

---

**आधारः—**(१) शिचसा ४ ले. ७४७, ७४८, ७५२, ७५३. शिचसा ५ ले. ८३७. (२) एकनाथचरित्र, पांगारकर पृ. १२०. (३) ऐफासा १ ले. ८१, (४) सपत्रें पृ. ७७, ८२. (५) ऐफासा १ लें ३. (६) आघइ पृ. ३८, ५०, ७५ वगैरे. (७) इसंस्फुले पृ. २५. (८) Boletim Do Insti VDG No. 68, 1952. (९) एकनाथ समग्र गाथा.



## ८ : वेरूळ

गाभाऱ्यांत अंधार होता. देव दिसत नव्हता. तें एक फार फार प्राचीन मंदिर होतें. कुणी म्हणत, पांडवांनी वनवासांत असतांना बांधलें. कुणी म्हणत, अयोध्यापति रामाने वनवासांत असतांना बांधलें. खरें कुणीं बांधलें, कुणास ठाऊक! फार प्राचीन काळीं कुणींतरी बांधलें हें निश्चित. मग कोणीं वनवासांत असतांना बांधलें की सुवासांत असतांना बांधलें हें आंतल्या देवालाच ठाऊक! पण सध्या मात्र तो देव स्वतःच वनवासांत पडला होता. मंदिरांतील सुवास संपला होता आणि पांखरांची घाण दरवळत होती तेथे. देवगिरीच्या वैभवकाळीं दुधाच्या धारांखाली तो न्हात असे. सुवर्णाचे लखलखते दीप त्याच्या सान्निध तवत असत. रुद्राचे गंभीर पण प्रसन्न स्वर त्याच्या गाभाऱ्यांत घुमत असत. कोणे एके काळीं देवांच्या कल्याणार्थ भयंकर हलाहल प्राशन करून होरपळलेला तो नीळकंठ घृष्णेश्वर आपला दारुण दाह शमविण्या-करितां त्या प्रशांत, शीतल, सुगंधी मंदिरांत विसावला होता. तो त्याचा दाह क्षणांत शमला तेथे.

पण ते दीप विझले. घृष्णेश्वराचा शमलेला दाह पुन्हा उफाळून आला. तें सुंदर मंदिर मोडकळीला आलें.[१] भेगाळलें. खिळखिळें झालें. फुलें सुकलीं. अभिषेकाच्या दुग्धधारा आटल्या.

घृष्णेश्वराचें केवढें वैभवशाली मंदिर तें! भारतवर्षांतल्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक. जसा सौराष्ट्रांत प्रभासपट्टणचा वैभवशाली सोमनाथ, तसाच देवगिरीजवळ वेरूळचा घृष्णेश्वर. स्वतःच्या वैभवाची उठल्यासुटल्या घमेंड मिरवणाऱ्या व पार्वतीला हिणवणाऱ्या हिमालयालासुद्धा आपल्या या जावयाचें वैभव पाहून हेवा वाटला असेल.

पण तें आता संपलें होतें सारें. सोमनाथाच्या ठिकऱ्या उडाल्या होत्या आणि घृष्णेश्वराच्या फक्त ठिकऱ्याच उडालेल्या नव्हत्या. घृष्णेश्वराचे सारे भक्त हलाहलाहूनहि भयंकर अशा पारतंत्र्याच्या आगींत होरपळत होते. खाली आग, वर आग, दाहीहि दिशांस आग! मस्तकांचे फुटाणे उडत होते. एक दोन नाही; तीनशे वर्षें सतत. चंद्र आणि सूर्य अंधारांतच उगवत होते अन् अंधारांतच मावळत होते.

पण एक आश्चर्य होतें. नित्य नेमाने एक व्यक्ति त्या मंदिरांत देवदर्शनास येत होती. शरिराने धिप्पाड,[2] पण मुद्रेवर परम श्रद्धाभाव; वेषभूषा अस्सल मराठ्याची आणि चालचालणूक करारी कुळवंताची. ओसाड माळावर पडीक बनलेल्या त्या शिवालयांत ती व्यक्ति हळहळत शिरे.[3] घृष्णेश्वराची ती दैन्यावस्था पाहून तो पुरुष खेदावलेला दिसे. 'काय ही अवकळा! काय आपल्या पुरुषपणाचा अन् भक्तीचा उपयोग! हें परमश्रेष्ठ शिवालयहि आपल्या हातून रक्षिलें जाऊं नये काय? याची ही अवकळा आपल्या हातून दूर होऊं नये काय?' असे खिन्न भाव त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत.

घंटेच्या 'ठण्ण' आवाजाने देवळांतील पांखरें उडत. त्याचें काळीजहि फडफडूं लागे. तो आर्त भावाने हात जोडून कांहीतरी मागणें मागे. काय तें घृष्णेश्वरालाच ठाऊक. पण तें मागणें महत्त्वाकांक्षेचें होतें खास.

हें असें नित्य घडत होतें. त्या पुरुषाबरोबर वयाने थोडा लहान, पण

अगदी तसाच दुसरा एक पुरुष घृष्णेश्वरापुढे आशीर्वादाच्या आशेने आणि गुप्त महत्त्वाकांक्षेने मस्तक टेकवीत होता. दोघे अगदी सख्खे भाऊ शोभत होते. नव्हे, होतेच सख्खे भाऊ. थोरल्याचें नांव मालोजी अन् धाकट्याचें नांव विठोजी. वेरूळच्या बाबाजी पाटील भोसल्यांचीं हीं दोनहि मुलें. दोघांचेंहि आजपर्यंतचें आयुष्य लहानपणापासून वेरूळच्या वावरांत आणि भीमेच्या कांठीं गेलें. बाबाजी भोसल्यांना दहा गावची पाटीलकी होती. त्यांच्या वाडवडिलांनी ह्या पाटिलक्या मिळविल्या होत्या. म्हणजे विकत घेतल्या होत्या.[४] पुणें प्रांतांत भीमेच्या कांठीं देऊळगांव, हिंगणी, बेरडी, जिंती वगैरे गावांचें आणि वेरूळ, वावी, मुंगी, बनसेंदे वगैरे यादवपट्टींतल्या गावांचें[४] पाटीलपण व शेती-वाडी सांभाळून बाबाजी भोसले राहात होते. होते ते पाटील आणि शेतकरीच, पण स्वतःला 'राजे' म्हणवीत. बाबाजी राजे भोसले.[५] त्यांची वंशपरंपरेने अशी प्रामाणिक समजूत होती की, आपण प्रभु रामचंद्राचे वंशज आहोंत.[६] रजपूत आहोंत.[६] उदयपुरच्या राणा प्रतापसिंहाच्या सिसोदिया[१८] घराण्याच्या अस्सल औलादीचे आहोंत. अल्लाउद्दिनाशी चितोडच्या वेढ्यांत लढून आपल्या सात पुत्रांसह मेलेला राणा लक्ष्मण-सिंह हा आपला मूळ पुरुष आहे[३४] असें ते मानीत. मोठा अभिमान वाटे त्यांना. वास्तविक क्षत्रियाचें रक्त पण गुलामगिरींत कुणबावा करीत होते. तलवार खुंटीला राहिली होती. बिनराज्याचें राजेपण उरलें होतें.

मालोजी व विठोजी हत्यारें चालवायला आणि घोडा फेकायला मोठ्या तरबेजीने शिकले होते. पण पाठीवरचा आसूड आणि हातांतला नांगर सुटेना. वडीलधारी माणसें गोष्टी सांगत की, आपण रजपूत कुळीचे राजे. आपले वाडवडील सोन्याच्या अंबारीची दौलत भोगून गेले. फार फार मोठीं माणसें होऊन गेलीं तीं ! धर्मरक्षी चक्रवर्ती राजे !

अन् आम्ही ?

मालोजीच्या व विठोजीच्या डोक्यांत हाच सवाल झटकन् उभा राही. दोघांचेहि बाहु स्फुरत. पराक्रम करावा. दौलती मिळवाव्यात. देवा-धर्माची स्थापना करावी. आपल्या घृष्णेश्वराचें देऊळ पडीक झालंय् तें उद्धरावें असें त्यांना फार वाटे.

पण पराक्रम गाजवायचा कुठे? कुणासाठी?

मालोजीच्या ईश्वरनिष्ठ, परमधार्मिक[८] पण महत्त्वाकांक्षी मनांत विचार उठूं लागले. त्याच्या अंतःकरणांत उपभोगांची तहान नव्हती. धार्मिक व लोकोपयोगी कार्यांची तळमळ होती. त्या उदात्त हेतूनेच त्याचें मन थबथबलेलें होतें. मालोजी शंभूभवानीचा निस्सीम भक्त होता. तो सोमवारचें व्रत करी. पूजा केल्याशिवाय, बेल वाहिल्याशिवाय आणि तीर्थ घेतल्याशिवाय तो मुखांत अन्नाचा कण वा पाण्याचा थेंब घालीत नसे.[९] श्रीगोंद्याच्या शेख महंमदबाबांवर त्याची फार निष्ठा होती. त्याने शेख महंमदांचा गुरूपदेश घेतला होता.[१०] हे शेखबाबा फार थोर साधु होते. जातीने खाटीक. परंतु बकरीं कापायचा सुरा टाकून देऊन त्यांनी विठ्ठल आळविण्यासाठी हातीं टाळ घेतले होते. असें कसें झालें? फणसांत गरे कोठून आले? नारळांत पाणी कसें आलें? तसेंच! शेख महंमद अविंध, त्याचे हृदयीं गोविंद!

घृष्णेश्वराच्या मोडकळलेल्या मंदिराकडे पाहिलें, की मालोजीच्या मनाचा टवका उडे. तो शिखर शिंगणापुरासहि जाई. तेथे शिखरावर पाण्याचा तुटवडा अतिशय जाणवे. लोक पाण्याविना तळमळत. मालोजीला तीं तहानलेलीं तोंडें पाहवत नसत. इथें लोकांच्या ओठीं आपण पाण्याचा घोट घातला पाहिजे, असें त्याला फार वाटे. अनेक पवित्र ठिकाणच्या गैरसोयी, अडचणी व हाल आपण दूर करावेत असें त्याचें मन उठावणी करी. पण करावें कशाच्या बळावर? त्यासाठी पैसा लागतो. केलेलें टिकवायला सत्ता लागते. एवढा गाडीभर पैसा आणावा

कोठून ? अन् सत्ता ? पण त्याच्या मनीं स्वप्नीं मनोराज्यें हींच. सध्या तो मनोराज्याचा राजा होता !

आणि एक दिवशीं अपरूक घडलें ! मालोजी आणि विठोजी शेतांत खणत असतां त्यांच्या कुदळी अडखळल्या ! खण्ण् असा आवाज उमटला ! आश्चर्यच ! माती दूर सारून पाहिलें तर हंड्याचें तोंड ! पिवळीधमक लक्ष्मी मातीच्या थराखालून हसत होती. मालोजीचे डोळे गिरगिरले. अपार धन ! मालोजीला भूमिगत धन अवचित सापडलें ![७] शंकरपार्वतीची कृपा ! कुठेच मावेना एवढा त्याला आनंद झाला. डोळ्यापुढे बेलाचीं पानें लवलवूं लागलीं. घृष्णेश्वर ! शिंगणापूर ! पाण्याचें तळें ! दानधर्म ! आता सगळें सगळें करायचें !

धन वर काढलें. खण् खण् खण् खण् लक्ष्मीचीं नूपुरें वाजत होतीं. अन् मालोजीच्या मनांत घणघणत होती घृष्णेश्वराची घंटा आणि दौडत होत्या खडाड् खडाड् घोड्यांच्या टापा !

पण महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला. आता एवढें मोठें धन ठेवायचें कुठें ? सांभाळायचें तरी कसें ? मालोजीला लगेच एका जिवलगाची सई झाली. श्रीगोंद्याचे शेषाप्पा नाईक पुंडे. मालोजीचा आणि शेषाप्पांचा मोठा लळा जिव्हाळा होता. पिढ्यान् पिढ्यांचा घरोबा. विश्वासहि तसाच. त्याने ठरविलें की, धन शेषाप्पांच्या घरीं ठेवायचें. त्यांची मूठ चिरेबंदी आहे. एका गुंजभरहि त्यांतून गळायचें नाही. मालोजी शेषाप्पांच्या कानाशीं एकांतांत कुजबुजला. शेषाप्पा आनंदाने गदगदले. मालोजीने म्हटलें की नाईक, आता हें ओझें तुम्हीच सांभाळा. जसें जसें लागेल, तसें तसें नेईन. नाइकांनी ही प्रेमाची जोखीम घेतली. त्यांची श्रीगोंद्याच्या पेठेंत मोठी सावकारी होती. त्यांचा वाडा हुडा तसाच बळकट जडावाचा होता.

मालोजीने धन शेषाप्पांच्या हातीं दिलें आणि ओंजळी-ओंजळीने

खर्च आरंभिला. घृष्णेश्वराचा जीर्णोद्धार मांडला. तेथील शेवाल तीर्थाचीहि पुन्हा घडण सुरू केली. घृष्णेश्वरावर लघुरुद्राची अभिषेकधार सतत बरसूं लागली. नंदादीप उजळले. सुवास दरवळूं लागला. घृष्णेश्वरमंदिराचा मालोजी व विठोजी यांनी उत्तम प्रकारें जीर्णोद्धार केला.[१२] मालोजीने देवळावर शिलालेख कोरला.

'दास माळोजि बाबाजि व विठोजि बाबाजि भोसळे'

दोघा भावांनी वेरूळच्या तिमणभट बिन दामोदरभट शेडगे यांस अभिषेकाची व पूजेअर्चेची व्यवस्था सांगून त्यांना त्याकरिता नेमणूक करून दिली.[३६]

लगेच शिखरशिंगणापुरास महादेवाच्या डोंगरावर तळें खोदण्यास मालोजीने पहारी लावल्या.[१३] खण् खण् घावाखाली ठिणग्या उडवीत खडक तडातडा फुटूं लागला. पाणी लागलें. औरसचौरस तलाव पाण्याने तुडुंब भरला. देवदर्शनाला येणारा प्रत्येकजण तें गोड गार अमृत पितांना भोसले भावांना आठवूं लागला. यात्रा वाढूं लागली. भोसलेभाऊ अगदी कृतार्थ झाले.

तळें तयार झालें.[१७] तेथेच डोंगरावर शिवाची सेवा करीत एक साधु पुरुष राहत होते. त्यांचें नांव होतें गोदडस्वामी. स्वामी विरक्त व परमभक्त. खाली भुई, वर आभाळ हें त्यांचें घर. मालोजीचें लक्ष त्यांच्या उघड्या देहाकडे गेलें. त्याने स्वामींना तळ्याच्या तीराजवळ मठ बांधून दिला.[१४] सत्पुरुषाला सावली झाली. भुकेला यात्रेकरू पोटभर जेवून व गोड पाणी पिऊनच डोंगरावरून उतरावा ही मालोजीची इच्छा. त्याचें मनच फार मोठें. खानदानी, दिलदार. त्याने खोदलेल्या तळ्या-सारखेंच. मालोजीने कमींत कमी पांच गरजवंत अतिथींना पोटभर पुरेल इतका शिधा वांटण्याची मोईन शिखरावर करून दिली.[१४] मोईन म्हणजे नेमणूक.

वेरुळांत दोघां भावांनी आनंदासिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाचे देवालयास पूजेअर्चेसाठी बागायती जिरायती जमिनी दिल्या. तेलवातीची कायमची व्यवस्था केली.[१५] इतर अनेक देवस्थानांची अशीच थोडी फार व्यवस्था केली. शिवाय भव्य दरवाजांचे चिरेबंदी भव्य वाडे बांधले.[१३] पाणपोया, धर्मशाळा, विहिरी बांधल्या.[१३] अशींच किती तरी सत्कृत्यें केलीं. तो आता धर्मात्मा शोभूं लागला.[१३] त्याची कीर्ति पसरूं लागली. लोक गुण गाऊं लागले.

धर्मकृत्यें करीत असतांनाच मालोजीची नजर तलवारीकडे गेली होती. त्याने पदरीं हत्यारबंद मराठी जवान जमा केले. पागा सजविली.[७] मालोजी हत्यारबंद फौजबंद बनला.[१६] शहाणे, कर्तबगार, निष्ठेचे ब्राह्मण कारभारी त्याने पदरीं ठेवले. आपल्या वतनी उत्पन्नाची व्यवस्था त्याने त्यांच्यावर सोपविली.[३५] स्वतंत्रपणें पदरीं असा जमाव जमविणें म्हणजे धाडसाचेंच होतें. एरवी तो बंडखोरच ठरला असता. परंतु या वेळीं मोंगलांच्या स्वाऱ्यांचा निजामशाहींत धुमाकूळ चालला होता. एक जबर शत्रु अहमदनगरची निजामशाही दौलत घशांत घालूं पाहात होता. यावेळीं निजामशाहाला व त्याचा वजीर मलिक अंबर यांनाच माणसांची लढण्यासाठी जरूर होती. मालोजीचें नांव बादशाहाच्या कानीं गेलें.[२१] एक धिप्पाड खानदानी मराठा पदरीं पागा ठेवतो आहे आणि स्वतः शूरहि तसाच आहे, हें शाहाला समजल्यावर त्याने आपण होऊन नोकरी-करिता मालोजीला फर्मान धाडलें.[२१] त्याचा वजीर मलिक अंबर हबशी मोठा शहाणा, मुत्सद्दी व दूरदर्शी सेनानी होता.

तावडतोब मालोजी दौलताबादेस जाऊन निजामशाहाच्यापुढे हाजीर झाला.[२१] मालोजीच्या मागोमाग विठोजीहि दरबारांत दाखल झाला. बादशाहाने मालोजीला पुणें व सुपें परगण्यांची जहागीर देऊन दोघांनाहि पदरीं ठेवलें.[२२] ही जहागीर पंचहजारी होती. मालोजीराजांच्या हाताखाली

आता थोडा भूभाग आला. हातीं पडेल त्याचा चांगल्या कामीं उपयोग करावयाचा हें धोरण राजांनी ठेवलें. विठोजीराजांसारखा हरउद्योगांत लक्ष्मणासारखा पाठ राखणारा भाऊ त्यांना लाभला होता. मलिक अंबराने माया करून आणखी थोडीं गावें मालोजीराजांना दिलीं.[३३] आणि मालोजी-राजांच्या दारांत हत्ती झुलूं लागले. वैभव आलें. पण राजांचें देवावरचें आणि लोकांवरचें प्रेम रतीभरहि उणें झालें नाही. त्यांच्या जहागिरीच्या मुलुखांतले मावळमराठे सावलीसारखे सुखावले. राजांनी परगण्यांची आबादानी केली. लोकांवर मायेची पाखर धरली. त्यांना कौल दिला. साधतेंय् तेवढें साधून पुण्यकर्म करावें असें त्यांचें मन. कारण बादशाहाची मर्जी म्हणजे लहरी वारें. केव्हा कसें वाहील हें काय सांगावें? सुलतान म्हणजे कृतघ्न. कामापुरते तळी उचलतील. काम संपलें की सुळीं चढवतील.

मालोजीराजांच्या पत्नीचें नांव होतें उमाबाई. मालोजीराजांची उमा एका मोठ्या तालेवार सरदाराची मुलगी होती. फलटणच्या नाईक निंबाळकरांची ती लेक.[१९] उमाबाईचा स्वभाव फार प्रेमळ होता. ती जशी धार्मिक, तशीच भारदस्त व उदार होती. पतिव्रताहि तशीच.[२०] उमाबाईचा भाऊ वणंगपाळ ऊर्फ वणगोजी नाईक निंबाळकर मोठा जबरदस्त गडी होता. त्याची सरदारी विजापूरच्या आदिलशाही दरबारांत होती. लोक त्याच्या शूरपणावरून म्हणत, ‘राव वणंगपाळ, बारा वजिरांचा काळ!’ असें तिचें माहेर.

मालोजीराजांच्या आणि उमाबाईच्या मनाला एक रुखरुख फार लागून राहिली होती. त्यांना पुत्र नव्हता! दोघेंहि पतिपत्नी देवापाशी ‘उजवा’ कौल मागत होती. उमाबाई फार धार्मिक होती.[२३]

पुत्रप्राप्तीसाठी राजे व उमाबाई शिवाची आराधना करीत होते. व्रत-वैकल्यें करीत होते.[२३] उमाबाईची साधुसत्पुरुषांवरहि भक्ति होती.

अहमदनगरच्या शहा शरीफ पीरालाहि तिनें नवस केला होता.[२४] देवापाशी सतत तिचें मागणें एकच. मला सुपुत्राची आई कर !

आणि लौकरच उमाबाईस दिवस गेले.[११] दोघेंहि आनंदलीं. शंभूशिखरीचा राजा प्रसन्न झाला. पुत्र झाला. ( इ. स. १६०० चा सुमार ) मुलगा फार देखणा आणि सुदृढ होता.[२५] मुलाचें नांव ठेवलें, 'शहाजीराजे'. मालोजीराजांनी खूप मोठा दानधर्म केला. पुत्रोत्सव केला.

दोन वर्षें उलटलीं आणि त्यांना दुसरा पुत्र झाला. त्याचें नांव ठेवलें शरीफजी. शहाजी व शरीफजी हीं नांवें नगरच्या शहाशरीफ पीरावरून ठेवलीं.[२६] उमाबाईच्या मांडीवर सुख खेळूं लागलें.

रुईच्या कापसासारखे सुखाचे दिवस भुरूभुरू उडत होते. मालोजीराजे पुत्रांच्या गोड सहवासांत आनंदत होते. शहाजीराजे पांच वर्षांचे झाले. ते रूपाने फारच देखणे व तेजस्वी दिसत.[२७] शरीफजीराजे यावेळीं तीन वर्षांचे होते.

मालोजीराजे निजामी दरबारांतले मोठे तालेवार सरदार बनले होते. इतरहि अनेक मराठे सरदार दरबारांत होते. पण स्वकीयांविषयीं व देवाधर्माविषयीं मालोजीराजांची भावना इतर सरदारांपेक्षा वेगळी होती. इतर मंडळी शाहीसेवेंतच दंग असत. इतरांची देवभक्ति नवसापुरती होती.

मालोजीराजांनी पुणें प्रांताची रयत सुखविली होती. उमाबाईचें अन् रयतेचें सौभाग्य थोर. पण........! शिपायाचें जिणेंच अवघड असतें. त्यांचा मुक्काम सदैव मृत्यूच्या सरहद्दीवर असतो. मालोजीराजांना निजामशहाचा आकस्मिक हुकूम आला. लढाई मांडली आहे, टाकोटाक निघा !

तोंडचा घास पानांत टाकून राजे उठले. पागेला तयारीची ताकीद केली. मालोजीराजे निघाले. आपल्या धिप्पाड देहावर चिलखत चढवून आणि हत्यारें बांधून त्यांनी आपलें लाडकें धनुष्य[२८] हातीं घेतलें. देवाला

दंडवत घातले, बायकापोरांचा निरोप घेतला आणि घोड्याला टाच मारली. राजे गेले.

गेले आणि गेलेच ! पुन्हा माघारी आलेच नाही ! इंदापुरावर लढाई झाली आणि मालोजीराजे ठार झाले ![३०] आभाळांत आकस्मिक उगवलेला आशेचा हा तेजस्वी तारा अगदी आकस्मिकपणें तुटला ! उमाबाईचें अन् पुणें प्रांताचें सौभाग्य ढळलें. सावली आली आली आणि गेली गेली. अखेर दोन सुलतानांच्या आपापसांतील सत्ताबाजीला एका थोर मराठ्याचा बळी पडला ( इ. १६०५ चा सुमार ). मालोजीराजे गेले !

उमाबाई सती निघाली.[३०] शहाजीराजे व शरीफजीराजे अवघे पांच व तीन वर्षांचे होते. आता कुणीं कुणाला समजावायचें ? विठोजीराजांचा तर रामच गेला. ते अत्यंत दु:खी झाले. त्यांतहि त्यांनी मन घट्ट केलें. आपले डोळे आसवांनी तुडुंबले असतांहि मोठ्या धीराने ते सती जाणाऱ्या आपल्या भावजयीस म्हणाले—[३०]

‘ वहिनीबाई, राजे सर्वांना टाकून गेले. आता मन आवरलें पाहिजे. हें जगच असें अनित्य आहे. नाशिवंत देह. कितीहि रखवाली केली तरी जायचाच. वहिनीबाई, मुलांकडे पाहा. आता उगवलेले चंद्रसूर्य आहेत ते. त्यांचें यश अजून उजळायचें आहे. दोघेहि कोवळ्या वयाचे आहेत. त्यांचें जिणें तुमच्यावरच अवलंबून आहे. तुमच्याशिवाय तीं क्षणभरहि राहूं शकणार नाहीत. म्हणून माझी विनवणी ऐका ! धीर धरा ! मुलांकरिता तरी सती जाऊं नका ! राहा ! मुलांच्या मायेसाठी ! कल्याणासाठी ! ’

विठोजीराजांनीं फार सांत्वन केलें. आर्जव केलें. उमाबाई फार थोर

पतिव्रता, फार निग्रही, पण तिनेहि विवेकाने दुःख गिळलें. सती जाण्याचा तिने हट्ट सोडला.[३१]

मालोजीराजांच्या अस्थींवर इंदापुरांत समाधीचे चिरे चढले.[३२]

* * *

---

**आधार** :—(१) मरिया भा. १ पृ. २१. (२) शेडब. (३) शेडब. (४) चिब. (५) राजखंड १५ ले. ३६७. (६) मंडळ त्रै. वर्ष ८ अं. १ पृ. १; शिभा अ १ श्लोक ४२. (७) चिब; शेडब. (८) चिब; शेडब. (९) एकलमी ५. (१०) वा. सी. बेंद्रे संशोधित सनद. तुका संतसांगाती. (११) शिभा अ १ श्लोक ७३. (१२) मंडल इत्र. १८३८ पृ. १२६; शिदिजय पृ. ३८. (१३) शिभा अ १ श्लोक ५४ ते ५६. (१४) सपत्रें पृ. १०९. (१५) सपत्रें पृ. १०६. (१६) शिभा ११५७. (१७) राजखंड ८ ले ७१. (१८) मंडळ त्रै. व ८ अं. १ पृ. १; राजइ, गौरीशंकर ओझा. (१९) शिभा ११४९,५०. (२०) शिभा ११४९, २१६ व ७. (२१) शिभा ११६३ ते ६६. (२२) शिभा ११७०. (२३) शिभा ११७२. (२४) राजखंड ९ पृ. ६. (२५) शिभा ११७४. (२६) शिभा ११८८ ते ९०. (२७) शिभा ११७५, ७६ व ९१. (२८) शिभा २११ व २. (२९) शिभा २१२४ ते २८. (३०) शिभा २१८ ते २६. (३१) शिभा २१२७ व २८. (३२) शिवसा ५ ले. ८७५. (३३) राजखंड १५ ले. ३७१. (३४) मुघोघई पृ. ९; राजइ. (३५) शिभा ११७०. (३६) रामदासी अं. ६५ ले.६.



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम २५५७६ ..... वि: चरित्र
क्रमांक ८६५ ........ नों: दि: ........
१२-२-

## ९ : शिंदखेडचा राजा

मालोजीराजे गेले. भोसल्यांच्या खानदानीची शान गेली. यमराजाच्या सहीशिक्क्यापुढे कोणाचें कांही चालत नाही.

आता विठोजीराजांपुढे प्रश्न होता मालोजीराजांच्या पुणें प्रांताच्या जहागिरीचा. बादशाह व मलिक अंबर हे ही जहागीर तगीर करतात की काय अशी धास्ती वाटत होती. कारण शहाजीराजांचें वय होतें फक्त पांच वर्षांचें. वालीद हक्क झाले. औलाद् नातवान. तेव्हां जहागीर जप्त होणार असें स्पष्ट दिसूं लागलें.

पण वजीर मलिक अंबर मोठा दूरच्या नजरेचा होता. ‘ विठोजी भोसले शूर आहे. तो जहागीर सांभाळील. मालोजीराजाची जहागीर शहाजीराजाच्या नांवाने तशीच चालू ठेवावी. भोसले माणसें फार कर्तृत्वाचीं व शूर आहेत. जपावींत. लढायांत कामीं येतील. जर पुढे शहाजीराजा शूर निघाला तर उत्तमच. नाहीतर विठोजीच्या हयातीपर्यंत चालवूं. पुढे जप्त करूं ’ असा हिशेब करून जहागीर कायम ठेवण्याचा निर्णय त्याने घेतला.

बादशाह निजामशाहने स्वतः होऊन विठोजीराजांना तश्रीफ फर्मावली. त्याप्रमाणे विठोजीराजे दोन्ही पुतण्यांना बोटाशीं धरून दरबारांत हुजूरदाखल झाले. सुलतान निजामशाहने जातीने त्यांचें सांत्वन केलें.' राजे मालोजी भोसले गेले म्हणजे शाही तख्ताचीच

शान शौकत बरबाद झाली. राजे केवळ समशेरीचे फर्जंद होते. पण नशिबापुढे वकिली चालत नाही. बादशाह सांत्वनाचा मजकूर बोलला.[१] त्याने मातमपुरसी केली.

शहेनशाह बादशाह मोठे रहमदिल. जहागिरीच्या सनदा व वस्त्रें त्याने शहाजीराजांस इनायत करून निरोप दिला. शहाजीराजे वयाच्या पांचव्या वर्षीं निजामशाहीचे जहागीरदार झाले.[१]

पुणें व सुपें जहागिरीचा कारभार विठोजीराजे पाहूं लागले. मुलांच्या पालनपोषणाकडे त्यांचें सदैव लक्ष असे. मुलें मोठीं होऊं लागलीं. शैशव संपलें. बाळपण आलें. बाळपणहि लपूं लागलें. किशोरपण उगवलें. रुंद छातीच्या, पुष्ट खांद्यांच्या, चमकदार डोळ्यांच्या, बळकट दंडांच्या व बांकदार नाकाच्या देखण्या शहाजीराजांना किंचित् मिसरूड फुटूं लागलें.[११] वयाची त्रयोदशी ओलांडली. शस्त्रास्त्रांत राजे हळूहळू पटाईत होऊं लागले.

विठोजीराजांच्या व उमाबाईंच्या मनांत दोघांहि राजबाळांचीं लग्नें करावीं असा विचार येऊं लागला. मालोजीराजांचा फार फार मानस होता की, शिंदखेडच्या लखुजी जाधवरावांशींच सोयरीक करावी. जाधवरावांच्या अंगणांत चमकणाऱ्या एका चाणाक्ष चतुर चांदणीवर त्यांचें चित्त खिळलेलें होतें. हीच पोर आपली सून व्हावी अशी त्यांची अतीव तळमळ होती. पण ही इच्छा तडीला पोहोचली नाही. मधेंच नौका बुडाली. अर्धा डाव टाकून मालोजीराजे स्वर्गांत गेले.

जाधवरावांची ही लेक होतीच तशी. देखणी व बहुगुणी. जशी सोन्याच्या समईतील लवलवती सोनेरी ज्योतच. चपळ, नाजूक, सुंदर, प्रसन्न आणि तितकीच ज्वलंत दीपककळी. लखुजीराव जाधवरावांची लाडकी लेक. जिजाऊ! हसऱ्या शहाजीराजांच्याशेजारी जिजाऊ

७८८५ १०१

शोभावी कशी? अभिमन्यूशेजारीं उत्तरा जशी. खरोखर जिजाऊसारखें कन्यारत्न श्रीने पैदा केलें होतें![1]

विठोजीराजांनी जाधवरावांशीं सगाईची बोलणीं लावली. सनईची लकेर उठली. लखुजी जाधवराव तर हरकून गेले. शहाजीराजासारखा सोन्याचा तुकडा जावई म्हणून लाभतोय हें पाहून ते आनंदले. लगीन-घाई उडाली. कामाधामांची गर्दी उडाली. जाधवरावांनी ज्योतिषीबुवांना आवातन धाडलें. ज्योतिषीबुवा आले. पुरोहित आले. भोसलेराव जाधवराव बैठकीला बैसले. रावांनी मुहूर्त पुसला. ज्योतिष्यांनीं नवग्रह, तिथि अन् नक्षत्रांचें गणित मांडलें. बोटावरती मिळवणी केली. अनुकूल पाहिलें, प्रतिकूल पाहिलें आणि शुभमंगल मुहूर्त सांगितला.[२] कुंकवाचे टिळे लावले. तांबडे तुषार उडाले. दरवाजाच्या कपाळपट्टीवर गण-रायांनी आसन ठोकलें.

मांडव पडला. बोहलें सजलें. ताशे चौघडे झडझडूं लागले. मांडवा-खाली धावपळ उडाली. दरवाजावर तोरणें लटकलीं. जाधवरावांची जिजाऊ लगीनसाज सजली. तिच्या पावलांवर कुंकवाचीं स्वास्तिकें उमटलीं. हळदी लागल्या. हिरवा चुडा किणकिणूं लागला. भाळीं मळवट लावला. त्यावर अक्षता चिकटल्या. बाशिंग–मुंडावळ्या भाळावर विराजल्या. शहाजीराजांच्या अंगावरहि लगीनसाज चढला. त्यांच्या डोळ्यांत नवरेपणाची झाक तरळूं लागली.

देवक बसलें. लामणदिवे लागले. कृष्णवंशाची राजबाळी रामकुळीच्या राजकुमाराला माळ घालायला उभी राहिली. मुहूर्ताची घटका बुडाली. तोफाबंदुकांचा, वाद्यांचा आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. अंतरपाट दूर झाला. अक्षतांची व फुलांची वृष्टि झाली. शहाजीराजांची मान लक्ष्मीपुढे लवली. जिजाऊने राजांना माळ घातली. चंद्रवंश सूर्यवंश एक झाले. जिजाऊ भोसल्यांच्या घरची लक्ष्मी झाली.

सूनमुख पाहायला मालोजीराजे न्हते. सारी हळहळ तेवढीच होती. ते स्वर्गाच्या गवाक्षांतून अश्रूंच्या अक्षता टाकीत म्हणाले असतील की, 'बाळांनो, माझा आशीर्वाद आहे! उदंड औक्षाचे व्हा! सुखाचें राज्य करा!'

'लखुजीराजानं लगन तर भक्षं थाटाचं केलं. कुबेराले सोभेसा बख्खळ हुंडा दिल्हा.[1] पराटीच्या वऱ्हाडी मुलखांतला सासरा थो. लेक पुन्याचे भोसले राजाले दिल्ही. मग असा थाट तर त्याले करावाच लागतो राजाहो! काहून नोय करेल? थो तर शिंदखेडाचा राजाच होय ना बाप्पा! त्याले काय कमी? तुम्हाले माल्लम नोय काय? लखुजीराव तर डोंगरायेवढ्या धनाचा धनी.[2] लखुजीची लेक भाग्येवंत. तिला सासर नि नवरा पुन्याचा मिळ्ळा! कुकडं शिंदखेड, कुकडं पुनं. पैनगंगामायचें वऱ्हाडी पानी पुन्याले चाललं गेलं बाप्पा! शिंदखेड-राजाची कीरत गंगनाला गेली.'


मंगल वाद्यांच्या दणदणाटांत शहाजीराजांच्या शेल्याशीं गाठ मारून जोडवीं, तोडे आणि पैंजणांच्या मंजुळ निनादांत हंसगतीने पावलें टाकीत[1] जिजाऊने भोसल्यांच्या–आपल्या हक्काच्या–घरांत प्रवेश केला. जिजाऊ सासरीं आली.[4] नवरानवरी गृहप्रवेशाच्या वेळीं लक्ष्मी–नारायणासारखे शोभत होते.[3] त्या वेळीं जमलेल्या व तिच्याकडे कुतूहलाने व कौतुकाने पाहाणाऱ्या प्रौढ सवाष्णींनी तिला निरांजनाने ओवाळलें.[2]

खरोखर या वेळीं जिजाऊ फारच सुंदर दिसत होती.[4] कोणतीहि मुलगी लग्नांत सुंदरच दिसते. तें लगीनतेज असतें ना! पण जिजाऊ मूळचीच मुळीं रूपाने सुंदर होती.[4] त्यांतून लग्नाचा साज सजलेली. सही सही लक्ष्मीच! काळेभोर केस, विशाल भाळ, रेखीव भिवया, विलक्षण पाणीदार डोळे, सरळ सळसळीत नाक, शुभ्र सुंदर दात, तांबूस ओठ, गोरापान गळा, अत्यंत रेखीव बांधा, गोड शब्दस्वर, प्रेमळ

बोलणें, विनयी वागणें अन् प्रसन्न हसणें. अशी होती तिची मूर्ति.

लग्नांत अनेक प्रकारचे अलंकार तिच्या अंगावर घातले होते.[४] सार्थ लक्ष्मीपूजन. सुंदर फुलांची जाळी तिच्या मस्तकावर शोभत होती. केशभूषेंत रत्नांचे अलंकार घातले होते. तिच्या भालप्रदेशावर रत्नजडित चांदणी रुळत होती. मोतीं जडवलेलीं कर्णभूषणें कानांत डुलत होतीं. गोऱ्यापान नितळ गळ्यांत हिऱ्यामोत्यांचे कंठे चमकत होते. दंडांत सुबक वाकी होत्या, हातांत रत्नांच्या बांगड्या होत्या. ती भरजरी शालू नेसली होती. अंगात तिने जरीच्या सुंदर काठांची चोळी घातली होती. कमरेवर कमरपट्टा होता. पायांत तोडे व पैंजणें होतीं. बोटांत रत्नभूषणें होतीं.

*जिजाऊने भोसल्यांच्या घरांत प्रवेश केला*



खरोखर मूर्तिमंत राजलक्ष्मी ! राजलक्ष्मी[४] ! दुसरी उपमाच नाही; आणि आमचे शहाजीराजे ? भरदार पुरुषपण हेंच त्यांचें सौंदर्य होतें.

गृहप्रवेशानंतर उभयतांनी उमाबाईस नमस्कार केला.[४] सासू आनंदली. गाहिवरली. तिने आपल्या सुनेला हृदयाशीं धरून खूप शुभाशीर्वाद दिले. तिचें अति कौतुक केलें.[४] विठोजीराजांनाहि धन्यता वाटली.

भोसल्यांच्या कुळांत सौभाग्य आल. नवा आनंद आला. वऱ्हाडची रुक्मिणी सोन्याच्या पावलांनी पुणें प्रांतीं आली.

लौकरच शरीफजीराजांचेंहि लगीन दणाणलें. विश्वासराव नांवाच्या कुळवन् मराठा सरदाराची लेक नवरी केली. तिचें नांव दुर्गाबाई.[५] जावा-जावांनी आपल्या पतीला हसविलें. सासूचें दुःख निवविलें. मुलांच्या व सुनांच्या सहवासांत उमाबाई दुःख विसरली.[५]

विठोजीराजांनी मुलांकरिता सतत मोठ्या मायेने कष्ट घेतले. त्यांचा स्वतःचा संसारहि चांगला भरभराटलेला होता. त्यांच्या बायकोचें नांव होतें आऊबाई.[६] त्यांना एकूण आठ पुत्र होते.[७] त्यांचीं नांवें होतीं भाजीराजे, खेळोजीराजे, मालोजीराज, मंबाजीराजे, नागोजीराजे, परसोजीराजे, त्र्यंबकजीराजे व कक्काजीराजे. हीं सर्व भोसले भावंडें विठोजीराजांच्या भवती मोठ्या खेळीमेळीने आणि जिवाभावाने वागत होतीं.

* * *

---

**आधारः**—(१) शिभा २।३२ ते ३४. (२) शिभा २।४२ ते ४४. (३) शिभा २।६०. (४) शिभा २।४४ ते ६३. (५) शिभा २।६५ ते ६७. (६) राजखंड ९ पृ. ५. (७) शिभा ३।३ व ४. (८) एकलमीब.



## १० : हत्ती बिथरले !

जिजाऊ अद्याप लहान होती. शिंदखेडला होती तोंपर्यंत तिचें जग माहेरच्या उंबऱ्याआंत होतें. पण आता दौलताबाद येथे बादशाही राजधानींत राहण्याची वेळ आली आणि मग एक एक सुलतान-शाहींतले सुलतानी चाळे तिला दिसूं लागले. नवे नवे भयंकर प्रकार ऐकूं येऊं लागले. ' गाय मारली ! ' असें ऐकल्याबरोबर तिचें कोवळें काळीज करचळूं लागलें. लुटालुटी, देवळांचा व देवांचा चक्काचूर, आगीचे प्रलय, कापाकापी वगैरे प्रकार मोंगल व इतर सुलतानांच्या स्वाऱ्यांतून हमखास होत होते. मराठे केवळ रणांगणावर मरत नव्हते. तर खेड्यांतहि शहरांतहि, घरांतहि ! त्यांचा अपराध कोणता ? जन्माला आले हाच अपराध ! जिजाबाईला कसेंसेंच वाटे हें पाहून. पण हें असें कां घडतें आणि किती दिवस घडत राहणार हें मात्र तिला समजत नव्हतें. तिला सुलतानी सत्तेची शिसारी येऊं लागली.

मलिक अंबर हा निजामशाहीचा फार चांगला वजीर म्हणून त्याची कीर्ति ऐकूं येत असे. पण त्यालाहि नखें होतींच. त्याचे खायचे दातहि वेगळे होत. जिझिया करासारखाच एक कर त्याने कोकणांत बसविला होता. या कराचें नांव होतें ' जकाते हिंदुवानी. '

मालोजीराजांच्या मृत्यूच्या सुमारासच दिल्लीचा मोंगल बादशाहा

अकबर मरण पावला (दि. १५ ऑक्टोबर १६०५). त्याचा मुलगा सलीम ऊर्फ जहांगीर गादीवर आला. दख्खन जिंकण्याची त्याला बापाइतकीच भूक होती. त्याने फौजांच लोंढे दक्षिणेंत सोडण्यास सुरवात केली आणि लढायांचा कल्लोळ मराठ्यांच्या मुलखांत उडाला.

वर्षानुवर्ष मोंगलांच्या स्वाऱ्या दक्षिणेंत सतत चालूच होत्या ( इ. १६०८ ते १६१५ ). ह्या लढायांचे अर्थ आणि अनर्थ जिजाऊला समजूं लागले. न सांगतांच खुलासे होऊं लागले. बादशाही स्वारी म्हणजे कत्तली, लुटी, जाळपोळी, शेतीची माती, संसाराची माती आणि एकूण केवळ हाहाःकार ![१८] तिला स्पष्ट दिसूं लागलें की, सुलतानी स्वारीपेक्षा बहात्तर रोग एकवटून आले तरी ते एकवेळ आनंदाने लोक सहन करतील, पण ती सुलतानी स्वारी नको ! कारण ज्या गोष्टीला रोग कधीहि धक्का लावीत नाहीत त्या गोष्टीवर सुलतानी फौजा वखवखून तुटून पडतात. ती गोष्ट म्हणजे अब्रू ! सर्वस्वाबरोबर अब्रूहि लुटली जात आहे. कोण वाली ? कोणीहि नाही ! जिजाऊ अस्वस्थ होऊं लागली.

आणि लौकरच एक प्रचंड मोंगली फौज मराठवाड्यांत घुसली. वऱ्हाडांतील लोकांची दाणादाण उडाली. किंकाळ्यांनी पाषाण पाझरूं लागले. गरिबांच्या संसारांतील गाडगीं मडकीं घोड्यांच्या टापाखाली फुटूं लागलीं. मलिक अंबरने आदिलशाही मदत मिळवून फौजा जालना भागांत मोंगलांना आडविण्यासाठी आणल्या ( इ. १६१५ डिसेंबर ). दिल्लीचे मोंगली सरदार आसफखान, शाहनवाझखान, राजा मानसिंग वगैरेंच्या विरुद्ध निजामशाहीचे मलिक अंबर, बाबाजी काटे, शहाजी राजे व त्यांचे सर्व भाऊ आणि विजापूरकर यांची अखेर जालन्याजवळ रोशनगावापाशी मोठी तुंबळ लढाई झाली ( दि. ४ फेब्रुवारी १६१६ ). आणि मलिक अंबरचा पराभव झाला. मोंगल खडकी ऊर्फ औरंगाबादेवर धडकले. त्यांनी खडकी व भोवतीचा सर्व प्रदेश लुटून मारून

पार उध्वस्त केला.[३] लुटीचे ढीग घेऊन मोंगल बाळापूरच्या किल्ल्यांत रोहीणखेडच्या वाटेने गेले.[३]

निजामशाहीची राजधानी यावेळीं दौलताबादला होती. कारण अहमदनगर मोंगलांनी जिंकलें होतें.

फारा वर्षांपासून दिल्लीच्या सुलतानांना दख्खनची तहान लागली होती.[२] या लढाईच्या मागोमाग मोंगल शाहजादा खुर्रम ऊर्फ शाहजहान दिल्लीहून फौजा घेऊन स्वाऱ्या करूं लागला. तसाच नाश पुढे चालू.[३] त्याने खडकी शहर पुन्हा उध्वस्त केलें[३] ( दि. ५ मे १६२१ ).

लढायांत मराठ्यांचीच सर्वतोपरी भयंकर हानी होत होती. मरत होतीं मराठ्यांचीं जवान पोरें. कुणाकरिता ? कोणत्या ना कोणत्या तरी सुलतानाकरिता. अखेर मराठ्यांचीच माती ![१८] कां ? कां ? कां ? जिजाबाईच्यां डोळ्यापुढे हे प्रश्न ठिणग्यांसारखे तडतडत. हे आपले शूर मराठे कोणत्या ना कोणत्या तरी सुलतानाकरिता लढताहेत, मरताहेत. कुणी निजामशाहाची बाजू घेऊन, कुणी आदिलशाहाची बाजू घेऊन, कुणी मोंगलांची बाजू घेऊन. पण आपल्याच बायकापोरांची बाजू घेऊन लढायला मात्र कुणीच तयार नाही ! जिजाऊचें मन या गोष्टीने व्याकुळ होत होतें.

वेशीवर घोड्यांच्या टापा वाजल्या की लोक सैरावैरा धावत सुटत. मुलालेकरांची, पतिपत्नींची, बापलेकांची ताटातूट होई. न पळूं शकणारे म्हातारे–म्हाताऱ्या मरत. धाड परत गेली की गावांत लोकांनी येऊन पाहावें तों घरें पेटलेलीं, माणसें मेलेलीं आणि अनेक तरण्या पोरी बेपत्ता झालेल्या ! कोणाला हाक मारावी ? मराठा सरदारांना हें दिसत नव्हतें का ? असेल; पण डोळे आणि कान झाकूनच घ्यायचें ठरविलें म्हणजे काय उरणार ? स्वार्थ आणि लाचारी !

आणि एके दिवशीं भयंकर गोष्ट घडली.[५] जिजाऊला रडायला लावणारी


एके दिवशीं बादशाह निजामशाहाचा दरबार बरखास्त झाल्यावर सर्व सरदार घरोघर जाण्याकरिता बाहेर पडूं लागले. जो तो घाई गर्दीने निघाला. बाहेर या सरदारांचीं वाहनें घेऊन त्यांचे नोकर व स्वार-शिपायांचीं पथकें उभीं होतीं. कोणाचे घोडे, कोणाचे हत्ती अन् कोणाच्या पालख्या. राजवाड्याबाहेर पडत असलेल्या अमीर-उमरावांचे हे नोकरलोक आपआपल्या धन्याला लौकरांत लौकर घेऊन जाण्याकरिता स्पर्धा व गर्दी करूं लागले. त्या गर्दींत सरदार मंडळींचे झेंडेहि फडकत होते. गर्दी होऊं न देतां वाट मोकळी करण्याचा प्रयत्न दरबारचे भालदार करूं लागले. कांही सरदार वाहनांत बसून मार्गी लागलेहि.[७] लखुजीराजे जाधवराव असेच त्वरेने मार्गस्थ झाले होते.[८] मागे गर्दी, गोंधळ चालूच होता.

एवढ्यांत भयंकर आरोळ्या-किंकाळ्या उठल्या! शेकडो डोळे दचकून तिकडे वळले. अन् पाहातात तों सरदार खंडागळ्यांचा धिप्पाड हत्ती सोंड सपासप फिरवीत, मस्तक जोरजोराने हलवीत अन् चीत्कार करीत गर्दीवर तुटून पडला होता! दिसेल त्याला सोंडेने उचलून तो आदळीत होता. त्याच्या पायांखाली मस्तकांचा आणि बरगडयांचा चुराडा होत होता. लोक भयंकर किंकाळ्या फोडीत पळत होते. कित्येक मरत होते. हत्ती सोंड उंचावून बेफाम धावत सुटला होता. क्षणांत एकच धावाधाव व कालवा झाला. खंडागळ्यांचा हत्ती बिथरला! हत्ती बिथरला!

हत्तीवरती माहूत होता. गंडस्थळावर तो खचाखच अंकुश घालून हत्तीला आवरण्याचा प्रयत्न करीत होता.[९] पण तो बिथरलेला गजराज लोकांना तुडवीत, चीत्कार करीत धावतच होता. त्याने अवतार असा कांही भीषण धारण केला होता की, त्याला आडविण्याची कोणाला छातीच होईना[९]! परंतु एखाद्या कळपांतल्या हत्तीने गर्जना केली असतां दुसऱ्या कळपांतल्या हत्तीला ज्याप्रमाणे ती सहन होत नाही, त्याप्रमाणे

खंडागळ्यांच्या हत्तीचा तो पिसाट पराक्रम हत्तीइतक्याच एका शूर बहाद्दराला सहन झाला नाही. त्याचें नांव दत्ताजी जाधवराव.[१०] जिजाऊचा हा भाऊ. लखुजी जाधवरावांचा पुत्र. शहाजीराजांचा मेव्हणा. दत्ताजीने आपल्या घोडेस्वारांस हुकूम सोडला की, भाले बर्च्या चालवून ह्या पिसाळलेल्या हत्तीस आवरा! लगेच स्वारांनी व दत्ताजीने स्वतःहि हत्तीवर चाल केली. पण तो हत्ती म्हणजे प्रळयकाळचा मेघच भासत होता! जखमा होत असूनहि तो जास्तच धुमाकूळ घालीत होता. त्याने जाधवरावांच्या अनेक स्वारांना घोडयावरून सोंडेने ओढून दणादण भुईवर आदळलें आणि पायाखाली चिरडून मारलें!

*महाराष्ट्राचें क्षात्रतेज असें वाया चाललें होतें.*



दत्ताजीचे सैनिक हत्तीपुढे पराभूत झाले[११]! मरण चुकविण्यासाठी ते पळत सुटले! हा पराभव दत्ताजीला झोंबला! दत्ताजी हत्तीहूनहि जास्त पिसाळला! ता सिंहाप्रमाणे दृष्टि रोखून थेट हत्तीवर धावून गेला.[११] एवढ्यांत शहाजीराजांचा चुलतभाऊ म्हणजेच विठोजीराजांचा मुलगा संभाजीराजे भोसले हा मोठ्याने ओरडून दत्ताजीला म्हणाला,[६]

"राजे, हत्तीस मारणें गरज नाही! हत्तीस मारणें गरज नाही!!"

आणि संभाजीराजे व खेळोजीराजे हे भोसलेबंधु हत्तीच्या रक्षणासाठी धावले! खंडागळेहि आपल्या हत्तीला जाधवरावाच्या हल्ल्यांतून सोडविण्याचा यत्न करूं लागले. हत्ती जखमांनी रक्तबंबाळ होऊन शेंदराच्या डोंगरासारखा दिसत होता. तो आपलें मस्तक जोरजोराने हलवीत होता. भोसले आणि खंडागळे हत्तीला दत्ताजीच्या हातून वाचविण्यासाठी धावले. पण तेवढ्यांत दत्ताजीने हत्तीवर घाव घालण्यास सुरवात केलीच. 'हत्तीला मारूं नका, हत्तीस मारण्याची गरज नाही,' असें ओरडून संभाजीराजे म्हणत होते व हत्तीवरचे घाव आडवीत होते. पण दत्ताजी चिडून इतका बेफाम झाला होता की त्याने कांहीहि न ऐकतां सपकन् वार घालून हत्तीची सोंडच साफ छाटली! त्याच्या सोंडेंतून रक्ताचा धबधबा पडूं लागला! हत्तीचें सामर्थ्य आणि वैभव संपलें! तो ची ची करूं लागला.[१२]

पण एवढ्यावरच संपलें नाहीं. हत्तीला पुरतें घायाळ करून दत्ताजीनें एकदम संभाजीराजांवरच हल्ला चढविला! ऐकेना! त्याची तलवार सपासप फिरूं लागली आणि मग दोघांत खडाजंगीची लढाई सुरू झाली! खडाखड घाव पडूं लागले. दत्ताजीची व संभाजीची ही झटापट पाहून दोघांच्याहि बाजूची मंडळी हत्यारें घेऊन धावली. एकच झुंबड उसळली आणि दोन्ही पक्षांत अटीतटीची झुंज सुरू झाली.[१३]

आपल्या चुलतभावावर आपला मेव्हणा तुटून पडलेला पाहून खुद्द

शहाजीराजांना संताप आला. आपल्या व जाधवरावांच्या संबंधाकडे दुर्लक्ष करून शहाजीराजे संभाजीराजांच्या मदतीस धावले.[१३] दत्ताजी ढाल तरवारीने लढत होता. तो इतक्या विलक्षण आवेशाने तलवार फिरवीत होता की, जणू आपल्या भवती त्याने तेजोवलयच बनविलें हात. त्या आकस्मिक युद्धामध्यें सामील झालेल्या वीरांच्या गर्जनांनी दिशा बधिर झाल्या. अनेक मुंडकीं जमिनीवर गडगडत लोळूं लागलीं. रक्ताच्या सड्याने धुरळा दबला.[१३]

आणि उडाला ! दत्ताजी जाधवराव उडाला ! संभाजी भोसल्याच्या हातून दत्ताजी ठार झाला ! [१३] लखूजींचा मुलगा भोसल्यांच्या हातून मेला !

राजे लखूजी जाधवराव आधीच पुढे निघून गेलेले होते. ते खूप दूरवर गेलेले होते. एवढ्यांत वाऱ्याच्या वेगाने मुलाच्या वधाची ही बातमी त्यांच्याकड दौडत आली. आणि मग भयानक ज्वालामुखीच भडकला! ती बातमी ऐकून लखूजी संतापाने लाल लाल झाले. त्यांच्या अंगाची लाही उडाली. त्यांच्या क्रोधाने सृष्टि शहारली. लखूजी तस्सेच माघारी फिरले ![१४] संभाजी भोसल्याला ठार मारण्याकरिता ! ! सूड घेण्याकरिता ! उघड उघड सूडाच्या गर्जना करीतच ते धावत सुटले.[१४]

आणिं आलेच ! गदारोळाप्रमाणे ते त्या धुमाकुळांत घुसले. त्यांचे ते डोळे, भिवया, ओठ, दात अगदी बिथरले होते. लखूजींना समोरच लढतांना दिसले ते शहाजीराजे भोसले ![१५] प्रत्यक्ष जावई ! लाडक्या लेकीचें सौभाग्य ! पण संपलीं, तुटलीं नातींगोतीं आता ! प्रीत संपली ! माया संपली ! लखूजींनी खाडकन् शहाजीराजांवर घाव घातला ![१५] घाव राजांच्या दंडावर बसला आणि जबर जखम होऊन शहाजीराजे भुईवर कोसळले ! त्याच क्षणीं ते बेशुद्ध झाले.........म्हणूनच केवळ बचावले ! नाही तर त्यांचें मुंडकच उडालें असतें खास ![१५]

लगेच लखूजीराजे संभाजी भोसल्यावर धावले. तोहि झुंजूं लागला. काळजांत धडकी भरविणारें युद्ध कडकडूं लागलें. जखमांची दोघांवरहि जाळीं झालीं. तेवढ्यांत लखूजींनी एक जबरदस्त घाव संभाजिवर घातला. वर्मींच बसला त्याच्या ! संभाजी ठार झाला ![१६] पोराच्या मरणाचा पुरता सूड लखूजींनी उगवला. प्राणाचा बदला प्राणाने घेतला!

दत्ताजी जाधवराव आणि संभाजी भोसले निजामशाहाच्या महाला-पुढे मरून रक्तांत पडले होते. शहाजीराजे जखमी होऊन बेशुद्ध पडले होते. इतर अनेक मेले होते. मुंडकीं धुळींत लोळत पडलीं होतीं. जाधवरावांची तलवार सूडाच्या रक्ताने निथळत होती. आणि बादशाही महालावरचा निजामशाही हिरवा [१९] झेंडा हसत हसत फडकत होता !

एवढें भयंकर रणकंदन झाल्यानंतर मग हजरत जिल्हे इलाही निजामशाह बादशाह महालांतून बाहेर आले ![१७] त्यांनीं उभय पक्षांचें सांत्वन केलें आणि त्यांना झगड्यापासून परावृत्त केलें ! !

जाधवराव मंडळी दत्ताजीचें आणि भोसले मंडळी संभाजीचें प्रेत घेऊन दुःख करीत तेथून स्वस्थानीं गेली.[१७]

काय म्हणायचें या प्रकाराला? कोणतें नांव द्यायचें? एक तासापूर्वी कोणाला कल्पनाहि नव्हती की येथ असा कांही तरी भयंकर प्रकार घडणार आहे. पण एका तासांत वादळ उठलें. आणि मराठ्यांच्या तलवारी एकमेकांचे मुडदे पाडण्यासाठी एकाएकी उसळल्या. मराठ्यांतील यादवीचें सामर्थ्य विधात्याहूनहि मोठें होतें का? होय ! विधात्याने रेखलेल्या भाग्यरेखाहि ही यादवी आपल्या पावलांनी सहज पुसून टाकीत होती. महाराष्ट्राच्या कुंडलींत अवचित घुसून शुभग्रहांचींहि माथीं भडकविणारी ही अवदसा मराठ्यांची दाणादाण मराठ्यांच्याच हातून घडवीत होती. जाधवराव भोसलेराव यांच्या ढालीतलवारी जिजाऊ–शहाजींच्या लग्नयोगाने एकत्र आल्या. दोन कर्तृत्ववान् मराठी

मनगटें एकजीव झालीं. अगदी सासरे-जावयाच्या नात्याने एकजीव झालीं. आता कदाचित् कांही भाग्याचें, सौभाग्याचें घडेल, अशी आशा कोणा आशावंताच्या मनांत उगवते न उगवते तोंच ती अवदसा घुसलीच मध्यें ! भाग्य राहिलें. सौभाग्यहि राहिलें. वैधव्य मात्र भाळीं आलें. दत्ताजी जाधवरावाच्या अन् संभाजी भोसल्याच्या बायकांचें कुंकू ढळलें !

रक्त गळून गेलें होतें. आता गळत होते अश्रु. भोसले मंडळी संभाजीकरिता दुःख करीत होती. जाधवराव मंडळी दत्ताजीकरिता शोक करीत होती.[१७]

जिजाऊने कोणाकरिता रडावें ? भावासाठी की दिरासाठी ?

ती रडत होती अवघ्या नादान महाराष्ट्रासाठी !

* * *

---

**आधारः**—(१) शिचसा ९ पृ. २९. (२) शिचसा १ प्रस्तावना पृ. २. (३) इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली, कलकत्ता, सप्टेंबर १९३३. (४) शिभा २।३९. (५) शिभा ३ रा संपूर्ण अध्याय. (६) राजखंड ९ पृ. ८. (७) शिभा ३।९ ते १४. (८) शिभा ३।३९. (९) शिभा ३।१५ ते १७. (१०) शिभा ७।१८. (११) शिभा ३।१९ ते २२. (१२) शिभा ३।२३ ते २६. (१३) शिभा ३।२६ ते ३७. (१४) शिभा ३।३८ ते ४१. (१५) शिभा ३।४२ ते ४४. (१६) शिभा ३।४५ ते ५०. (१७) शिभा ३।५१ ते ५५. (१८) राजखंड १६ ले. ३; शिपसासं. ले. ३०, ३१, ३४. (१९) आघइ पृ. ४५.



# ११ : पृथ्वी आंदोळली

हत्ती आपआपसांत झुंजले आणि मेले. भोसले आणि जाधवराव एकमेकांचे कायमचे वैरी बनले. जिजाऊचें माहेरपण संपलें !

दौलताबादच्या शाही खलबतखान्यांत जाधवरावांचा कपटाने घात करण्याची कुजबूज चालू असल्याची चाहूल लखूजी जाधवरावांना एक दिवशीं लागली.[१] निजामशाहाचीच आपला घात करण्याची तीव्र मनीषा आहे हें लखूजींना उमगलें. ते उठले अन् तडक मोंगलांना जाऊन सामील झाले. त्यांनी निजामशाही सोडली.[२] लखूजी मोंगलांचे सरदार झाले.

याच वेळीं दिल्लीचा शाहजादा शाहजहान याने बापाविरुद्ध बंड पुकारलें. ती एक वावटळ सुरू झाली ( इ. १६२३ जुलै ).

रक्ताक्षी संवत्सर उगवलें. महाराष्ट्रांत एका प्रचंड सुलतानी युद्धाचे ढग जमूं लागले. मलिक अंबरने निजामशाहीच्या रक्षणासाठी विजापूरच्या आदिलशाहाची मदत मागितली. पण आदिलशाहाने निजामशाहीला मदत करण्याऐवजी मोंगलांशींच दोस्ती केली. मोंगली आणि आदिलशाही फौजा एक झाल्या आणि निजामशाहीवर चालून आल्या. ऐंशी हजार फौज होती ही. त्यांच्याविरुद्ध वजीर मलिक अंबरने केवळ निजामशाही

फौज उभी केली. त्यांत शहाजीराजे, शरीफजीराजे, विठोजीराजांची सर्व मुलें आणि हंबीरराव चव्हाण, मुधोजी नाईक निंबाळकर, विठोजी काटे, नृसिंहपंत पिंगळे प्रभृति मराठे सरदारच अधिक होते. मनसूरखान, याकूतखान, फत्तेखान वगैरे इतरहि होते. पण मराठयांच्या मानाने फारच थोडे.[२३] म्हणजेच निजामशाहीचा जीव वांचविण्यासाठी मराठेच मरणार होते.

अखेर घनघोर संग्राम झाला[३] ( इ. १६२४ आक्टोबर ). अहमदनगर-जवळ भातवडी येथे हें विख्यात युद्ध झालें. हजारो लोक मेले. शहाजीराजांनी व सर्वच मराठयांनी पराक्रमाची कमाल केली. विशेषतः शहाजीराजांनी शौर्याची सीमा केली.[२४] शहाजीराजांच्या शत्रूकडून म्हणजे मोंगल फौजेकडून त्यांचे सासरे लखूजी जाधवराव लढत होते! वास्तविक कोण कुणाचे शत्रु आणि झुंजत होते कोण ! मराठयांचा काय संबंध या नरमेधाशीं ? पण नरमेधाचे मानकरी मराठेच ! हजारो बळी पडत होते. सासरे-जावई एकमेकांविरुद्ध जीव खाऊन लढत होते.

अखेर भोसल्यांनी त्या हजारोंत आपल्याहि घरचा एक नैवेद्य अर्पण केलाच ! शरीफजी राजे भोसले लढतांना ठार झाले.[४] शहाजीराजांचा सख्खा धाकटा भाऊ ठार झाला. जिजाऊची जाऊ विधवा झाली ! कोणासाठी ? सुलतानशाही टिकविण्यासाठी हें बलिदान ! अखेर मोंगली व विजापुरी फौजांचा जंगी पराभव करून शहाजीराजांनी निजामशाह आणि वजीर मलिक अंबर यांना विजय मिळवून दिला. जंग जिंकलें ( इ. १६२४ ऑक्टोबर ).

निजाम आणि मलिक अंबर या दोघांनाहि खूप आनंद झाला. शहाजी भोसल्यामुळेच आपल्याला जय मिळाला हें त्यांना पक्कें कळून चुकलें. राजांच्या शौर्याचा दरारा चारीहि पातशाहींत विलक्षण वाढला. आणि नेमकें हेंच मलिक अंबराला सहन होईनासें झालें ! मलिकला

शहाजीराजांच्या सामर्थ्याचा धाक पडला. हा मराठा कानामागून येऊन भलताच तिखट झाला! याचा काटा काढला पाहिजे! अन् मलिक अंबर शहाजीराजांचा द्वेष करूं लागला. शहाजीराजांच्या व खेळोजी, परसोजी वगैरे चुलतभावांच्या एकींत बिघाड झाला. हीं चुलतभावंडें राजांचा द्वेष करूं लागलीं.[२१] मलिक अंबराचेंहि राजांशी पटेना. राजांचा वारंवार अपमान होऊं लागला. शहाजीराजांना हें समजेना. ज्यांच्याशीं आपण निष्ठेने वागतों, ज्यांच्याकरिता प्राणपणाने लढतों ते आपली हीच का किंमत ठेवतात? आपल्या वडिलांनी आणि भावाने तख्ताकरिता प्राण दिले. तरीहि यांना त्याची पर्वा नाही. शहाजीराजांच्या विचारचक्राला गति मिळाली. हें असें कां?

त्यांना चीड आली. पण पुढे काय? अखेर निजामशाही सोडून जावें असें त्यांनी ठरविलें. पण कुठे जायचें? दुसऱ्या सुलतानाकडे! म्हणजे गाडीवान बदलायचा अन् गाडी बदलायची! जूं मानेवरती कायमच! वेसण, फटके आणि पराण्या कशा चुकायच्या? शहाजी-राजांना सारें सारें उमगत होतें. पण मार्ग सापडत नव्हता. ते उठले. वैतागले होते. तडक विजापूरला आदिलशाहाकडे नोकरी मागायला गेले.[२२] एक शूर वाघ दुसऱ्या दरवेशाच्या दावणीला गेला. विजापूरच्या इब्राहिम आदिलशाहाने त्यांना खूष होऊन सरलष्करचा हुद्दा दिला. शहाजीराजे सरलष्कर झाले.[५]

लढाया चालूच होत्या. मलिक अंबरने मुलुखमैदान तोफेच्या साहाय्याने सोलापूर जिंकलें[६] (दि. १६ जून १६२५).

पुण्यालगत मावळांत लढाई झडली.[७] मेले मराठेच (दि. ४ फेब्रुवारी १६२६).

एवढ्यांत सगळ्या बादशाह्यांत राजकारण एकदम घुसळून निघालें. एका वर्षांत तीन मोठीं माणसें मेलीं. निजामींतला मलिक अंबर वजीर

मेला[१०] ( दि. १४ मे १६२६ ). विजापूरचा बादशाह इब्राहीम आदिलशाह मरण पावला ( दि. १२ सप्टेंबर १६२७). आणि दिल्लीचा मोंगल बादशाह जहांगीर वारला ( दि. २९ ऑक्टोबर १६२७ ).

दिल्लीला शाहजहान बादशाह झाला. विजापूरला महंमद आदिलशाह बादशाह झाला. आणि निजामशाहींत फत्तेखान वजीर झाला. हा फत्तेखान मलिक अंबराचा मुलगा होता.

हे तिघेहि पापग्रहच होते. शाहजहानने दख्खनवर अफाट फौजा पाठवून सतत लढाया मांडल्या.

हा फत्तेखान अत्यंत क्रूर व कपटी होता. लढायांमुळे राज्यकारभाराचें धिरडें झालें होतें. गोरे फिरंगीहि येथील सुलतानी अंमल पाहून थक्क होत होते.[११] अंदाधुंदी व जुल्म म्हणजे राज्यकारभार ! ह्या फत्तेखानाच्याच कारकीर्दीत सुरुरखान नांवाच्या सरदाराने पाटोदें येथील तिमाजी बायदेव देशपांडे यास दौलताबादेस धरून नेलें. मरेतों झोडपून काढलें. अखेर तो मेला. त्याचा भाऊ कृष्णाजी देशपांडे यालाहि नेलें होतें. त्याचेहि हाल अतोनात केले.[२] हें सर्व कशाकरिता ? पैसे उकळण्याकरिता ! दौलताबादचा ' काळा कोट ' म्हणजे यमपुरी होती.[१२] हालांत सडून सडून माणसें मरत तेथे. न्याय नाही. चौकशी नाही. फिर्याद नाही.

नाशिक येथे सुंदरनारायणाचें फार प्राचीन अप्रतिम मंदिर होतें. महानुभाव चक्रधरस्वामी येथे येऊन गेले होते.[१३] तें देऊळ मोंगलांनी फोडून टाकलें. त्याची मशिद केली आणि तेथेच कबरस्तान बनविलें.[१४] आंतल्या सुंदर मूर्ति कुठे गेल्या ? यवनांच्या भयाने सुंदर नारायणाने म्हणे रमा आणि लक्ष्मीसह गोदावरीच्या डोहांत उडी टाकली[१४] !!! भेकडांचा देवहि भेकडच ! डोहांत उडी टाकली म्हणे ! भोळसट मराठ्यांनी गुलामी वृत्तींतून काढलेला हा भेकड निष्कर्ष ! उडी टाकली म्हणे ! हातांत गदा आणि चक्र असलेला चार मनगटांचा देव आपल्या बायकांसह

डोहांत उडी घ्यायला लागला! मग गोरगरिबांनी आणि त्यांच्या बायकांनी कुठे उड्या घ्याव्यात?

आदिलशाहाने दाभोळच्या देशमुखास जबरदस्तीने बायकापोरांसह बाटविलें व जहाजावर चढवून अरबस्तानांत पाठवून दिलें.[१५] त्यांनी समुद्रांत उडी टाकायची म्हटलें तरीहि अशक्य होतें. आत्महत्या करण्याचें तरी स्वातंत्र्य उरलें होतें कुठे?

पिंपळगाव पिसें हा गाव मोंगलांनी पिळून लुटून काढला. धन, धान्य, बायका, गुरेंढोरेंसुद्धा लुटलीं.[१६] खूप लोक धरून नेले. हालांनी त्यांतील असंख्य मेले. मोंगलांनी गावाची पुरती धूळदाण केली.[१६] (दि. २ जून १६२९).

किती सांगाव्या या कर्मकथा? हें असें सतत चाललें होतें. आमच्यांतले बुद्धीचे कुबेर म्हणजे वेदशास्त्रसम्पन्न ब्राह्मण! त्यांची विशाल बुद्धि तरी ह्या परिस्थितीचा कांही विचार करीत होती का? छेः छेः छेः! त्यांना वेळच मिळत नव्हता! नाशिक येथे गोदावरीच्या ऐलतीरावरचीं देवळें फुटत असतां पैलतीरावर तेथील वेदोनारायण पळी–पंचपात्र्या घेऊन तिरीमिरीने भांडत होते. कशासाठी? तर, यात्रेकरूंपैकी ऋग्वेद्यांचीं पिंडें कोणीं पाडायचीं आणि यजुर्वेद्यांचीं पिंडें कोणीं पाडायचीं यासाठी[१७]!! श्राद्धाच्या पिंडासाठी भांडण! कावळेसुद्धा हो भांडत नाहीत पिंडासाठी! किंबहुना वाटच पाहावी लागते तासन् तास, केव्हा एकदाचा कावळा पिंडाला शिवतो याची! पण कावळ्यांतलें हेंहि शहाणपण आमच्या वेदशास्त्रसम्पन्न धर्ममार्तंडांत नव्हतें. डोक्यांत अंधार होता गडद! ते आपसांत भांडत आणि निर्णय मागायला जात बादशाहाकडे किंवा वजिराकडे![१७] कुणीं कुणाचें श्राद्ध करायचें याचा निर्णय बादशाह करणार!

वणीच्या सदाशृंगी भवानीची पूजा कोणीं करायची, हा तंटा सुलतानी ठाणेदारापुढे जात होता![२०] अशा भयंकर विपन्नावस्थेंतहि

नाशिक येथे गोदातीरीं एखादा वेदशास्त्रसंपन्न सत्पुरुष सापडे की जो स्नानसंध्या करून राजकर्त्या वजिरास किंवा सुलतानास दुवा देऊन कालक्रमणा करी ![२७]

हत्ती आपआपसांत झुंजून मरत होते आणि कोल्हे राज्य करीत होते.

ब्राह्मण असे होते. क्षत्रिय तसे होते. लबाडी हा वैश्यांचा कुळधर्म झाला होता. गरिबांचा महाराष्ट्र टाचेखाली मरत होता. दुःख, दारिद्र्य, उद्वेगें लोक सर्वत्र पीडिले[१९] होते. आपल्या घरच्याच लेकीसुनांचें अपहरण आणि आक्रोश पाहावत नव्हतें, ऐकवत नव्हतें. कानांत बोटें घालून आणि डोळे घट्ट मिटून घेऊन रडण्याशिवाय बिचारे कांहीहि करूं शकत नव्हते. मनस्वी हाल.

जिजाऊच्या आसवांचीं हीं सारीं उगमस्थानें होतीं.

एवढ्यांत त्या कल्लोळांतहि कुठेतरी मंगलवाद्यें वाजूं लागलीं ! वाद्यें थांबलीं आणि कुणा ब्राह्मणाने अक्षता फेकून आरोळी दिली, ‘ सावधाऽऽन ! सावधाऽऽन ! ’

कोण सावध होणार ? निःशब्द शांतता पसरली अन् एक बारा वर्षांचा पोरगा खडबडून सावध झाला ! मंगलवाद्यांऐवजी लोकांचें रडणें आणि कण्हणें त्याला ऐकूं येऊं लागलें. त्याचें डोकें भणाणलें. त्याने कान घट्ट आवळले. त्याला ऐकवेना. त्याचीं आतडीं पिळवटून निघालीं. तो बेभान होऊन धावत सुटला. त्वरेने धावत सुटला !

त्याला हीं दुःखें पाहवेनात. अज्ञान आणि अनाचार साहवेनात. डोळे झाकले की कानांना दुःख ऐकूं येई. कान झाकले की डोळ्यांना दुःख दिसे. तो विव्हळ झाला. कुणाला या वेदना सांगूं ? कोण माझें गाऱ्हाणें ऐकेल ? तो क्षणभर थांबला. सभोवार तहानेल्या नजरेने त्याने पाहिलें. दृष्टीची प्रत्यंचा ताणली गेली. त्याला एकदम ‘ लक्ष्य ’ सापडलें.

त्याने तळमळून हाक मारली. " रामा ! " आणि जास्तच वेगाने तो धावत सुटला. प्रत्यंचेंतून सुटलेला बाणच जसा !

तो नाशिकच्या पंचवटीला आला. एका मंदिरांत रामाची शांत मूर्ति हसत होती. आतुर होऊन त्याने रामाला मिठी मारली. अन् नेत्रीं आसूं आणीत म्हटलें,

' रामा ! बघवतें तुला हें ? चल जरा देवळाबाहेर अन् ऐक त्या आरोळ्या ! रामा ! आम्हीं तुला फक्त मरतांनाच हाक मारायची का ? हे बघ सारे रावण, मारीच, अहि–महि, कसा धुमाकूळ घालीत आहेत ! सारी पृथ्वी यांनी उलथीपालथी केली. कुण्णीसुद्धा त्राता उरला नाही ! तुझ्यापुढे या वेदनांचा किती पाढा वाचूं ? '

' रामा, तुझ्या या सीतामाईला राक्षसांनी नेल्याबरोबर तूं आकाश-पाताळ एक केलेंस. प्रत्यंचा ताणीत ताणीत समुद्राच्या लाटा ओलांडून तूं लंकत गेलास. एका स्त्रीसाठी राक्षस न् राक्षस ठार केलास ! आणि हें बघ काय चाललें आहे ! '

' उभें शेत राहिनासें झालें. अन्न नाही, वस्त्र नाही, घर नाही ! आजची आई, बहीण, बायको, उद्या आपली कोणीहि नाही ! दुसऱ्याची बटीक बनते आहे ती ! संसार संपलेत. संहार सुरू झाले आहेत. औघी बैसलों बैसलों बैसलों मराया ! '[१८]

" आता सांग रामा ! जगायचें कसें ? बुद्धीला भ्रम झाला आता. कुठे आहोत, कुठे जायचें, काय व्हायचें हेंच समजत नाही. कांहीहि उरलें नाही. कोणाचाहि आधार राहिला नाही. '

' सांग काय करावें तें ? आता मी हे पाय सोडणार नाही ! मला सामर्थ्य दे. मी लोकांना जगाचा आाणि जगायचा व्यवहार शिकवीन, व्यवहारचातुर्य शिकवीन. आचार शिकवीन. धर्म शिकवीन. लोकांना

तुझें आणि मारुतीचें अनुकरण करायला शिकवीन. कणखर अध्यात्म शिकवीन. मला समर्थ कर ! '

रामदासांनी रामाची सेवा आरंभिली. गोदावरीच्या डोहांत उभें राहून सूर्यनारायणाच्या तळपत्या तेजाखाली घोर तपश्चर्या आरंभिली. समर्थ होण्याकरिता ! वयाच्या बाराव्या वर्षापासून ! ( इ. १६२० ).

तिकडे देहूचा डोहहि डहुळला ! एका वाण्याने हातांतली तागडी फेकून भागवतधर्माचा वीणा उचलला ! त्यानेहि तळतळून म्हटलें,

तुका म्हणे, देवा ! काय निद्रा केली धावा !
बैसोनिया तख्ता, अन्नेवीण पीडिती लोका !

देहूचे तुकाराम निःसंदेह विदेही बनले. त्यांनी पांडुरंगाला हाक मारली. ते स्वतःला विसरले. 'मी' कोण हें त्यांनी ओळखलें. मी देवाकरिता आहे, भागवतधर्माकरिता आहें एवढीच जाणीव उरली. परोपकारापुरते व भागवतधर्मापुरते उरलेले निःसंदेह तुकोबा म्हणाले,

"माझीया 'मी'पणावरी पडो पाषाण। जळो हें भूषण नाम माझें !"

रामदासांनी शस्त्रगर्भा कुबडी हातीं घेतली. तुकारामांनी शांत मधुर वीणा हातीं घेतला. तुकाराम आणि रामदास दोघांतहि 'राम' होता. इंद्रायणी आणि गोदावरीच्या डोहांत उठलेले तरंग पसरूं लागले. रामदासांनी रामाला मारलेल्या हाकेचे अन् तुकारामांनी विठ्ठलाला मारलेल्या हाकेचे प्रतिध्वनि सह्याद्रीच्या गिरिगव्हरांत उमटूं लागले. तीस वर्षांपूर्वीची नाथांची आणि अनाथांची ती हाक पुन्हा घुमूं लागली—

'बये दार उघड ! बये दार उघड ! बये दार उघड !'

आणि एका बयेने डोळे वटारले ! तिच्या मस्तकांत वन्हि धुमसूं लागला. तिच्या डोळ्यांतून ठिणग्या तडतडूं लागल्या. बया अशांत झाली ! कर्तव्याचा दरवाजा खडाडकन् उघडून बया क्रांतीच्या

उंबरठ्यावर आली ! अनाथांची, पीडितांची, दुखावलेल्या महाराष्ट्राची ही बया—


कोण ?

जिजाबाई ! मूर्तिमंत सौदामिनी !

* * *

---

**आधार**:—(१) शिभा ४।१ ते ३, शिपसासं ले. १४३, १४६. (२) मरिया, पृ. ३१. (३) जेधे शका. (४) शिभा ४।५९. (५) राजखंड १५ले. ३९८. (६) मरिया १ पृ. ३४. (७) राजखंड १६ ले. १२. (८) जेधे शका. (९) आघइ पृ. ४५. (१०) राजखंड १६ ले. ७. (११) मसांइ पृ. १७२. (१२) आघइ पृ. १७८, मंडळ अ. १८३४ पृ. १३६. (१३) स्थान पोथी ६३. (१४) मंडळ अ. १८३५, पृ. ३१६, ३१८; शिचसा २ ले. ३१४. (१५) शिचसा ४३८, (१६) शिचसा ५ ले. ७६८. (१७) शिचसा ४ ले. ७०६ ते ९. (१८) अस्मानी-सुलतानी-समर्थ. (१९) श्रीसमर्थवाङ्मय. (२०) मंडळ त्रै. व. ६ अं. १ ते ४ पृ. ६७. (२१) मरिया १ पृ. ३५ व ३६. (२२) शिभा ५।११ व १२. (२३) शिभा ४।१० ते २१. (२४) शिभा संपूर्ण ४ था अध्याय. (२५) मंडळ अ. १८३४ पृ. १३६. (२६) शिवराजचरित्–गागाभट्ट. (२७) शिचसाले २८९.



## १२ : जिजाबाई

मराठ्यांच्या संसाराची, मराठ्यांच्या मुलखाची आणि तीर्थक्षेत्रांची ही दैना पाहून जिजाबाईच्या हृदयींचे कढ अनावर होत. तिचा ऊर भरून येई. इतर सरदारणींसारखा पालखीमेण्यांत आणि दागदागिन्यांत घोटाळणारा तिचा स्वभावच नव्हता. जगावेगळी बाई होती ती. जगदंबेची ती ज्वलंत भक्त होती. जगदंबेने महाक्रूर मायावी राक्षसांना आपल्या आठहि हातांनी ठार मारून पृथ्वीला पडलेला अजगरी विळखा सोडविला. त्या आठ हातांपैकी निदान एका तरी हाताचें बळ मला दे म्हणून जिजाबाई भवानीपाशी मागणें मागत होती. आपली मराठ्यांची जात अस्सल क्षत्रियाची. गोब्राह्मण आणि प्रजापृथ्वीचें पालन करणें हें आपलें ब्रीद. सारी पृथ्वी यवनाक्रांत झाली. तिला सोडवून धर्मसिंहासनाची स्थापना करावयाची की या जुलमी मग्रुरांपुढे माना वाकवायच्या? मराठ्यांच्या जातकुळीचा धर्म नव्हे हा! जिजाबाईला मुजरेबहाद्दरांचा तिटकारा येई. तिला दास्याची कल्पनाच सोसवत नव्हती. तिला स्वतःचें राज्य हवें होतें. स्वराज्य! स्वतंत्र मराठी सिंहासन! तिला हवा होता आपला झेंडा, आपली फौज, आपला तोफखाना, आपला सेनापति, आपला प्रधान! आमच्या मुलखावर राज्य करतील आमचे सार्वभौम चंद्रसूर्य आणि आमचा सार्वभौम राजा!

काय भयंकर कल्पना ही ! असलीं भयंकर मनोराज्यें करणारी सुलतानद्रोही व्यक्ति असुक एका घरांत राहते असें जर बादशाहाला कळलें असतें तर केवळ अंदाजाने तोफा लावून त्याने त्या व्यक्तीची, त्या घरासकट, त्या गावासकट धूळदाण उडविली असती. आणि तीहि मराठयांच्याच हातून ! मराठयांचा स्वतंत्र राजा आणि राज्य? अशक्य !

प्रत्यक्ष जिजाबाईला स्वतःला कांहीहि कमी नव्हतें. घरीं हत्ती झुलत होते. धनदौलत, हत्तीघोडे, नोकरचाकर, पालखीमेणे इत्यादींनी घर भरलेलें होतें. नटून सजून मिरवायचें म्हटलें तर दुरडीभर डागिने होते. राहायला चौदाचौकी वाडा होता. पण तिला स्वराज्य हवें होतें. बस्स् ! दुसऱ्या कसल्याहि मृगजळाने तिची तहान भागणारी नव्हती.

ती असंतुष्ट आणि चिडखोर बनली होती. जहागीरदारांची आणि सरदारांची तिला चीड येई. यांना स्वाभिमान नाही, कुळाशिळाची चाड नाही, बेअब्रूची चीड नाही. मोठेपणासाठी स्वतःची आईसुद्धा विकायला कमी करणार नाहीत हे. लाचार, स्वार्थी, गुलाम. पुरुष कसले हे? देव, देश आणि धर्म प्रतिपाळील तोच पुरुष !

असें शहाजीराजांनाहि वाटे. आपलें राज्य असावें. आपणच राजे असावें. पण हें शक्य होतें का? त्यांना सुलतानी सत्तेची चीड येई. पण ती त्यांना गिळावी लागे. अन्यायाविरुद्ध उठले असतेच तर लाख समशेरीपुढे उरले असते एकटेच. अवतीभवती कोणीहि साथीला उभे राहिले नसते. आणि मग बंडखोर म्हणून समशेरीखाली त्यांच्या देहाच्या पाकळ्या उडाल्या असत्या. जिजाबाईच्या मंगळसूत्रांतील मणि आणि शहाजीराजांच्या देहाचे तुकडे कुठे उधळले गेले असते ते शोधूनहि गवसले नसते ! वास्तविक शहाजीराजे फार मानी होते.[२] मराठपणाचा आणि रजपुतपणाचा त्यांना फार अभिमान वाटे. आपल्या मराठयांबद्दल त्यांना फार प्रेम आणि कळकळ वाटे. त्यांच्या कल्याणासाठी आपल्या-

कडून होईल तेवढी धडपड ते करीत.[2] मोहित्यांसाठी[3], घोरपड्यांसाठी[4] त्यांनी केवढे कष्ट घेतले! पण सुलतानीपुढे त्यांचें बळ उणें होतें. राग आला की या बादशाहींतून त्या बादशाहींत जाणें एवढाच उपाय त्यांच्यापुढे उरे. निजामशाहींतून आदिलशाहींत, आदिलशाहींतून पुन्हा निजामशाहींत, निजामशाहींतून मोंगलशाहींत अन् तिथून असेंच कुठेतरी! फक्त बादशाही नोकऱ्यांची अदलाबदल. विषाची चव फक्त वेगवेगळी. परिणाम एकच! मराठयांना स्वतःचें हित कुठे समजत होतें? यावनी सत्तेविरुद्ध लढेल, वागेल तो 'पापी'! पण व्यभिचारी, शराबी अत्याचाऱ्यांच्यापुढे झुकेल तो स्वामिभक्त! तो मग उमराव, नुश्रतजंग, हिम्मतबहादर, अर्कानेदौलत, उम्देतुल्मुल्ख! जर शहाजीराजांनी स्वतःचें राज्य स्थापावयाचा प्रयत्न केला असता, तर मराठयांनीच त्यांना कडकडून विरोध केला असता!

जिजाबाईला हेंहि कळून चुकलें की, या शूर पण अज्ञानी मावळ मराठयांना एक करून सुलतानांविरुद्ध उठवणारा कोणीतरी रामासारखा प्रतापवान् पुरुष हवा आहे. असा प्रतापी पुरुष जन्माला येईल तर....? येईल का?

तिला रामायण, महाभारत फार फार आवडत. राम, हनुमान्, सीता, कृष्ण, द्रौपदी, कुंती, विदुला या सर्वांच्या कथा ऐकतांना तिच्या मनावर विलक्षण परिणाम होई. तिला वाटे, आपण नाही का कुंतीच्या पंगतीला बसूं शकणार? तिचा भीम, तिचा अर्जुन अत्यंत पराक्रमी निपजले. त्यांनी राक्षस अन् कौरव मारले. सुखसमृद्ध धर्मराज्य स्थापन केलें. कुंती वीरमाता, राजमाता ठरली. मला तिच्या पंगतीला बसायचेंय्! बसेन का? कोण बसवील?

तिचा असंतोष फोफावूं लागला. तिची जगदंबेवरील भक्ति वाढूं लागली. आजची स्थिति मी पालटीन आणि भवानीदेवी मला साहाय्य

करीलच हा विश्वास तिला वाटूं लागला. पण ती अगदी अधीर झाली होती. उद्याची गाय आपण निर्वाणीने सोडवूं, पण आजची गाय मरते आहे हें तिला पाहवत नव्हतें.

या घुमसणाऱ्या मनःस्थितींत ती हें मात्र कधीहि विसरली नाही की आपण एक संसारी स्त्री आहोंत. एका पुरुषाची पत्नी आहोंत. शहाजीराजांस निजामशाहाची निरुपायाने नोकरी करावी लागते आहे, त्यांच्याहि मनांत आपल्यासारखेच विचार घुटमळत आहेत, एक दिवस संधी मिळाली तर ते बादशाहीचीं सारीं सूत्रें आपल्याच हातीं घेतल्याशिवाय राहणार नाहींत, हें ती जाणून होती. आणि हें खरेंच होतें. शहाजीराजांना खरोखरच स्वतःची दौलत स्वतंत्र हवी होती. आज बंड पुकारणें अशक्य होतें. पण ते विटले होते. संधी पाहत होते.


जिजाबाई असंतुष्ट होती. पण घरांतल्या माणसांशीं वागतांना नव्हे. ती खरोखर अत्यंत प्रसन्न, शांत, प्रेमळ आणि हसतमुख होती. सर्वांशीं ती प्रेमाने वागे. पदरच्या नोकरचाकरांना व कारकून–कारभाऱ्यांना तिच्याबद्दल फार प्रेम आणि आदर वाटे. ती असंतुष्ट आणि कोपिष्ट होती, ती सुलतानांच्या बाबतींत. त्यांचें नांवहि तिला सहन होत नसे. पार्वती जशी शिवशंकराच्या संसारांतील प्रसन्न अन् प्रेमळ गृहिणी होती, तशीच जिजाबाईहि राजांची प्रेमळ राणी होती. कधी चुकूनमाकून संसारांत बेलाचा काटा मोडला तर पार्वती शिवशंकरावर चिडत नसे. आपला पति निरुपायाने विषारी सापांच्या गराड्यांत पडला आहे, हें ती जाणून कैलासावर संसार करी. जिजाबाईहि राजांशीं अशाच समजूतदारपणाने वागे.

कैलासावरच्या उद्यानांत हंसगतीने मंद मंद पावलें टाकीत, आपल्या कोमल हातांनी फुलें आणि बिल्वपत्रें वेचणारी तीच ती मृगनयना, मधुवचना, स्मितवदना, गानलुब्धा, हेमवर्णा, सुशांता, कोमलांगी, हिम-

कन्या पार्वती, पृथ्वीचा हंबरडा कानीं पडतांच........ तिचे स्वर आणि स्वरूप अकस्मात् पालटून जाई. हातांतील फुलांची परडी उधळली जाई. भिवयांचें धनुष्य कडाडा मोडे. डोळे भयंकर विस्फारले जात. त्यांत लालबुंद आग उसळे. वाऱ्याने केशसंभार नाचूं लागे. करकरा दंतपंक्ति वाजूं लागत. मुठी वळल्या जात. भालप्रदेशावर मळवट लालावूं लागे. दोनांचे जागीं आठ हात प्रकटत. परशु, खांडा, त्रिशूळ, धनुष्य, गदा, चक्र इत्यादि भयंकर शस्त्रें तळपूं लागत. भडकल्या ज्वाळांचें अग्निकुंड एका हातीं धगधगूं लागे. श्वासोच्छ्वास जोराने सुरू होई. दणदण पावलें वाजूं लागत. शेष डळमळूं लागे. भयंकर गर्जना

............

*अद्याप ती अंबिका देव्हाऱ्यांतून रणांगणांत उतरली नव्हती*



करीत सिंह धावत येई. आणि मग ती अक्राळविक्राळ महादुर्गा सिंहावर आरूढ होऊन हिमालयाच्या शिखराशिखरांवरून झेपावत, शस्त्रास्त्रें खणखणावीत निघे! तें भयानक रौद्र स्वरूप पाहून प्रत्यक्ष कैलासेश्वरहि भयचकित होऊन जाई. आकाशींचा सूर्य चळचळा कापत आपले हजारो हात जोडून उभा राही. त्या महाकाली, महादुर्गा, महाचंडिका, महाभैरवी भगवतीची झेप सिंहासकट महिषासुरावर पडे. राक्षसांशीं आठहि हातांनी तिचा उग्र संग्राम सुरू होई. फुलें वेचणारी स्मितवदना पार्वती ती. हीच हें ओळखण्याचें सामर्थ्य शिवशंकरांत, गजाननांत, सरस्वतींत वा कार्तिकेयांतहि उरत नसे. ते सर्व भांबावून जात.

भोसल्यांच्या गृहदुर्गेचें तें रौद्रस्वरूप अद्याप सुप्त होतें. तिचे हजारो हात अजून अदृश्य होते. अद्याप ती अंबिका देव्हाऱ्यांतून रणांगणांत उतरली नव्हती!

सोनोपंत डबीर, दादाजी कोंडदेव, नारोपंत मुजुमदार, बाळकृष्णपंत हणमंते इत्यादि वृद्ध अनुभवी कारभाऱ्यांच्या सहवासांत जिजाबाई राजकारणांतील अनेक गुंतागुंतीच्या गोष्टींची उकल शिकत होती. चार पातशाह्यांच्या उलाढाली तिच्या कानावर नित्य पडत होत्या. देशस्थिति व लोकस्थिति तिला कळत होती. शहाजीराजांचीं राजकारणें ती प्रत्यक्षच पाहात होती. लोकांचीं मुकीं मनें तिला पक्कीं समजलीं होतीं. स्वार्थी सरदार आणि मोठे मोठे वतनदार सोडले तर सामान्य गरीब मराठी जनता सुलतानी सत्तेला कंटाळली आहे; पण तिच्यांत धाडस नाही. जर कुणी या कष्टाळू, प्रामाणिक आणि शूर मावळ्यांना हाताशीं धरील, तर हा शेकडो किल्ल्यांचा अवघड सह्याद्रि आणि चिवट मराठ्यांचा महाराष्ट्र एक क्षणभरहि पारतंत्र्यांत राहणार नाही. तुळजापूरनिवासिनी भवानीची भक्ति करणारे तिचे भक्त तिच्यासारखेच शूर आहेत. फक्त म्होरक्या हवा आहे, हें तिनें जाणलें.

जिजाबाईला राजकारण समजलें! उमजलें! तिची तहानभूक रोज जास्तजास्तच वाढूं लागली. ती जगदंबेला विनवूं लागली की, माझ्या मनींची आस पुरी कर!

मोंगलांचा धिंगाणा चालूच होता. दर्याखान रोहिला खानदेश वैराण करीत होता. आता निजामशाहींत पुन्हा आलेले शहाजीराजे निजामशाहाच्या हुकुमाने त्याच्याशीं झुंजत होते.[५] मोंगल सरदार खानजहान लोदी हाहि शाहजहानविरुद्ध बंड करून निजामशाहींत आला होता. निजामशाहाने त्याला बीड परगणा जहागीर दिला होता. पण त्यामुळेच बीड भागांत लढायांचा धुमाकूळ उडाला होता. शहाजीराजे दर्याखानाशीं लढत होते. प्रत्यक्ष शाहजहान स्वतः दक्षिणेंत निघण्यासाठी या वेळीं आग्र्यांत तयारी करीत होता ( इ. १६२९ जून ). इरादतखान हा मोंगल सरदार बीड परगण्यांत लोदीवर हल्ले करीत होता.[६] लखूजी जाधवराव मात्र मोंगलाईतून पुन्हा निजामशाहींत आले होते.

आणि शके १५५१ च्या वैशाखांत ( इ. १६२९ एप्रील—मे ) कांही काळ शहाजीराजे घरीं आले. जिजाबाईला फार आनंद झाला. क्वचितच ते घरीं येत. सारें आयुष्य रणांगणावर चाललें होतें. संसार हा असा धावत पळत चालायचा. केवळ मनांतच पूजा करण्यांत जिजाबाईने समाधान मानावें. राजे आले. शहाजीराजांच्या सेवेंत जिजाबाई चूर झाली. शिवशंभू, भवानीदेवी आणि शहाजीराजे यांच्याशीं ती सर्व मनोव्यथा विसरून एकाग्र झाली. तिघांच्या पायाशीं ती एकच मागणें मागत होती! तो महिना ज्येष्ठाचा होता. शिवगंगाधर प्रसन्न होता! जगज्जननी प्रसन्न होती! शहाजीराजे प्रसन्न होते!

ज्येष्ठाचे दिवस रामायणाच्या अध्यायाप्रमाणे उलटत गेले. ज्येष्ठ संपला. आषाढ सुरू झाला. जिजाबाईच्या मुखावर कसलें तरी विलक्षण तेज झळाळूं लागलें![७] आनंद लाजूं लागला!

झोपाळ्याच्या साखळ्या किणकिणूं लागल्या !
समयांच्या सर्व ज्योति उजळल्या !
देवघरांतल्या देवीच्या मुखावर हास्य उमललें !
तिच्या परिवारांतील चाणाक्ष बायकांनी ओळखलें !
शहाजीराजांना समजलें ! जिजाबाईचे डोळे बोलूं लागले !
जिजाबाईला डोहाळे लागले ! डोहाळे लागले !
वृक्षवेली अंगणांत फुलांचे सडे शिंपूं लागल्या !
झिम् झिम् वरसात बरसूं लागली !

शहाजीराजे आनंदले. जिजाबाईच्या वागणुकींत फरक पडूं लागला. वेगळेंच तेज चढूं लागलें. 'नवीन नवीन इच्छा, आवडी उमलूं लागल्या.' भवतीच्या मायबहिणी तिला मायेने पुसूं लागल्या, मुली तुला काय काय हवें ?

स्वातंत्र्य हवें ! पराक्रम हवा ! अपमानांची भरपाई हवी !
तिने न दिलेलीं हीं उत्तरें तिच्या डोळ्यांत तळपत.


जिजाबाईला वृद्ध कारभाऱ्यांच्या हातीं सोपवून शहाजीराजे पुन्हा स्वारीवर निघाले. त्यांनी बीडकडे लगाम वळविला.

जिजाबाईच्या सेवेंत आतापासून सारींजणें मग्न होऊं लागलीं. तिचें कोडकौतुक करायला तिच्या परिवारांतील स्त्रिया नेहमीच तत्पर होत्या. आता त्या जास्तच आतुरल्या. कारभाऱ्यांचे कान आज्ञा ऐकायला टवकारले गेले.

पण जिजाबाईचे हे डोहाळेच विलक्षण ![१] तिला मेवामिठाई नको होती. मस्कती डाळिंबें नको होतीं. सुगंधी सरबतें नको होतीं. गुलाबपाण्याचा शिडकावा नको होता. अत्तराचे तुषार नको होते. नौकाविहार, ज्योत्स्नाविहार किंवा उद्यानविहार तिला नको होते. तिचे डोहाळे वेगळेच होते. तिला हत्तीवर बसावेंसें वाटूं लागलें. डोंगरांवरचे किल्ले

चढून जाऊन पाहावेंसें वाटूं लागलें. सोन्याच्या तख्तावर बसावें आणि मस्तकावर शुभ्र छत्र धरवून मोठमोठीं दानें करावींत असें तिला फार वाटूं लागलें. सुंदर चवऱ्या आपणावर ढाळवून घेण्याची हौस निर्माण झाली. उंच उंच ध्वज उभारावेत आणि नौबतीचौघड्यांचा दणदणाट ऐकावा हीच इच्छा तिला सारखी होऊं लागली. धनुष्यबाण, भाला, तलवार इत्यादि शस्त्रें घेऊन आणि अंगावर चिलखत चढवून लढाया कराव्यात अशी विलक्षण लालसा तिच्या मनांत निर्माण झाली. गड जिंकण्याचे आणि मोठमोठे विजय मिळविण्याचे डोहाळे तिला होऊं लागले. पण सर्वांत विलक्षण म्हणजे तिला वाघावर बसावेंसें वाटूं लागलें![१]

प्रजावती दोहदशंसिनी



तुळजाभवानीप्रमाणे ! शस्त्रास्त्रें घेऊन ! खरोखर असे डोहाळे लागावेत पार्वतीलाच, सुभद्रेलाच !

जिजाबाईच्या मस्तकांत कुरुक्षेत्र घुमत होतें आणि महाभारताचे अध्याय फडफडत होते. अभिमन्यूची आई सुभद्रा श्रीकृष्णाकडून चक्रव्यूह भेदण्याची कला गरोदरपणीं शिकली. पण आपल्या मुत्सद्दी कारभाऱ्यांकडून जिजाबाई व्यूह भेदण्याची आणि रचण्याचीहि विद्या शिकत होती.

तिच्या परिवारांतील स्त्रिया तिची फार काळजी घेत होत्या. तिच्या तोंडून शब्द निघायचा अवकाश की, त्या सख्या तो झेलीत. तिच्या मर्जीप्रमाणे प्रत्येक गोष्ट त्या करीत.[१०]

धार्मिक व्रतवैकल्यांत जिजाबाईचें मन रमून गेलें. तिला तिसरा महिना लागला.

* * *

---

**आधारः**—(१) शिवराजचरित्–गागाभट्ट. (२) शिभा ५।७. (३) मरिया १ पृ. ३६. (४) मुघोघइ पृ. १३५. (५) शिभा अ. ६, ७, ८. (८) शहाजी गो. स. स. (७) शिभा ६।९. (८) शिभा ६।१४. (९) शिभा ६।१५ ते १८. (१०) शिभा ६।२०.



## १३ : पुणें पेटलें !

जिजाबाईच्या वाड्यांत आनंदी वातावरण पसरलेलें होतें. व्रतवकल्यें सुरू होतीं. कुलदेवतांची पूजाअर्चा यथासांग होत होती. सांजसकाळ वाडयावर चौघडा वाजत होता. महिना श्रावणाचा होता. श्रावण म्हणजे जलधारांचा, हिरव्यागार गालिच्यांचा, फुलांच्या वृष्टीचा, सणांचा, व्रतांचा, आनंदाचा, हिंदोळ्यांचा महिना. एक एक दिवस पाकळी-पाकळीने उमलत होता. पारिजातक अंगण झाकीत होता. रम्य आकांक्षांचा शुक्लपक्ष होता तो. कलेकलेने चंद्र मोठा होत होता. जिजाबाईच्या आनंदाचा हिंदोळा वर वर चढत होता. श्रावणाची पौर्णिमा उगवली आणि........! आनंदाच्या हिंदोळ्याची दोरी तटकन् तुटली ! भयंकर घात झाला !

वीज कोसळावी तशी ती भयंकर बातमी दौलताबादच्या किल्ल्या-वरून उडाली आणि जिजाबाईच्या वाडयांत येऊन कोसळली ! एकदम आकांत उडाला. चौघडा तसाच थांबला. जिजाबाई दुःखांत बुडाली ! शके १५५१ च्या श्रावण शुद्ध पौर्णिमेच्या सणाच्या दिवशीं जिजाबाईचें माहेर उध्वस्त झालें !

लखूजी जाधवरावांचा सहकुटुंब सहपरिवार मुक्काम दौलताबाद किल्ल्याच्या पायथ्याशीं होता. कुतलघच्या हौदाजवळ जाधवराव मंडळींचा तळ पडला होता. लखूजीराजे स्वतः तेथे होतेच. शिवाय त्यांचीं सर्व मुलें, भाऊ जगदेवराव व पत्नी गिरिजाबाई ऊर्फ

म्हाळसाबाई हीहि तेथे होती. गिरिजाबाई म्हणजे जिजाबाईची आई. यावेळीं सुलतान निजामशाह दौलताबादगडावर होता. सुलतानाच्या कानाशीं कसली तरी भयंकर कुजबूज कांही विषारी जिभा करीत होत्या. पण अगदी गुप्तपणें ! कोणाला चाहूलहि लागूं न देतां !

पौर्णिमेच्या दिवशीं ( दि. २५ जुलै १६२९ ) लखूजीराजे आपल्याबरोबर अचलोजी, रघोजी व यशवंतराव या आपल्या तीन पुत्रांना घेऊन गडावर सुलतानाच्या ' दर्शनास ' निघाले. लखूजीचा फक्त एकच पुत्र बहादूरजी हा आपल्या मुक्कामावर आईपाशी थांबला. चुलते जगदेवराव जाधवरावहि मुक्कामावरच राहिले. लखूजी तिघां मुलांसह निघाले. आता कांही भयंकर प्रकार घडणार आहे याची किंचित्सुद्धा चाहूल त्यांना अन् कोणालाच नव्हती. डोळ्याची पापणी-सुद्धा फडफडलेली नव्हती.

लखूजीराजे गडावर गेले.[३] सुलतानशाह दरबारांत बसलेला होता. नम्रतेने चित्रासारखे स्तब्ध असे अनेक सरदार बाजूला उभे होते. कुणी बोलत नव्हते. कुणी हालत नव्हते. राजे तिघां मुलांसह नम्रतेने शाही महालांत प्रवेशले. भवितव्यतेचें वक्षःस्थल धडधडूं लागलें ! चौघेहि जाधवराव सुलतानाच्या पुढे अदबीने गेले. सुलतान खुनशी नजरेने पाहत मसनदीवर बसला होता. जाधवरावांनी मुजरे घातले. ते मुजरे करीत असतांनाच सुलतान एकदम उठून दरबारांतून आंत गेला.[२] जाधवरावांसारख्या तोलामोलाच्या मातबर सरदाराचा त्याने असा ठरवून मुद्दाम अपमान केला.[४] लखूजींना हा अपमान फार लागला. पण ते कांहीहि न बोलतां मुलांसह तसेच माघारीं फिरले. तेवढ्यांत ....!

सर्र सर्र सर्र सर्र आवाज करीत म्यानांतून तलवारी बाहेर पडल्या ! दरबारांत बाजूला आतापर्यंत चुपचाप उभे असलेले सरदार हमीदखान, मुक्रबखान, सफ्दरखान, फर्रादखान, मोतीखान वगैरे लोक तरवारी

उपसून एकदम जाधवरावांवर धावले. त्यांनी झटकन् जाधवरावांवर झडप घातली! पण जाधवरावांची ती तेज औलाद उफाळली. चौघां जाधवरावांनी कट्यारी उपसल्या. हमीदखान, फर्रादखान वगैरे सरदार सपासप घाव घालूं लागले. दगाबाजांच्या आरोळ्यांनी शाही महाल दणाणला. भरदरबारांत चकमक झडूं लागली. मारेकऱ्यांनी गर्दी केली. रक्ताच्या धारा उडूं लागल्या. सुलतान आंतल्या बाजूस 'निकालाची' वाट पाहात होता. एकदम बेहोष ओरडा उठला! निकाल लागला! लखूजी, अचलोजी, रघूजी आणि यशवंतराव या चौघांचींहि प्रेतें खांडोळ्या उडून रक्ताच्या सरोवरांत पडलीं![2] जाधवरावांचा निकाल

*जिजाबाईचें माहेर भरदरबारांत कापलें गेलें..*



लागला ! जिजाबाईचें माहेर निकालांत निघालें !

बादशाह निजामशाह खूष झाला. ठरवून केलेला डाव फत्ते झाला. हा निजामशाह अत्यंत विषयासक्त होता. जनानखाना व दारू यांतच तो बुडालेला असे.[१] त्याला अक्कल तर गुंजभरहि नव्हती.[१] त्याच्या सभोवती बदसल्लागारांचा विळखा सदैव पडलेला असे.[१] हमीदखान हा त्या बदसल्लागारांचा मेरुमणि होता. हा हमदिखान अगदी भिकार लायकीचा इसम होता. त्याची बायको बादशाहासाठी खास कुंटणखाना चालवीत होती. नवीन नवीन बायका आणि गलिच्छ व्यसनें बादशाहाला पुरविण्याचें काम हमीदखानाची बायको करीत असे. आणि तिच्याच खास वशिल्यानें हमीदखान दरबारांतला मोठा सरदार बनलेला होता. बादशाहाला तो अगदी बिनचूक बदसल्ला देत असे. आताहि त्यानेच निजामाला गुप्त सल्ला दिला होता की, हा मराठा लखूजी जाधव महा हरामखोर आहे. त्याला मारा ! ठार मारा ![५] बादशाहानें मान डोलविली. लगेच तयारी झाली. मारेकरी नेमले गेले. आणि........

जिजाबाईची आई आणि भावजया विधवा झाल्या ! वास्तविक हे जाधवराव म्हणजे देवगिरीच्या यादव सम्राटांचे वंशज. देवगिरीच्या सिंहासनाचे औरस वारसदार. पण त्याच सिंहासनावर बसलेल्या उन्मत्त सुलतानाला नम्रतेनें मुजरे करतां करतां या देवगिरीच्या औरस वारसदारांचा प्रेतें तख्तापुढे रक्ताच्या थारोळ्यांत बेवारस होऊन पडलीं ! लखूजींना सफ्दरखानानें ठार केलें आणि तिघां मुलांना इतरांनी कापून काढल.[२] बादशाहाची इमानदारीनें सेवा करायला धावले. ही मिळाली इमानाची किंमत !

लखूजींची कुटुंबीय मंडळी गडाखाली कुतलघच्या हौदापाशीं होतीं. त्यांना गडावर झालेला हा भयंकर प्रकार समजला. गिरिजाबाईला आपला पात आणि तीन पुत्र ठार झाल्याचें समजलें. पण रडायलाहि

सवड नव्हती. कारण लौकरच त्यांच्यावरहि सुलतानाचा छापा पडणार हें नक्की होतें. जीव आणि अब्रू वांचविण्यासाठी गिरिजाबाई, बहादूरजी, जगदेवराव वगैरे मंडळी लपत छपत, धावत दौडत शिंदखेडास आली. एका बलाढय, इभ्रतदार शूर मराठ्याची ही वाताहत !

खास बादशाही देखरेखीखाली जिजाबाईचा जन्मदाता बाप आणि तीन भाऊ ठार झाले. तिचें माहेर तिला पूर्वींच बंद झालें होतें. आज पूर्ण उध्वस्त झालें. तिचा शोक व संताप अनावर झाला. तिच्या मस्तकांत धुमसत असलेली सूडाची आग जास्तच भडकली. मस्तकांतून ती आग तिच्या उदरांत उतरत होती. तेथे वाढत असलेल्या गर्भांत उतरत होती. जन्माच्या आधींच तेथे सूडाने मुठी वळल्या जाऊं लागल्या !

जिजाबाईच्या माहेरच्या बायका शिंदखेडास पोहोचल्यावर सती गेल्या. जगदेवराव जाधवरावांना आणि बहादूरजीला त्या एकंदर प्रकारामुळे निजामशाहीची चीड आली. त्यांनी निजामशाही सोडून दिली आणि मोंगलांचे पदरीं नोकरी धरली ! एवढाच बदल !

शहाजीराजांचे आणि लखूजींचें वाकडें होतें. दोघांतील नातेंसंबंधांचे तलवारीखाली तुकडे पडले होते. पण तरीहि शहाजीराजांचे आपल्या सासऱ्यावर प्रेम होतेंच. सासऱ्याचा आणि मेव्हण्यांचा असा घात केलेला पाहून तेहि फार संतापले.[६] त्यांना दुःख झालें. निजामशाहीची शिसारी आली. आणि त्यांनी निजामशाही पुन्हा सोडून जायचें ठरविलें. कुठे जायचें ? तोच तर प्रश्न होता. दुसरीकडे कुठे जायचें ? कोणातरी सुलतानाच्या पदरींच ना ? पण कुठेहि गेलें तरी सुलतान सारखेच होते. या सुलतानांना कोणाचीहि पर्वा नव्हती. साबाजी अनंत नांवाच्या एका अत्यंत चारित्र्यवान् ब्राह्मण सरदाराला पूर्वी निजामशाहाने नाही का हकनाक मारलें ? तो तर असा थोर, पवित्र व निष्ठावंत पण्डित होता की, बादशाहाची अखेरपर्यंत नम्रपणें त्याने सेवाच केली. शीलसम्पन्न तर

असा की, एकदा त्याला भुलवायला गेलेल्या वेश्येनेहि त्याला शरण जाऊन वंदन केलें. पण त्याच साबाजी अनंतावर व्यभिचाराचा खोटा आरोप ठेवून बादशाहाने त्याला हत्तीच्या पायीं दिलें.[७]

शहाजीराजांना हें आठवत होतें. ते विचार करीत होते, थोरामोठ्यांची अशी दाणादाण, तर मग गोरगरिबांचें काय ? त्यांचें दुःख सांगायला तोंड नव्हतें. ऐकायला कान नव्हते.

जिजाबाई भावाभावजयांसाठी आणि बहिणीभावांसाठी टाहो फोडीत होत्या. राजांना हेंहि दिसत होतें.

जाधवरावांच्या हत्याकांडामुळे शहाजीराजे एकदम बिथरले. निजामशाही सोडली तरी मोंगलशाह, आदिलशाह किंवा कुतुबशाह तरी कुठे चांगले आहेत ? गुलामगिरी हेंच साऱ्या दुखण्यांचें मूळ आहे. म्हणून मूळ गुलामीलाच विटलेल्या शहाजीराजांनी एक भयंकर धाडसी बेत आखला. बंड ! नकोच ही हुजरेगिरी, नकोच ही गुलामगिरी ! हे सुलतान नकोत, ही जहागीर नको ! माझा मुलुख, माझे लोक, माझें मनगट, माझी तलवार यांच्यानिशीं बंड पुकारण्याचा धाडसी विचार राजांच्या मनांत उसळला ! बंड ! केवढी धाडसी कल्पना ! बादशाहीविरुद्ध बंड ! आणि खरोखरच शहाजीराजे बंड करून उठले ! ते या वेळी परिंड्या-नजीक होते.[२] तेथून ते संगमनेरास आले. तेथून पुण्यास आले. पुण्याची जहागीर मालोजीराजांचे वेळेपासून त्यांच्याच ताब्यांत होती. राजांचे वाडेहि पुण्यांत होते.[१] हाच मुलुख 'स्वतंत्र' बनला ! तीनशे वर्षांनंतर पहिला दिवस उगवला पुण्यांत 'स्वातंत्र्याचा !' शहाजीराजांनी पुण्याच्या भवतीचा प्रदेश भराभर ताब्यांत घेतला. हा प्रदेश होता विजापूरकर आदिलशाहाचा.

यावेळीं सर्वत्र धामधूम उसळलेली होती. फौजांच्या घोडदौडी लढाया आणि सगळें कांही चालू होतें. राजांनीहि एक असामान्य धाडस

केलें होतें. त्यांच्या पुढे एक काळजी फार मोठी होती. ती म्हणजे जिजाबाईची. उघड्या मुलखांत तिला ठेवणें धोक्याचें होतें. या धामधुमींत आणि धावपळींत तिला ठेवावें कुठे हा मोठा प्रश्नच होता. सुखरूप राहायला बळकट घरटें म्हणजे सह्याद्रीच्या खांद्यावरचा एखादा डोंगरी किल्लाच. राजांना झटकन् एका बुलंद किल्ल्याची आठवण झाली. शिवनेरी !

· किल्ले शिवनेरी ! गड मोठा अव्वल. गडाचा गडकरीहि मोठा बळवंत. शिवाय नात्यांतला. त्याच्या घराण्यांतली दुर्गाबाई ही जिजाबाईची सख्खी जाऊ होती.[९] कै. शरीफजीराजे भोसल्यांची ती बायको. या गडकऱ्यांचें नांव होतें विजयराव सिधोजी विश्वासराव. मोठे चांगले नात्यांतले. विश्वासांतले. प्रेमाचे. राजांनी ठरवलें, जिजाबाईला विश्वासरावांच्याच हवालीं करायचें.[१२] माहेराहूनहि माहेरपण तेच करतील. लाडक्या लेकी-सारखें बाळंतपण करतील.

राजांनी लगेच जिजाबाईच्या रवानगीची तयारी केली. स्वारशिबंदी घेतली. काळ हा असा धिंगाण्याचा. वाटेने जातांना कोठून कोण दौडत येईल आणि कापाकापी करील याचा नेम नव्हता. म्हणून स्वतः राजांनी जातीने तिला गडावर पोहोचवायचें ठरविलें. नारोपंत मुजुमदार, मल्हारभट उपाध्ये, बाळकृष्णपंत, गोमाजी नाईक पाणसंबळ वगैरे अत्यंत विश्वासाचे, हुशार, अगदी घरच्याच मायेचे, वयोवृद्ध कारभारी बरोबर घेऊन[१५] शहाजीराजे जिजाबाईसह शिवनेरीच्या वाटेला लागले. बायकामाणसेंहि तिच्याबरोबर होतीं. बंद मेणे व डोल्या झपझप पावलें टाकीत होत्या. झाडी फार, डोंगरहि दाटीचे, फार काळजीकाळ्याने जावें लागत होतें.

किल्ले शिवनेरी म्हणजे एक मोठा जडावाचा किल्ला. जुन्नर मावळांत असा गड दुसरा नव्हता. पुण्याच्या उत्तरेला सव्वीस कोसांवर भीमा-शंकराच्या पसरलेल्या जटांत आणि नाणेघाटाच्या ओठांत हा गड

वसलेला होता. सभोवती ताशीव कडे, भक्कम तटबंदी, मोठमोठे बुरूज आणि दणकट दरवाजे हें गडाचें बळ होतें. हत्ती दरवाजांतून गडांत शिरतांच उजव्या कड्याच्या टोकावर भवानी शिवाईदेवी उभी राहून गडाला पाठबळ देत होती.

राजांनी मजल दरमजल गडाचा पायथा गाठला. व्याही विश्वासराव सामोरे आले. राजे आणि जिजाबाई गडावर गेलीं. गडाचा हत्तीदरवाजा उघडला गेला. घोडे आणि मेणे दरवाजांतून गडांत प्रवेशले. शिवाई-भवानीपुढे दंडवतें पडलीं. सह्याद्रीवरच्या गार गार वाऱ्याची झुळूक जिजाबाईच्या पाठीवरून हात फिरवून गेली.

राजांनी जिजाबाईला विश्वासरावांच्या पदरीं सोपविलें. ही जडजोखीम त्यांनीहि मोठ्या मायेने स्वीकारली.[१२]

एवढ्यांत पुण्यांत होळ्या पेटल्या! घरादारांच्या होळ्या पेटल्या! शहाजीराजांनी पुण्यांत बंड मांडून भवतीचा आदिलशाही मुलुख मारला हें पाहून आदिलशाह खवळला. वजीर खवासखानाने मोठी थोरली फौज राजांची बंडखोरी मोडून काढण्याकरिता रवाना केली.[२] रायाराव नांवाच्या मराठी सरदाराच्याच हाताखाली ही फौज त्याने पाठविली. आदिलशाही फौजा पुण्यांत घुसल्या. आगी लावीत आणि कत्तली करीत शाही सैनिक थैमान घालूं लागले. शहाजीराजांचे वाडे पेटले. केवढाले वाडे ते. वर्षन् वर्ष तेलपाणी खाल्लेलीं तीं तुळवटें धडाधडा जळूं लागलीं. आगीचे लोळ अन् धुरांचे लोट आभाळांत चढूं लागले. गरिबांची दैना उडाली. आगीच्या ज्वाळा आणि तरवारींचे वार चुकविण्यासाठी ते सैरावैरा ओरडत, किंचाळत, धावत सुटले. तरवारीच्या तडाख्यांत सापडले ते मेले तरी! सुटले, पण अंधारांतून झाडाझुडपांतून लपत धडपडत निसटले त्यांनी जायचें कुठे? खायचें काय? रायारावाने पुण्याच्या भवती असलेली तटबंदी पार पाडून टाकली.[१३] बादशाही घोडेस्वार मोठ्या दिमाखांत

आपल्या फाल्गुनी पराक्रमाची करामत पाहात होते. पुण्याच्या डौलदार वशी सुरुंगाने अस्मानांत उडाल्या. कुंभारवेस, मावळवेस, केदारवेस मांस झडलेल्या भकास कवट्यांप्रमाणें दिसूं लागल्या. असंख्य चिता पटल्या. महंमद आदिलशाहाने आणि वजीर खवासखानाने शहाजीराजांच्या ' स्वराज्याची ' अशी धूळदाण उडवून टाकली.[१६] आणि तीहि एका मराठ्याच्याच हातून! बंडखोरीचें हें प्रायश्चित्त! स्वराज्य हवें नाहीं का? घ्या हें! राजांच्या स्वराज्यावरून रायारावाने अक्षरशः गाढवांचा नांगर फिरविला.[१३] त्याने खरोखरच चार पायांचीं गाढवें आणून नांगराला जुंपलीं आणि पुणें प्रांतांत तो नांगर फिरविला![१३] ही दहशत! त्याने एक लोखंडी पहार जमिनीमध्ये ठोकून ठेवली.[१३] फुटकी कवडी आणि तुटकी वहाण पुण्यांतच टांगून ठेवली! काय याचा अर्थ! याचा अर्थ असा की, लोकहो, बंडखोर शहाजी भोसल्याचें पुणें बरबाद झालें! आता येथे दिवा लागणार नाही! हें स्मशान झालें! बादशाहीविरुद्ध हत्यार उगारलें की त्याचा नतिजा असा मिळतो!

स्वराज्य संपलें! या बातम्या राजांना व जिजाबाईला समजल्या. डोळे घट्ट मिटून एक कडूजहर आवंढा गिळण्यापलीकडे काय करतां येणें शक्य होतें?

विजापुरी सरदार मुरार जगदेव पंडिताने पुण्यांतील मुलकी व लष्करी ठाणें यवतच्या भुलेश्वराचे डोंगरावर नेलें व तेथे किल्ला बनवून[१६] त्याला नांव दिलें, ' दौलतमंगळ. '[१३]

शहाजीराजांचें एक पवित्र बंड जळून गेलें. बळ नसलेलें स्वराज्य टिकावें कसें? पण बादशाहीविरुद्ध एखाद्याने हालचाल केली तर कशी वाताहत उडते आणि फुटक्या कवडीचें अन् तुटक्या वहाणेचें तोरण कसें लटकतें हें सर्वांनाच दिसलें. जिजाबाईलाहि दिसलें. भयंकर दहशत बसली सर्वांना. पण जिजाबाईला? अ–हं! त्वेषाने तिची भिवई वरच चढली!

आणि तेवढ्यांत करुण आरोळ्या उठल्या! 'वांचवा, मला सोडवा! धावा धावा!' अशा आर्त हाका नाशिक पंचवटींत उठल्या! एका रावणाने आणखी एका सीतेला भर दिवसां गोदावरीच्या काठावरून उचललें! पळवलें! नेलें! गोदावरीची जीभ भयाने कोरडी पडली! गोदावरीच्या पवित्र प्रवाहांत स्नानाचें पुण्य संपादण्यासाठी ही तरुण सीता आलेली होती. फार मोठ्या घरची लक्ष्मी होती ती. जिजाबाईची ती प्रत्यक्ष जाऊ होती! शहाजीराजांचा सख्खा चुलतभाऊ खेळोजीराजे भोसले याची ती बायको होती. भोसल्यांच्या घरची एक तरुण स्त्री गोदावरीवर स्नानासाठी येणार आहे, ही पाळत ठेवून मोंगल सरदार महाबतखान याने, ती आल्यावर अकस्मात् तिच्यावर छापा घातला! उचलली! दिंडोरीकडे मोंगल घोडेस्वार तिला घेऊन पसार झाले! जिजाबाईच्या जावेलाच पळवून नेलें!

संतापाने जिजाबाईची दुसरी भिवई वर चढली!

तिच्या भिवयांत धनुष्याचें सामर्थ्य खासच होतें. द्रौपदीसारख्याच सूडाच्या भावना तिच्या हृदयांत जळत होत्या. पण परिस्थितीमुळे द्रौपदी इतकीच ती आज असहाय होती.

अशी विटंबना एखाद्याच खेळोजी भोसल्याच्या बायकोची होत होती काय? अशी विटंबना अवघ्या स्त्रीजातीचीच होत होती. त्याचा हिशेब किती सांगावा?

"किती गुजरिणी, ब्राह्मणी भ्रष्टवील्या।
किती शांमुखी जाहजीं फांकवील्या।
किती एक देशांतरीं त्या विकील्या।
किती सुंदरा हाल होवोनि मेल्या!"

शहाजीराजांपुढे आपला डाव फसल्यानंतर प्रश्नच उभा राहिला. आता पुढे काय? दुसरें काय? नोकरी! बळ नसलेल्या गरुडाने पुन्हा

पिंजऱ्यांतच मुकाट्याने शिरावें. मोंगलांचा सरदार अजमखान याच्या मार्फत त्यांनी शाहजहानकडे अर्ज पाठविला ( डिसेंबर १६२९ ). आणि राजांनी मुकाट्याने मोंगलांची पंचहजारी सरदारी पत्करली.

मोंगलांचाच एक सरदार दर्याखान रोहिला हा शाहजहानच्या विरुद्ध बंड पुकारून दक्षिणेंत मराठवाड्यांत आला होता. या दर्याखानाचाच पाडाव करण्याची कामगिरी राजांच्या वांट्याला आली. शहाजीराजे जिजाबाईचा निरोप घेऊन शिवनेरीवरून दर्याखानावरच्या मोहिमेसाठी निघाले.[१४]

राजे निघून गेले. गडावर राहिली जिजाबाई. शिवनेरीवरून सह्याद्रीची उंच उंच शिखरें आणि अजस्त्र कडे तिला दिसत होते.

ती सह्याद्रीकडे मोठ्या आशेने पाहात होती.

सह्याद्रीहि तिच्याकडे मोठ्या आशेने पाहात होता.

* * *

---

**आधारः**—(१) शिभा ८।२२ ते २५. (२) आघइ पृ. १५५ व ५६. (३) शिभा ८।२६. (४) शिभा ८।२६ व २७. (५) शिभा ८।२८ व २९. (६) शिभा ८।३३ व ४९. (७) मंडळ अह. १८३४ पृ. २१२. (८) शिभा संपूर्ण ५ वा अध्याय. (९) शिभा २।६५. (१०) शिभा ८।१० ते १३. (११) शिभा ८।१६. (१२) शिभा ८।१७ व १८. (१३) शिचप्र पृ. ७० व ७१. (१४) शिभा ८।१८. (१५) चिटणीस बखर. (१६) राजखंड १८ ले. २२. सपत्रें पृ. १०८.

## १४ : उषःकाल

चैत्र शुद्ध प्रतिपदा शके १५५१ पासून झालेल्या संवत्सराचें नांव होतें शुक्ल संवत्सर. पण रंगाने मात्र काळेंच होतें तें. लढायांनी व जाळपोळींनी महाराष्ट्र करपून गेला होता. लखूजी जाधवरावांसारख्यांचे खून पडत होते. तरुण पोरें मरत होतीं. कोवळ्या मुली सती जात होत्या. पुण्याप्रमाणेच इतरहि परगणेच्या परगणे बेचिराग होत होते. शाहजहान दख्खन जिंकण्याकरिता आग्र्याहून जातीने निघाला होता. निजामशाहींत फत्तेखान वजिराचा आणि आदिलशाहींत खवासखान वजिराचा बेताल नाच चालला होता. शुक्ल संवत्सर नव्हे, हें कृष्ण संवत्सरच होतें ! प्रत्येक संवत्सरच काळें होतें. शुक्ल संवत्सराचा हिशेब त्याहून वेगळा नव्हता.

चैत्र आणि वैशाख रखरखीत उन्हांत गेले.

ज्येष्ठ आला. मृग लागला. पण पाऊस पडला आगीचाच. मराठवाड्यांत मोंगलांच्या तोफा आग पाखडीत होत्या. भूमि त्याखाली भाजून निघत होती.

आषाढ आला. गावोगावचे मरीआईचे माळ कडकलक्ष्मीच्या आसुडांखाली कडकडले. डफांच्या तडफडाटाने हादरले. दिव्याची

आवस आली. दिवेलागण मोडलेल्या मुलखाला दिव्याची आवस अन् बिन् आवसेचा दिवस सारखाच. अंधारमय.

श्रावण आला. अश्रूंच्या श्रावणसरी बरसूं लागल्या. गावोगावच्या शिवारांत आयाबाया जमल्या. वारुळाभवती फेर धरून नागोबाला आळवून आळवून त्या म्हणाल्या,

'नागोबादेवा, तूं असा वारुळीं कां? सांबाच्या पिंडीवर विंचू बसलाय! तीनशे वर्षें झालीं. तूं बाहेर ये!'

भाद्रपद आला. मोरगावच्या मोरेश्वरापुढे चिंचवडचा एक गोसावी हट्ट धरून बसला. म्हणाला, 'दीनानाथा एक वेळ तारी रे मोरया!'

घरोघर लोकांनी गौरीगणपति पूजिले. गौरी पूर्वी सोन्याच्या पावलांनी येत. आता ती रीत मोडली. आता येत चोरट्या पावलांनी. चोरट्या पावलांनी त्या आल्या. लेकीसुनांनी माजघराच्या अंधारांत एका वातीच्या उजेडांत त्यांची गुपचूप ओटी भरली. अन् डोळ्यांत पाणी आणून म्हटलें, 'आमची अब्रू राखा! आमच अहेवपण सांभाळा बायांनो!'

आश्विन आला. घटस्थापना सांदीकोपऱ्यांत झाली. कडेकपाऱ्यांत झाली. जिथे जिथे म्हणून तुळजाभवानीचीं ठाणीं होतीं तिथे तिथे आईच्या मखरावर झेंडूच्या फुलांच्या, तिळाच्या फुलांच्या अन् विड्याच्या पानांच्या माळा चढल्या. सह्याद्रीच्या गुहांत, जंगलाच्या पोटांत, झाडांच्या डोल्यांत, तुळजाई, तुकाई, यमाई, शिवाई, शिर्काई बसलेल्या होत्या. तेथे नऊ दिवस व नऊ रात्र दिवे जळले. महारामांगापासून भटाब्राह्मणापर्यंत सर्वांनी आईला साकडें घातलें. गोंधळी वैतावैतागून संबळ वाजवीत नाचले. भुत्ये पोतांचा जाळ अंगाभवती नाचवीत ओरडले, 'उदो अंबे उदो! तुझा उदो उदो!'

अष्टमीला होम झाले. नैवेद्य झाले चिडलेलीं पोरें म्हणालीं, 'अशी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम २४८७६ वि: ...

गुळाखोबऱ्याच्या निवदाने आई न्हाई पावायची ! तिला मुंडकीं हवींत मुंडकीं !' म्हाताऱ्यांनी पोरांना दाबलें !

कोकणच्या महालक्ष्मी अष्टमीच्या रात्रीं घागरी फुंकफुंकून नाचल्या. त्यांच्या उष्ण फुंकरींनी समुद्र उकळूं लागला. त्यांच्या दणदण पावलांनी भुई लाल झाली.

लपत लपत पोरीबाळींनी भोंडला मांडला. चोरट्या आवाजांत गाणीं म्हटलीं. गणेशदेवाच्या कानाशीं त्या काकुळतीने म्हणाल्या, 'माझा खेळ मांडून दे करीन तुझी सेवा ! गुंजावणी डोळ्याच्या टिका, ठुशी, मोहनमाळा आमच्या गळ्यांत नसल्या तरी चालतील रे ! पण आमच्या सौभाग्याचा आणि संसाराचा खेळ मात्र तूंच सांभाळ ! कध्धी कध्धी विस्कटूं देऊं नकोस कुणाला !'

दसरा आला. शिलंगणासाठी घोडीं फुरफुरलीं. पण लगेच खालीं माना घालून उभीं राहिलीं.

कोजागिरी पौर्णिमा आली. तुरळक ढगांआडून धावतां धावतां चंद्र विचारीत होता, 'को जागर्ति ? को जागर्ति ?' कोण जागत आहे ? कोण जागृत आहे ? कोण जागें आहे ?

काय ? कुणीच नाही ?

नाही कसें ? ती पहा, चिडलेली ती एक बाई जागी आहे ! चंद्रा, तुझ्याजवळचें सर्व अमृत जरी तिच्या मस्तकावर तूं वर्षिलेंस तरीहि ती शांत होणार नाही ! तुझ्या अमृताच्याच वाफा होतील !

दिवाळी आली. कसली दिवाळी ? सरणावरती सण सुचावा कसा ? नरकासुर अजून जिवंत होता ना ! दिवाळी आली अंधारांत. गेलीहि अंधारांत.

कार्तिक आला. एकादशीला सारे वारकरी पंढरीला जमा झाले. संसाराचा आणि सत्तेचा ताप विसरून ते वाळवंटांत नाचले. पण

परत फिरतांना त्यांनी त्या वैकुंठीच्या सुभेदाराला त्याच्याच बोलाची आठवण दिली, ‘ परित्राणाय साधूनाम्....! विठ्ठला, लक्षांत आहे का ?’

संक्रांत आली. ती आज तीनशे वर्षे आलेलीच होती. कधी ती तोफेवर बसून येत होती. कधी ती तलवारीच्या पात्यावर बसून येत होती. सगळेच कण्हत होते. कुणी कुणाशीं गोड बोलायचें ? एक तीळ सातजणांत वांटायलाहि तीळभर तरी उल्हास हवाच की ! नव्हता तो.

माघ आला. आंब्याच्या डहाळ्या मोहोरल्या. शिवरात्र आली. जंगमांनी आणि गुरवांनी शंख फुंकून फुंकून घसे कोरडे केले. ब्राह्मणांनी कडकडीत रुद्राच्या धारा धरल्या. आजच्या दिवशीं जर मालोजीराजे हयात असते, तर ते सांबाच्या पिंडीला मिठी मारून बसले असते अन् म्हणाले असते, ‘जगदीश्वरा शिवा ! नको आता अंत पाहूंस ! आमची जिजी गरोदर आहे. आता तूंच माझा नातू होऊन ये ! अवघा त्रस्त मराठी मुलुख तुला हजार हातांनी बोलावतो आहे ! ये ! पृथ्वी हैराण झाली !’

पृथ्वी तापून गेली होती. नद्या रोडावल्या होत्या. ओढे आटले होते. उन्हाळा रणरणूं लागला होता. फाल्गुन सुरू झाला होता. जिजाबाई शिवनेरीवर शिवाईच्या सहवासांत काल क्रमीत होती. तिचे दिवस आता भरत आले होते. गडावर कमान टाक्याच्या उत्तरांगाला कांही खाशा हवेल्या बांधलेल्या होत्या. त्याला सरकारवाडे म्हणत. याच भागांत तिची राहण्याची व्यवस्था विश्वासरावांनी केलेली असावी. पुराण, प्रवचन, देवदर्शन, व्रतवैकल्यें हे तर तिचे आवडते छंद. त्यांची उत्तम व्यवस्था केल्याशिवाय विश्वासराव कसे राहातील ?

शिवनेरीगड अगदी कोंदणांत बसला होता. हिऱ्यासारखा. त्याच्या आठहि दिशांना प्रशांत पवित्र देवस्थानें होतीं. ज्योतिर्लिंग भीमाशंकर, लेण्याद्रींतील गिरिजात्मज गणपति, निमगिरीचा खंडोबा, ओझरचा विघ्नहरि गजानन, ओतूरचे चैतन्यस्वामी, डोंगरावरची तुळजाबाई,

नाणेघाटांतला कुकडेश्वर, लेण्यांतली अंबाआंबिका आणि या सर्वांच्या मध्यावर शिवनेरीगड आणि गडावरची शिवाईदेवी. गडावरून सह्याद्रीचीं गगनाला भिडलेलीं शिखरें दिसत. वाघांनी गजबजलेला तो नाणेघाट, किर्रर झाडीने झाकलेला तो भीमाशंकर आणि तो महाबिकट हरिश्चंद्रगड, जीवधनगड, चावंडगड इत्यादि किल्लेहि आवती-भवतीच होते. किती अवघड अजिंक्य प्रदेश हा. पण तो सुलतानांच्या ताब्यांत होता! हें नित्य दर्शन आणि नित्य टोचणी जिजाबाईला झाल्याशिवाय राहात नव्हती. तिचे डोळे सह्याद्रीचें प्रचंड रूप पाहून आनंदत होते, बुद्धि चकित होत होती, पण अंतःकरण मात्र रडत होतें. असा हा विशाल सह्याद्रि गुलाम असलेला पाहून.

सह्याद्रीच्या हृदयांतून पाझरणारे अमृतप्रवाह गडावरून रम्य दिसत. झाडींतून लपंडाव खेळत येणारी ती मीना नदी, ती अल्लड पुष्पावती, ती खदखदा हसणारी कुकडी अन् ती चपलगति मांडवी चौघीहि गडाच्या भोवताल्र्नच वाहत होत्या. शीतल वारा, गोड पाणी आणि अस्सल मराठी वातावरण, हें गडावरचें वैभव होतें.

गडाच्या चहू अंगांला दाट झाडींत लहान लहान खेडीं वसलेलीं होतीं. जुन्नर हेंच त्यांतलें सर्वांत मोठें गाव. कसब्याचें. त्या खेड्यांतलीं लहान लहान घरकुलें गडावरून मोठीं गोंडस दिसत. रात्रीं गडावरून पाहावें, लहान लहान दीपज्योति काजव्यासारख्या लुकलुकून घरांच्या खुणा पटवीत. रात्रीच्या अंधारांत गडाच्या तटावरून कान टवकारावेत. अन् टाळमृदंगांचा अस्पष्ट झंकार कानीं पडावा. पहाटेला जात्यांची पुसट पुसट घरघर अन् कोंबड्यांची साद कानीं यावी. गडावर एकट्याचेंहि मन रमावें अशी रमणूक होती तेथे.

अन् जिजाबाईच्या भवती मायेच्या सजणींचें कोंडाळें होतें. नारोपंत, बाळकृष्णपंत वगैरे वडिलांसारखे प्रेम करणारे कारभारी होते.

विश्वासरावांसारखा माहेरपण करणारा हौशी किल्लेदार होता. सर्वजण तिची आता फार फार काळजी घेत होते. तिचीं पावलें दिवसेंदिवस मंद मंद पडूं लागलीं होतीं.[२] साहजिकच. सोपें का असतें आईपण? म्हणूनच आईचें मोल पृथ्वीहून अधिक.

जिजाबाईला आता अंगावरचे दागिनेहि जड वाटूं लागले.[३] ताशिणली. तिच्या मुखावर किंचित् फिकटपणा आला.[३]

फाल्गुनाची पौर्णिमा आली. शिवनेरीभवतीच्या गावागावांतून होळ्या पेटल्या. पोरासोरांच्या टिमक्या वाजूं लागल्या. गडावरहि होलिकोत्सव झाला. निदान मराठा गडकरी असलेल्या प्रत्येक गडावर होळीचा सण होत असे.

जिजाबाईला आता फारशी हालचाल करवेना.[३] कुशल व अनुभवी सुइणींनी जाणलें की, आज उद्या एवढ्यांतच........! साऱ्या गडाचें चित्त त्या क्षणासाठी, त्या वार्तेसाठी, त्या साखरेच्या मुठीसाठी अधीरलें होतें. शहाजीराजांसारख्या तोलदार तालेवाराची राणी गडावर बाळंतपणासाठी आलेली. स्वाभाविकच उत्सुकता दाटली.

गडावर आधीपासूनच वृद्ध व जाणत्या सुइणी व उत्तम हातगुणाचे, अनुभवी व विश्वासू असे वैद्य आणून ठेवले होते.[४] ते वैद्य अहोरात्र गडावर असत.[४] जिजाबाईच्या परिवारांतील सगळींच माणसें आता जास्त जागीं राहूं लागलीं होतीं.

गडावर एका सुरक्षित खोलींत बाळंतपणाची सर्व व्यवस्था करण्यांत आली होती.[४] त्या खोलीला आतून पांढरा चुनकळीचा रंग देण्यांत आला होता. भिंतीवर कुंकवाने ठिकठिकाणीं स्वस्तिकें व शुभचिन्हें रेखण्यांत आलीं होतीं. दाराला व झरोक्यांना पडदे लावण्यांत आले होते. दाराच्या दोन्ही बाजूंना मंगलदेवतांचीं चित्रें काढण्यांत आलीं होतीं. खोलींत सतत तेवते दीप ठेवण्यांत आले होते. पाण्याने भरलेले

कलश आणि इतर जरूर त्या त्या वस्तूंचा व औषधांचा संच तयार ठेवलेला होता. खोलींत पांढऱ्या मोहऱ्या टाकण्यांत आल्या होत्या.[४]

आता दाटली होती उत्कंठा !

फाल्गुन वद्य तृतीयेची पहाट झाली. आकाशांतल्या चांदण्या हळूहळू विरघळूं लागल्या. प्रभेचे तीक्ष्ण बाण सोडीत व अंधाराचा विध्वंस उडवीत उषा आणि प्रत्युषा क्षितिजावर आल्या. सगळी सृष्टि उजळूं लागली. बालसूर्याच्या स्वागतार्थ स्वर्गींचे देव जणू पूर्वेकडे ओंजळी भरभरून गुलाल उधळूं लागले. पूर्वा रंगली, वारा हर्षावला. पांखरें आकाश घुमवूं लागलीं. शिवनेरीच्या नगारखान्यांत सनई चौघडा वाजूं लागला आणि अत्यंत गतिमान् सप्तअश्व उधळीत उधळीत बालसूर्याचा रथ क्षितिजावर आला !

घटकांमागून घटका गेल्या. जिजाबाईचें पोट दुखूं लागलें. सुईणींची, कुळंबिणींची, वैद्यांची गडबड सुरू झाली. जिजाबाईने बाळंतपणाच्या खोलींत प्रवेश केला.

विश्वासराव, नारोपंत, गोमाजी नाईक वगैरे सर्वच मायेचीं माणसें जिजाबाईच्या काळजींत व तितक्याच उत्सुकतेंत चूर झालीं. आनंद, औत्सुक्य, भीति, पुन्हा आनंद, पुन्हा काळजी, पुन्हा औत्सुक्य त्या सर्वांच्या मुखांवर आलटूनपालटून उड्या मारीत होतें. एका जागीं त्यांना कसें स्वस्थ बसवलें असेल ? फार फार प्रेमळ माणसें हीं.

उत्सुकता वाढत होती. मागचा क्षण पुढच्या क्षणाला उत्सुकतेने पुसत होता, ‘ काय ? ’

‘ अजून कांही नाही ! ’ पुढचा क्षण उत्तर देत होता.

एकेक निमिष तासासारखें जड जाऊं लागलें होतें.

आणि दारावरचा पडदा हलला. एकदम बाजूला झाला. उत्सुकतेच्या भिवया वर चढल्या. माना उंचावल्या. बातमी हसत हसत ओठावर आली.

काय ? काय ? काय ?

मुलगा !

मुलगा ? मुलगा ? मुलगा ! ! मुलगा ! ! ! ( दि. १९ फेब्रु. शुक्रवार १६३० इ. ).

आणि किल्ल्यावर आनंदाचा कल्लोळ उडाला ! वाद्यें कडाडूं लागलीं. संबळ झांजा झणाणूं लागल्या. गडावरच्या नगारखान्यांत सनई चौघडा झडूं लागला. नौबत सहस्रशः दणाणूं लागली.[५] नद्या, वारे, तारे, अग्नि, सारे आनंदले.[५] तो दिवस सोन्याचा ! तो दिवस रत्नांचा ! तो दिवस कौस्तुभाचा, अमृताचा ! छेः हो, छेः छेः छेः ! त्या दिवसाला उपमाच नाही ! शुभ ग्रह, शुभ नक्षत्रें, शुभ तारे, शुभ घटका, शुभ पळें, शुभ निमिषें तो शुभ क्षण गाठण्यासाठीच गेलीं तीनशे वर्षे शिवनेरीच्या भवती घिरट्या घालीत होतीं ! आज त्यांना नेमकी चाहूल लागली ! आज तीं सर्वजणें जिजाबाईसाहेबांच्या सूतिकागृहाच्या दाराशीं थबकलीं, थांबलीं, खोळंबलीं, अधीरलीं आणि पकडलाच त्यांनी तो शुभ क्षण ! तीनशे वर्षांनंतर ! तीनशे वर्षांनंतर ! कोणत्या शब्दांत त्या सुवर्णक्षणाचें मोल सांगूं ? अहो तें अशक्य ! केवळ शतकाशतकांनीच नव्हे, युगायुगांनीच असा शुभ क्षण निर्माण होतो. त्याचें मोल अमोल ! शालिवाहन शकाच्या १५५१ व्या वर्षीं, शुक्लनाम संवत्सरांत, उत्तरायणांत, फाल्गुन महिन्यांत, वद्य तृतीयेला, शिशिर ऋतूंत, हस्त नक्षत्रावर, सिंह लग्नावर, शुक्रवारीं, सूर्योदयानंतर ३० घटका आणि ८ पळांनी, अखिल पृथ्वीच्या साम्राज्याचें वैभव व्यक्त करणारे पांच ग्रह अनुकूल व उच्चीचे असतांना जिजाबाईसाहेब आईसाहेबांच्या उदरीं शिवनेरी किल्ल्यावर पुत्र जन्माला आला ![६]

शुक्ल संवत्सराने आपलें नांव सार्थ केलें ! उगीच त्याला ' काळें ' म्हटलें ! शुक्ल संवत्सर ! शुभ संवत्सर ! शिव संवत्सर !

गडाचें तोंड साखरेहून गोड झालें. आईसाहेबांच्या महालापुढे पखालींतून आणि घागरींतून धो धो धबधबलेलें पाणी बारा वाटा वाहत निघालें. खळाळणारा ओघ वेशीला आला! ओघ वेशीला आला, पुत्र कोणाला झाला? पुत्र जिजाबाईसाहेबांना झाला! पुत्र शहाजीराजांना झाला! पुत्र सह्याद्रीला झाला! महाराष्ट्राला झाला! भारतवर्षाला झाला! प्रत्येक जलौघ वळसे घेत घेत दिल्लीच्या, विजापूरच्या, गोव्याच्या, मुरूडजंजिऱ्याच्या आणि गोंवळकोंड्याच्या वेशींकडे धावत होता, तेथल्या मग्रूर सुलतानांना बातमी सांगायला, की, आला आला! सुलतानांनो, तुमचा काळ जन्माला आला! तुमच्या आणि तुमच्या उन्मत्त तख्ताच्या चिरफळ्या उडविण्याकरिता कृष्ण जन्माला आला!!

शहाजीराजांकडे बातमीची साखरथैली रवाना झाली. या वेळीं राजे दर्याखान रोहिल्याशीं लढण्यांत गुंतले होते.[७]

गडावर शीतल व सुगंधी वारे वाहूं लागले. गडाच्या परिसरांतील खेड्यापाड्यांत ही पुत्रजन्माची बातमी पसरली. थोर मनाच्या शहाजीराजांना व तितक्याच थोर हृदयाच्या जिजाबाईसाहेबांना पुत्रलाभ झाला हें समजल्यावर जुन्नरमावळ आनंदलें.[५]

बाळंतिणीच्या खोलींत आता कुळंबिणींची व सुइणींची धांदल उडून गेली. गुडघ्यापोतर ओचे खोवून आणि आडवा पदर कमरेला खोचून त्या कामें करीत होत्या. बाळंतिणीचे सर्व उपचार सुरू झाले होते. त्या मराठमोळ्या आयाबाया आईसाहेबांना फुलासारखे सांभाळीत होत्या. बाळ जन्माला आल्यावर आईसाहेबांच्या भवती त्या जमल्या. छेः! दंडाचीं लुगडीं नेसणाऱ्या त्या गरीब बाया म्हणजे सुइणी, कुळंबिणी नव्हत्याच! मग कोण? त्या होत्या जणू प्रत्यक्ष नीति, धृति, कीर्ति, भक्ति, शक्ति, विद्या आणि प्रीति![९] मराठमोळ्या वेषांत या

देवताच जणू बाळाच्या भवती मूर्तिमंत उभ्या होत्या.


कारभाऱ्यांची आनंदाने धांदल उडाली. त्यांनी वेदशास्त्रसंपन्नांना बोलावून आणलें. त्या वेदमूर्तींनी बाळाला शुभ आशीर्वाद दिले. स्वस्तिवाचन केलें.[९] नंतर सुइणींनी बाळ-बाळंतिणीला कढत पाण्याने न्हाऊं घातलें.[१०]

कारभाऱ्यांनी मग जाणत्यानेणत्या हुषार ज्योतिष्यांना बोलावून आणलें. सन्मानाने त्यांना सदरेवर बसविलें. त्यांच्याभवती सर्व वडीलधारी मंडळी बसली. जणू लहानशी सभाच बसली.[११] मंडळींनी ज्योतिषीबुवांना बाळाची कुंडली मांडण्याची विनंती केली. ज्योतिष्यांनी मखर आखीत ' श्रीगणेशाय नमः ' केलें. मोठ्या चिकित्सापूर्वक, चौकस गणिताने त्यांनी नवग्रहांची स्थापना ज्याच्या त्याच्या घरांत केली. कुंडली मांडली. ती कुंडली अशी[१२]—

॥ श्रीगणेशाय नमः ॥

शुभं भवतु. स्वस्ति श्रीशालिवाहननृप शके १५५१ फाल्गुन वद्य ३, शुक्लनाम संवत्सर, शुक्रवार, हस्त नक्षत्र, शिशिर ऋतु, सिंह लग्न, कन्या रास, सूर्योदयात् घटी ३०, पळें ८, पुत्रजन्म.

॥ जन्मलग्नकुंडली ॥




॥ शुभं भवतु ॥

सिद्ध झालेली कुंडली हातीं घेऊन त्यांनी अवलोकिली. त्या ज्योतिष्यांचें चित्त आश्चर्यमुग्ध होऊन गेलें. प्रातःकालच्या प्रफुल्ल कमलपुष्पाप्रमाणे आनंदित होत्साते ते विद्वद्वर्य आपल्या सन्मुख बसलेल्या मंडळींप्रत माना डोलावीत डोलावीत सांगते झाले[१३]—

" महाजनहो ! पृथ्वीचें भाग्य उदेलें ! अति थोर सौभाग्यमुहूर्तावर हा कुमार जन्माला आला आहे ! याची कुंडली अत्यंत मोठया अशा भाग्ययोगांनी परिप्लुत आहे. अहो, हा सुपुत्र दिग्विजय करील ! हा परम साहसें करील ! आपली कीर्ति दिगंताला पोहोचवील ! हा आपल्या सत्तेंत गिरिदुर्ग, जलदुर्ग, वनदुर्ग, स्थलदुर्ग ठेवील ! श्रांत पृथ्वीस शांत करील ! सकल भूमीचे ठायीं हा सुपुत्र यशकीर्तिप्रताप–महिमा वाढवून चिरंजीव होईल ! "

हें शुभ भविष्य ऐकून कारभाऱ्यांच्या माना डोलल्या. मुद्रा आनंदल्या. त्यांना धन्य धन्य वाटलें. ओंजळी भरभरून दक्षिणा देऊन त्या ब्राह्मणांची त्यांनी संभावना केली. इवलेलेसें बाळ तें ! त्याला अजून धड रडतांसुद्धा येत नव्हतें. पण त्याच्याकडून अपेक्षा केवढ्या मोठ्या ! आईसाहेबांच्या सौम्य मातृदृष्टींतहि त्याच अपेक्षा दाटलेल्या होत्या.

मुठी वळीत बाळाने पहिला टाहो फोडला ![५]

दुसरा दिवस उगवला. देवधर्म, पूजाअर्चा, दानें, व्रतें चालूच होतीं.[१४] परंपरेप्रमाणे उपाध्यायांनी बाळंतघरांत गणपति, जीवंतिका, विष्णु वगैरे देवदेवतांची पूजा केली. आईसाहेबांबरोबरच शिवनेरीवर आलेले मल्हारभट आर्वीकर उपाध्ये तेथे होते.[१५] हे आर्वी मुद्गलचे मल्हारभट शिवाजीराजांचे पिढीजात उपाध्ये होते. राजोपाध्ये. राजोपाध्ये होते. राजाहि होता. फक्त राज्य हवें होतें !

पांचव्या दिवशीं धनुष्यबाण, तलवार वगैरे हत्यारें बाळंतघरांत


पूजण्यांत आलीं. बाळाच्या पांचवीला तलवार पुजली ![१५] नांगरहि पुजला.[१५] सहाव्या दिवशीं सटवाईची पूजा झाली.[१५] ललाटीचा लेख तर ब्रह्मदेवाने केव्हाच लिहिला होता !

आठव्या दिवशीं पिशाचें, भुतें, राक्षस, जाखिणी, डाकिणी यांनाहि दूर बाजूस निरनिराळे उतारे टाकण्यांत आले.[१५] मल्हारभटजींनी सर्व देवदेवतांना नमस्कार करून प्रार्थना केली की, बाळाचें रक्षण करा.[१५]

दहाव्या दिवशीं बायकांनी जमून आईसाहेबांना व बाळाला न्हाऊं घातलें.[१०] बाळ मोठा लोभसवाणा दिसत होता.

बारावा दिवस उगवला. आज बाळाचें बारसें होतें. बारसें मोठ्या

*कुणि गोविंद घ्या. कुणि गोपाळ घ्य*



थाटामाटाचें झालें. शिवनेरीगड बाळाचें बारसें जेवला. मानापानाच्या मानकरणी, मायबहिणी, सुइणी, कुळंबिणी जमल्या. पाळणा सजून सवरून बाळाची केव्हाची आतुरतेने वाट पाहात होता.

आईसाहेब पिवळ्या रंगाचें जरीचें लुगडें नेसल्या.[१६] अंगाखांद्यावर त्यांनी नेहमीचे भारदस्त डागिने घातले. त्या खरोखरच आता उषःकालच्या प्रसन्न दिनश्रीप्रमाणे दिसत होत्या.[१६] त्यांनी बाळाला मांडीवर घेतलें. बाळानेहि मोठाच थाटमाट केला होता. जरीचें अंगडें. जरीचें कुंचडें.[१६] मोठा रुबाब होता! कुंचड्याला कडेने मोतीं. मध्यभागीं लावलेलें सोन्याचें पिंपळपान बाळाच्या कपाळावर रुळत होतें. गळ्यांत दृष्टीची पोत आणि सोन्यांत जडविलेलें वाघनख घातलें होतें. त्याला पाचू जडविले होते. शिवाय सोन्याची जिवती बाळाच्या छातीवर विराजली होती. हातांत बिंदल्या व मनगट्या होत्या. पायांत लखलखीत चाळवाळे होते. डोळ्यांत काजळ घातलें होतें. कपाळावर तीट लावली होती.[१७]

सुवासिनींनी बाळाला व आईसाहेबांना ओवाळलें.[१६] बायकांनी बाळाला हातीं घेतलें. कुणी म्हणाल्या गोविंद घ्या! कुणी म्हणाल्या गोपाळ घ्या! साऱ्याजणी उत्सुकतेने आईसाहेबांकडे पाहूं लागल्या. बाळाचें नांव काय ठेवायचें ?

शिवाजी ! शिवाजीराजे ! शिवाजीराजे !

पाळणा हलला. झुलला.वाद्यें वाजलीं. शिवाई डोलली. शिवनेरी हसला. मावळच्या अष्टभुजा अष्टांगना शिवबाला आंदळूं लागल्या. बाळा जो जो ! जो ! जो ! पण शिवबाळा, राजा लौकर लौकर मोठा हो ! जो जो ! जो जो !

बाळाचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला म्हणूनच बाळाचें नांव ठेवलें ‘ शिवाजी. ’[१७]

तीनच अक्षरें, शि–वा–जी ! पण त्यांतील एका अक्षरांत रामायण

साठवलें होतें ! एका अक्षरांत महाभारत साठवलें होतें ! एका अक्षरांत शिवभारत साठवलें होतें ! अन् तीनहि अक्षरांत महान् भारत घडविण्याचें चिरंजीव सामर्थ्य साठविलेलें होतें !

शिवनेरीवर सह्याद्रीच्या कुशींत उषःकाल झाला !

* * *

---

**आधारः**—(१) शिभा. संपूर्ण ५ वा अध्याय. (२) शिभा ६।११. (३) शिभा ६।११ व १३. (४) शिभा ६।१९ ते २५. (५) शिभा ६।३२ ते ३४. (६) जेधे शका; बिआवर व बिकानेर कुंडल्या; शिभा ६।२६; राजखंड ९; बृहदीश्वर शिला. वगैरे. (७) शिभा ६।३७ व ३८. (८) शिभा ६।३५ व ३६. (९) शिभा ६।४० ते ४७. (१०) शिभा ६।५९ व ६०. (११) शिभा ६।८०. (१२) बिआवर व बिकानेर कुंडल्या. (१३) शिभा ६।६४ ते ८०. (१४) शिभा ६।४८ ते ५१. (१५) न्या. पंडितराव बखर. (१६) शिभा ६।६१ ते ६३. (१७) शिभा ६।८१ ते ९०.



# १४ : तुळापूर

शिवनेरीवर शिवबाचा पाळणा आंदोळूं लागला. आईसाहेबांचा आनंद पाळण्यांत झोके घेत होता. अजून शिवबा बाळंतिणीच्या खोलीबाहेर पडलेला नव्हता.[१] अद्याप तो अंधार, ती शेकशेगडी संपलेली नव्हती.


शिवबाची आजी, म्हणजेच जिजाबाईसाहेबांच्या सासूबाई उमाबाईसाहेब या बहुधा यावेळीं येथे असाव्यात असें वाटतें. त्यांनी फक्त तीन महिनेच पूर्वीं ( दि. २६ नोव्हें. १६२९ ) वेरूळच्या घृष्णेश्वराची अभिषेकपूजा तिमणभट शेडगे यांस सांगून त्याबद्दल नेमणूक करून दिली.[२] त्यावरून आजीनें येथे आपल्या नातवाचें आपल्या मांडीवर कौतुक केलें असावें असा तर्क आहे.

घराण्याचे व इतर सर्व धार्मिक रीतरिवाज आईसाहेब मोठ्या आस्थेने पाळीत. त्यांचे उपाध्याय मल्हारभट आर्वीकर हेच शिवनेरीवर असल्यामुळे[३] अधिकच आवर्जून प्रत्येक गोष्ट घडत होती. कारभारी मंडळीहि कशांत उणें पडूं देत नव्हती. उपाध्यायांनी शिवबास सूर्यदर्शन विधिपूर्वक करवण्यासाठी मुहूर्त सांगितला. एका उषःकालीं न्हाऊन, काजळतीट लावून व नवे कपडे लेवून शिवबा सूर्यदर्शनासाठी तयार झाला. आईसाहेबांनी शिवबाला घेऊन अंधारांतून उजेडांत पाऊल टाकलें. शिवबाचें हें पहिलें सीमोल्लंघन. सूर्यनारायण डोंगरामागून पूर्वेस वर वर

येत होता. शिवनेरी किल्ला सोन्याच्या प्रकाशाने सारवून निघत होता. आईसाहेबांनी शिवबाला सूर्यप्रकाशांत धरून त्याला सूर्यदर्शन करविलें.[४] शिवबानें सूर्यदर्शन घेतलें. सूर्यानें शिवदर्शन घेतलें. दोघेहि दिपले !

शहाजीराजे याच वेळीं आपल्या पराक्रमाने दुनिया दिपवीत होते. पण मोंगलांच्याकरिता ! वास्तविक गुलामगिरी न मानवणारा तो मानी सिंह दिल्लीच्या शाहजहानचा पांच हजारी सरदार म्हणून निरुपायाने राबत होता. राजे नूतन पुत्रदर्शनासाठी फार उत्सुक झाले होते. पण मोहिमांच्या मोर्चांतून मोकळीक मिळेल तेव्हा ना ! शिवबाहि आई-साहेबांच्या डोळ्यांमार्फत आतुरतेने वडिलांची वाट पाहात होता.

*शिवनेरीवर... एका सकाळीं...सूर्य आणि शिवबा....दोघेहि दिप*



आणि दर्याखानाचा पराभव करून राजे शिवनेरीकडे दौडले.[५]

शिवबा दिवसेंदिवस मोठा बाळसेदार आणि राजबिंडा दिसत होता. त्याचें तें अंगडेंकुंचडें, वाघनख, वाळे, चाळ, घागऱ्या लावलेली कमरेची साखळी, काजळ, अन् सगळेंच कांही आगळें दिसत होतें.[६] तो मोठा गोड हसे.[६] गोड दिसे. लौकरच त्याने सर्वांना वेड लावलें. आईसाहेबांच्या दासी कुळंबिणी आता आईसाहेबांच्या राहिल्या नव्हत्या. शिवबाने त्यांना केव्हाच जिंकून टाकलें. त्या आता केवळ त्याच्या सावल्या बनल्या.[६] त्याच्या कौतुकांत सर्वजणी भान विसरून जात. त्याचे ते गोल गोल काळभोर डोळे शिंपल्यांत ठेवलेल्या काळ्या करवंदाप्रमाणे हालत डोलत.

शहाजीराजे शिवनेरीवर आले.[७] गडावर गोड गडबड उडून गेली. आईसाहेबांच्या महालांत विशेष आनंद दाटला. शिवबा अलंकृत होऊन वडिलांची वाट पाहात होता. राजे आले. आईसाहेबांनी पदर सावरीत शिवबाला राजांच्या हातीं दिलें. राजांनी प्रेमभराने पुत्रमुख पाहिलें.[७] पुत्रदर्शन घेतलें. ते युद्धमय, रक्तमय, अग्निमय परिस्थितींतून आले होते. त्यांच्या हाताला आणि दृष्टीला तें सुख गुलकंदाच्या गिलाव्यासारखें आनंददायी वाटलें. त्यांना आनंदाने एवढा गहिवर आला की, त्यांनी अपरंपार बक्षिसें, इनामें, दानें, महादानें भराभर सर्वांना दिलीं.[७] ते देतच होते. हत्तीपासून हिऱ्यापर्यंत सर्व आकारांची व प्रकारांची खरात त्यांनी केली.[७] गडावरच्या लोकांना वाटलें जन्माला आला तो केवळ सरदारपुत्र नव्हेच, राजपुत्र !

शहाजीराजांनी चार दिवस गडावर सुखांत काढले.

शाहजहान बादशाह फौजेसह बऱ्हाणपुरांत येऊन दाखल झाला ( दि. १ मार्च १६३० ). मालकच आले! शहाजीराजांनी शिवबाचा व त्याच्या आईचा निरोप घेतला. ते गड उतरले. नोकरीवर दौडत गेले.

दौलताबादेस निजामशाहाने मलिक अंबराचा पुत्र फत्तेखान याला आपल्या बायकोच्या हट्टाखातर मुख्य वजीर नेमलें. वजीरसाहेबांनी वजिरी मिळतांच निजामशाहालाच कैदेंत टाकलें व कैदेंतच त्याचा खून पाडला! हुशेनशाह शाहजाद्याला फत्तेखानाने लगेच गादीवर बसविलें.

शुक्ल संवत्सर संपलें. चैत्र उगवला. उन्हाळ्याने आपली कारकीर्द सुलतानी थाटांत गाजविली. पार पाणी आटवलें. उन्हाळ्याची मुदत संपली. लोक पावसाची वाट पाहूं लागले. पावसाळा आलाच नाही! उन्हाळाच चालू राहिला. पाऊस अजिबात पडला नाही! (इ. १६३० जूनपासून.) शेतकरी आणि गुरेंवासरें हंबरू-हंबरून पावसाला बोलावीत होतीं. पण त्याला पान्हा फुटेना.

असेंच रणरणत वर्ष गेलें. दुसरें वर्ष आलें (इ. १६३१). लोक कमालीच्या आशेने आकाशाकडे डोळे लावून बसले. लोक चिंताक्रांत प्रश्नार्थक मुद्रेने वावरूं लागले. पाऊस पडेल का? पाऊस पडेल का?

नंदीबैलाने याहि वर्षी नकाराची मान हलविली!

भयंकर दुष्काळ पडला! पावसाचा थेंब नाही. दोन वर्षे पृथ्वी पारोशी राहिली. जमीन भेगाळली. विहिरीचे खडक उघडे पडले. चारा नाही. अन्न नाही. उन रणरणतें आहे. खायला कण मिळेनासा झाला. पोरें-बाळें भूक भूक करीत आयांच्या कुशींत मरून पडूं लागलीं.[८] लोक झाडाचा पाला ओरबाडून खाऊं लागले. झाडांचेहि खराटे झाले निवडुंगाचे काटे झाडून लोक निवडुंग खाऊं लागले. इतकेंच काय पण एवढा हाहाःकार उडाला की, लोक भूक भागविण्यासाठी जनावरांचें शेण खाऊं लागले![९] कुत्र्याचें मांसहि!

डोळे, गाल, पोटें खोल गेलेले हाडांचे सापळे भूक भूक करीत रस्त्याने हिंडूं लागले व जागजागीं मरून पडूं लागले.[१०] कांही ठिकाणीं तर लोकांनी माणसांचेंच मांस खाल्लें![११]

अन्नाकरिता भुतें बनलेलीं माणसें कशावर तुटून पडतील याचा नेम राहिला नाही.[१०] काय ही भयंकर स्थिति! तिचें वर्णन करायला चित्रगुप्तहि असमर्थ ठरावा. सुलतानी अपुरी पडली म्हणून का ही अस्मानी महाराष्ट्रावर कोसळली? सुलतानीमुळे पळून लपून जीव आणि अब्रू वाचवतां तरी येत होती. पण या भुकेला कसें चुकवायचें? ती तर पोटांतच शिरून बसली होती.

देशस्थिति पाहात पाहात अहोरात्र तळमळत भटकत निघालेले समर्थ रामाला सांगत होते—

पदार्थ मात्र तितुका गेला। नुसता देशचि उरला।
जन बुडाले बुडाले पोटेविण गेले।
बहु कष्टले कष्टले किती येक मेले।
माणसा खावया अन्न नाही। अंथरूण पांघरूण तेंहि नाही।
कितेक अनाचारीं पाडिलीं। कितेक यातिभ्रष्ट जालीं।
कितेक ते आक्रंदलीं। मुलेंबाळें।
कितेक जिवें घेतलीं। कितेक जळीं बुडालीं।
जाळिलीं ना पुरीलीं। किती येक।
भिक्षा मागतां मिळेना। अवघे भिकारीच जना। काये म्हणावें।
लोकें स्थानभ्रष्ट जालीं। कितेक तेथेंचि मेलीं।
उरलीं ते मराया आलीं। गावावरी।
प्राणीमात्र जाले दुःखी।

एका भाकरीच्या तुकड्यासाठी लोक घरें, घराचीं लाकडें, सोनें मोतीं, भांडींकुंडीं, सर्वस्व विकावयास तयार झाले. पण विकत घेणार कोण? हजारो माणसें गुरांसारखीं मेलीं. हजारो गुरें माणसांसारखीं मेलीं! मोंगलांच्या स्वाऱ्या त्यांतच चालू होत्या. काय उरलें होतें नव्हतें तेंहि लुटून नेलें गेलें. लोक सुजून सुजून मेले.[१२]

आईसाहेबांना हें उपाशी महाराष्ट्राचें दुःख दिसत होतें. आकाशच फाटलें होतें. काय करणार ती माउली?

या हालांतून कोणीहि सुटलें नाहीं. देहूच्या त्या देवमाणसालाहि यांतून मोकळीक नव्हती. तुकोबांची पहिली बायको व एक मुलगा अन्न अन्न करीत तडफडून मरण पावलीं.[१३] तुकोबांचें फार फार प्रेम होतें या दोघांवर. स्वतः तेहि उपाशीच होते. वैतागून ते म्हणाले,

बाईल मेली मुक्त जाली । देवें माया सोडविली ।
पोर मेलें बरें जालें । देवें मायाविरहित केलें ।
माता मेली मज देखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥
बरें जालें देवा निघालें दिवाळें । बरी या दुष्काळें पीडा गेली ।
बरें जालें जगीं पावलों अपमान । बरें गेलें धन ढोरें गुरें ॥

तुकोबांच्या हृदयाला उसासारखा चरक लागला.

हें वर्ष महाराष्ट्राने कसें काढलें हें त्याचें त्यालाच ठाऊक. नांगर जसा जमीन कापीत जातो तसा एक एक दिवस जात होता. चिरडत, मरत वर्ष संपलें. नवीन वर्षाचा मृगराज आला आणि धो धो पाऊस पडून पृथ्वीचा सुगंध घमघमला. सृष्टि न्हाऊन निघाली.

अस्मानी संपली. परंतु सुलतानी कायमच होती. लोकदर्शनासाठी समर्थ रामदासस्वामी भटकतच होते. लोकांच्या वेदना समर्थांच्या डोळ्यांपुढे अन् कानांभवती कल्लोळ करीत होत्या.

“ किती येक धाडीवरी धाडि येती। तया सैनिकांचेनि संहार होती।
किती येक ते ताम्रबंदींत गेले। किती येक माराष्ट्रबंदी निमाले।
किती येक ते छंद ना बंद नाही। किती येक बेबंद ते ठायिं ठायीं।
किती येक ते धान्य लुटूनि नेती। किती येक ते पेंव खणोनि नेती।
किती येक ते पूरिले अर्थ नेती। किती पूरिलीं सर्व पात्रेंचि नेती।
किती येक ते प्राण कर्णोंचि घेतीं। किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती।

किती मोट बांधून ते बूडवीती। पिछोडेच बांधोनि हिरोनि नेती।
किती पोट फाडोनि ते मारिताती। वृथा चोर अर्थाविसी प्राण घेती॥
काये होणार होणार होणार टळेना। पुण्य गेलें रे गेलें रे कांहींच कळेना।
सुडकें पटकर पटकर न मिळे पांघराया।
शक्ति नाही रे नाही रे खोपट कराया।
बायेका लेंकुरें लेंकुरें सांडुनिया जाती।
भीक मागती मागती तिकडेची मरती।
रांडा पोरांच्या पोरांच्या तारांबळी होती।
मोल मजुरी भिकारी होऊनि वाचती।
नदी भरतां भरतां घालुनिया घेती। वीख घेउनी घेउनी उदंड मरती।
अग्नि लावोनी लावोनी जाळोनिया जाती।
मोठी फजीती फजीती सांगावे ते किती।
न्याय बुडाला बुडाला जहाली शिरजोरी।
लोक निलंड निलंड काढुनि नेती पोरी॥"

नद्या, डोंगर, ओढे, अरण्यें, शिवारें ओलांडीत ओलांडीत समर्थ चाललेच होते. कोणत्याहि गावच्या वेशींतून आंत डोकवावें तोंच लोकांचा आर्त विव्हळ कानीं पडे. खरोखर अशी स्थिति होती की—

"रडावे बोंबलावेना। लाथा बुक्क्या परोपरी।
उदंड ताडणें होतीं। दुःख शोक विटंबना।
आधार पाहतां नाही। कैवारी तो असेचि ना।
देहत्याग बरा वाटे। दुःख ब्रह्मांड जाहलें॥"

आणि ओंजळ पसरून समर्थ रामदास रामाला म्हणत,

"किती धरावें धरावें धरावें तें सत्व।
जालीं शरीरें शरीरें शरीरें निसत्व।

दास म्हणे रे भगवंता किती पाहसी सत्व।
काय वांचोनी वांचोनी ने परतें जीवीत्व।"

पण मग यावर उपाय तरी कोणता? की शतकानुशतकें केवळ असेच हाल सोशीत रडावयाचें?

होता. यावर एक उपाय होता. एकमेव उपाय होता. कोणता? स्वतंत्र महाराष्ट्रराज्याची स्थापना! स्वराज्याची स्थापना!

पण त्याकरता 'महाराष्ट्रधर्म' जागा व्हावयास हवा होता ना!

निजामशाही बुडविण्याचा चंग शाहजहानने बांधला होता. त्याने दौलताबाद जिंकण्यासाठी महाबतखानाकडे सर्व अधिकार सोपविले. महाबतखानाच्या मुलाचें नांव खानजमान. तोहि या स्वारींत होताच. आतापर्यंत निजामशाहीच्या विरुद्ध मोंगलांना विजापूरकर महंमद आदिलशाह मदत करीत होता. पण उद्या हे मोंगल आपल्यालाहि बुडवितील हें लक्षांत येतांच आदिलशाहाने मोंगलांच्याचविरुद्ध निजामशाहाला मदत दिली. शहाजीराजांनीहि मोंगलशाही सोडली व पुन्हा निजामशाहींत प्रवेश केला. एकदा सोडून गेलेला सरदार पुन्हा आला तर शिक्षा न करतां निमूटपणें प्रत्येक बादशाह त्याला पदरीं घेई. याचें कारण 'जरूर होती!' नाही तर तोफेच्या तोंडींच दिलें असतें. राजांसारख्या शूराची निजामशाहीला गरज होती.

शाहजहान बादशाह स्वतः मात्र दिल्लीला निघून गेला. कारण त्याची लाडकी पत्नी मुम्ताजमहल ही बाळंतपणांत बऱ्हाणपूर येथे मरण पावली (दि. ७ जून १६३१). हें तिचें चौदावें बाळंतपण होतें. गोहरआरा बेगम ही या बाळंतपणांत जन्मली. शाहजहानने दुःखांतहि दख्खनचा नाद सोडला नाही. महाबतखान व खानजमान हे झुंजत ठेवलेच. शिवाय इतर खूप सरदार त्यांच्या दिमतीला होतेच.

महाबतखानाने दौलताबादला वेढा दिला (दि. १ मार्च १६३३).

शहाजीराजांनी व आदिलशाहीच्या सर्व सरदारांनी दौलताबाद लढविण्याची शिकस्त केली. पण अखेर दौलताबाद पडली व खुद्द निजाम हुसेनशाह व वजीर फत्तेखान महाबतखानाच्या हातीं[१९] लागले ( दि. १७ जून १६३३ ).

निजामशाही बुडाली !

....असें महाबतखानाला व शाहजहानला वाटलें ! पण शहाजीराजांनी एक जबरदस्त डाव मांडला. त्यांनी मुरार जगदेव या विजापूरच्या मोठ्या सरदाराला म्हटलें की,[१४]

" एक निजामशाहीची दौलताबाद राजधानी गेली म्हणून काय झालें ? आपण दुसरा वारस तख्तास उभा करून राजधानी बनवूं. तुम्ही मला मदत करा. आपण मोंगलास हाकलून काढूं ! "

यांत राजांचा केवढा मोठा डाव होता ! एका बादशाहाचें बाहुलें हातीं धरून सत्ता आपल्या हातीं घेण्याचा हा एक महत्त्वाकांक्षी डाव राजांनी मांडला. या नाही त्या मार्गाने सत्ता काबीज करण्याचा राजांचा अनेक दिवसांचा प्रयत्न हा असा चालू होता. शहाजीराजांची राजकीय कामगिरी व योग्यता फार मोठी होती. त्यांच्या या मसलतीस अखेर यश आलें. विजापूरच्या आदिलशाहाने शहाजीराजांना निजामशाही पुन्हा उभी करण्याकरिता मदत द्यायचें कबूल केलें. मुरार जगदेव शहाजीराजांच्या पाठीशीं उभे राहिले. रणदुल्लाखानास व इतर सरदारांस शहाजीराजांच्या मदतीस आदिलशाहाने रवाना केलें.

निजामशाहीपैकी एक मूर्तिजा म्हणून लहानसा वंशज जीवधनच्या किल्ल्यावर कैदेंत होता. शहाजीराजांनी झपाट्याने जीवधनवर जाऊन त्या मुलाला ताब्यांत घेतलें. जीवधनगड जुन्नर तालुक्यांत आहे. राजे मूर्तिजाला घेऊन संगमनेरजवळच्या पेमगिरी किल्ल्यावर आले व झटपट

समारंभ करून राजांनी त्या मूर्तिजाला बादशाह निजामशाह बनवलें ! त्याच्या डोक्यावर छत्र धरलें व स्वतः त्याचे मुख्य वजीर बनले.[१४] राजे वजीर बनले. पुढे तर ते सिंहासनावर स्वतःच बसून त्या मूर्तिजाला मांडीवर घेऊन कामकाज करूं लागले ! त्या मूर्तिजाच्या मागे असलेली शहाजीराजांची मूर्ति म्हणजे एका स्वतंत्र मराठा राजाची मूर्ति होती !

त्यांनी हा डाव मांडलेला पाहून, 'आपण निजामशाही बुडविली !' या आनंदात असलेले मोंगल चिडले.[१६] आणि आता मोंगल विरुद्ध शहाजीराजे असा लढा सुरू झाला. शहाजीराजांनी गेलेला खूप प्रदेश पुन्हा जिंकला !

आईसाहेबांना शिवनेरीवर बसून आपल्या कर्तबगार पतीचें खरें रूप आणि राजकारण दिसत होतें. तें खास अभिमान वाटावें असेंच होतें.

विजापूरचा दरबार आपल्या मदतीस राखण्याचें काम शहाजीराजांचे परममित्र मुरार जगदेव यांनी केलें. शिवाय रणदुल्लाखानाची राजांना फार मोठी मदत होती. तेथील वजीर खवासखान हा या दोघांमुळेच शहाजीराजांना अनुकूल होता.

मुरारपंत विजापूरचे फार मोठे सरदार होते. धार्मिक वृत्तीचेहि तसेच. याच वर्षीं भाद्रपद वद्य अमावास्येला ( दि. २३ सप्टेंबर १६३३ ) सूर्यग्रहण आलें. मुरारपंतांची फार इच्छा होती की, आपण आपली सोन्यारुप्याची तुळा करावी. महादानें द्यावींत.[१५] या सूर्यग्रहणाच्या दिवशींच मुरार जगदेवांनी तुळादान करावयाचें ठरविलें. या समारंभासाठी त्यांनी क्षेत्र निवडलें तेंहि मोठें रम्य होतें. पुण्यापासून दहा कोसांवर भीमा व इंद्रायणी या नद्यांच्या संगमावर वसलेल्या नागरगावीं समारंभ ठरला. मोठ्या प्रेमाने स्वतः वजीरसाहेब शहाजीराजे जातीने नागरगावास आले. पुण्याच्या आसपासचे खूप ब्राह्मण व इतर

पंडित जमा झाले. सोनें, रुपें, धान्यें इत्यादि चोवीस पदार्थांनी मुरारपंतांनी आपली तुळा केली. म्हणजे चोवीस वेळा तुला केली. यादवांचें राज्य बुडाल्यानंतर गेल्या तीनशे वर्षांत वेदघोषांत तुलादान-विधि झाला नव्हता. हाच पहिला !

या चोवीस पदार्थांच्या राशी मुरारपंतांनी दान केल्या. शिवाय गजदान, गोदान, भूदान इत्यादि दानें त्यांनी दिलीं. या समुदायांत सोळा विद्वान् पंडित, एक कवि, एक वैयाकरणी, एक हळेगौड नांवाचा स्थापत्यशास्त्री व इतर विद्वान् होते. सर्वांचा सत्कार झाला. पंतांनी संगमेश्वराचें देऊळ बांधलें. त्यांनी त्यालाहि उत्पन्न दिलें. मोठाच खर्च पंतांनी केला ![१५] शहाजीराजांना हें पाहून मोठा आनंद वाटला.


भीमा-इंद्रायणीच्या संगमावर औदार्याचा, शौर्याचा, पांडित्याचा, कलेचा, शास्त्राचा, राजकारणाचा, महत्त्वाकांक्षेचा एकत्र एकाच पर्वणीवर संगम झाला. सत्कार झाला. शहाण्या मराठ्यांच्या हातीं जरी थोडीशी सत्ता आली, तरीहि ते कसें स्वत्व प्रकट करतात हें या समारंभाने दिसून आलें.

एवढी मोठी तुळा नागरगावास झाली. नागरगावाचें नांव बदल पावलें. नागरगावचें ' तुळापूर ' झालें.

* * *

---

**आधार :—**(१) शिभा ६।९१. (२) राम. दासी अं. ६५ ले. ५. (३) पंडितराव बखर. (४) शिभा ६।९१. (५) शिभा ६।९३. (६) शिभा ६।८१ ते ९०. (७) शिभा ६।९३ ते ९५. (८) तुकाराम गाथा व समर्थ ग्रंथ. (९) गाथा अभंग ८५१. (१०) इ. इं. फॅ. रेकॉर्डस्. (११) शिचसा ५ ले ८२४. १(२) मंडळ इ. वृ. १८३८ पृ. ५०; राजखंड १८ पृ. २९; राजखंड १५ पृ. ४४ व ४६; आघइ पृ. १६२ व १६५; शिभा ८।५२ ते ५६. (१३) पु. मं. लाड-तुकाराम भा. १ ला. (१४) आघइ पृ. १६९. (१५) आघइ पृ. १६९; सपत्रांतील माहिती पृ. १९. (१६) शिचवृसं खं. २ पृ. ७ व ८.



# १५ : शिवनेरी

शिवबा शिवनेरीवर तिळातिळाने वाढत होता. आईसाहेबांचा तो केवळ विसावा होता. त्याला 'शिवबा' म्हणूनच त्या हाक मारीत.[१] त्याचें प्रत्येकजण कौतुक करी. त्याच्या गोजिऱ्या गुटगुटीत बाळशामुळे तो सर्वांचा आवडता झाला होता. दाया आणि दासी त्याला कडेखांद्यावर खेळवीत. तो शिवनेरीवरच्या स्वच्छंद वातावरणांत खेळत वाढत होता. तो रांगूं लागला. असा तुरुतुरु रांगे की वा ![२] त्याच्या पायांतील चाळवाळे रुणझुणत. आईसाहेबांचें मन त्यांतच रमून जाई.[२] आणि एके दिवशीं शिवबाने पराक्रम केला ! रांगत रांगत त्याने घराचा उंबरा आपण होऊन ओलांडला ![३] केवढा पराक्रम ! पहिला पराक्रम ! शिवनेरीवरच्या आपल्या राहत्या घराचा वीतभर उंचीचा उंबरठा दमत धडपडत बाळाने ओलांडला ! ह्या मोहिमेंत शिवबाला बरेच प्रयास पडले.[३] सर्वांना केवढें कौतुक वाटलें !

शिवबा उंबरा ओलांडून अंगणांत रांगूं लागला. अंगणांत त्याची सावली पडूं लागली. शिवबा आपलीच सावली पकडण्यासाठी धावूं लागला ![४] आपलीच सावली कशी सापडावी ? आधीच शिवबाचे तळहात लाल लाल चुटुक होते. रांगूं लागल्यावर तर जास्तच लाल

लाल दिसूं लागले.[५] त्याच्या तळहातावर स्फटिक ठेवला असता तर माणकासारखाच लाल लाल भासला असता.

आईसाहेबांनी शिवबाचें आता उष्टावण केलें.[६]


शिवबा एवढासा होता पण भारी खोडकर होता. आईसाहेबांच्या हृदयांतील अमृत पदराखाली तो पीत होता. थोडें थोडें जेवूंखाऊंहि लागला होता. पण बाळाचें पोट तेवढ्याने भरेना! आईसाहेबांची आणि दायांची नजर मोठ्या शिताफीने चुकवून तो अंगणांतील मऊ मऊ मातीचा बोकाणा भरीत असे.[७] खरोखर मातीची चव कांही न्यारीच! आणि मग दाया ओरडत धावत त्याच्या पाठींत धपाटा घालायला आल्या की चोरासारखा चुप्प बसे![८] पण त्याच्या दायांचें त्याच्यावर अति अति प्रेम होतें. त्या त्याला खोटें खोटें अन् कधी खरें खरें दटावीत,[९] धपाटेहि घालीत.[९] त्याच्याशीं बोबडे शब्द बोलून त्याला बोलायला शिकवीत. दायांनी कांही मागितलें तर खुशाल तो आपल्या गळ्यांतले डागिने काढून त्यांना देऊन टाकी. अन् त्याच्याशीं त्या प्रेमाने खेळतहि.[१०] त्याला कुंदकळ्यांसारखे सुंदर दात येऊं लागले होते. त्याला दात येतांना 'तो' त्रास कितपत झाला हें मात्र माहीत नाही.

शिवबा हसरा आणि खेळकर होता. पण रडायचाहि मोठा जोरदार! विशेषतः पदराखाली दूध पिण्यासाठी आणि हट्ट करण्याची लहर आली म्हणजे.[११] लहानपणीं रडण्याचा सराव असलेला बरा असतो! म्हणजे मग मागावें तें चटकन मिळतें!

शिवबाला हळूहळू पाय फुटले. तो उभा राहूं लागला. पावलें टाकूं लागला. दुडुदुडू धावूं लागला.[१२] आता शिवनेरीचें अंगण अपुरें पडूं लागलें. तो अंगणांत धावे. मातींत खेळायला त्याला फार आवडे. सगळें अंग मातीने माखून घेई. मुठी भरभरून डोक्यावर उधळून घेई.[१३] आणि मग दायांची त्याच्यामागे धावपळ चाले.

शिवबाला खेळायला गडावर लहान लहान खेळगडीहि मिळाले. आईसाहेबांनी त्याला मातीचे हत्ती घोडे दिले. शिवाय गडावर वाड्याच्या अंगणांत कांही मोर आणून सोडलेले होते. शिवबा त्यांचीं पिसें पकडण्याकरिता त्यांच्यामागे धावे. मोराच्या, पोपटाच्या आणि हत्तीच्या ओरडण्याची तो अगदी हुबेहूब नक्कल करी. कोकिळेला तिच्यासारखे ओरडून वेडावणें दाखवी. भुंग्यासारख्या गरगर गिरक्या मारी. दाईच्या पाठीमागून गुपचूप येऊन एकदम वाघासारखी गर्जना करी आणि तिला दचकवी. तर कधी तोंडानेच नगाऱ्यासारखा आवाज करी. इतकेंच काय पण घोड्याच्या खिंकाळण्याचीहि नक्कल करी ! [१५]

*खेळांतले राज्य...आणि राज्याचे खेळ*



शिवबाच्या डोक्यावर मऊ मऊ रेशमासारखीं केसांचीं झुलपें भुरभुरत. दाई टाळ्या वाजवी अन् तो नाचे बागडे.[१६] आपल्या सौंगड्यांबरोबर तो गडावर लपंडाव खेळे. तो वाडयांत कुठेतरी कोपऱ्यांत लपून बसे आणि मित्रांनी त्याला हुडकून काढलें की मोठ्याने हसे.[१७] आंधळ्या कोशिंबिरीचा डावहि रंगे. चेंडू आणि भोवऱ्याचाहि खेळ भोवऱ्यासारखाच घुंगे. मग दाई हाक मारी. मोठ्याने हाक मारी, तरीहि शिवबा खेळांतच दंग झालेला असे.[१५] कधी कधी मग खा म्हटलें तरी खात नसे. पी म्हटलें तरी पीत नसे. अन् नीज म्हटलें तरी निजत नसे.[१५] मग आईसाहेब स्वतः त्याला खेळांतून हाक मारून नेण्याकरिता येत. त्या आल्या की तो दूर पळूनच जाई ![१८]

शिवबा खूप खेळे. खूप हसे. खूप धावे. खूप बागडे. अन् रात्र झाली की आईसाहेबांच्या कुशींत रामाच्या, मारुतीच्या, कृष्णाच्या, भीमाच्या अन् अर्जुनाच्या गोष्टी ऐकत ऐकत गाढ झोपून जाई.

शिवबाच्या भवताली शाळूसोबत्यांचें कोंडाळें गोळा होई. इवल्या इवल्या जिवलगांचा तो गोपाळमेळा शिवबाशीं हसण्या-खेळण्यांत रंगून जाई. ते खूप खेळ खेळत. कधी भोवरा तर कधी लपंडाव. कधी चेंडू तर कधी कांही. त्या बाळांच्या गोड चिवचिवाटामुळे आईसाहेबांचें मनःसरोवर आनंदाने भरून जाई.

एका खेळावरून दुसऱ्या खेळावर तीं चिमणीं पाखरें भुर्कन् जाऊन बसत. शिवबाचा सगळ्यांत आवडीचा खेळ मातीच्या ढिगाऱ्यांवरचा. मित्रांसह तो मातीचे ढिगारे तयार करी आणि त्या ढिगाऱ्यांवर राज्य स्थापन करी ! छेः छेः ! त्यांना मातीचे ढिगारे नाही म्हणायचें हं ! त्यांना 'किल्ले' म्हणायचें ! 'गड' – 'गड' ! या प्रचंड गडांची नाकेबंदी आणि मोर्चेबंदी करणें म्हणजे काय पोरखेळ का होता? तें फार अवघड ! जोखमीचें ! सर्व ढिगाऱ्यांची-चुकलों चुकलों-किल्ल्यांची

जबाबदारी राजांच्या शिरावर पडे ! राजे म्हणजे आपले शिवबा !

आता राज्य करायचें म्हणजे चांगलासा 'शत्रु' हवाच. बिनशत्रूचें राज्य करण्यांत काय चव आहे ? मग 'शत्रू'चीहि निवड होई. दोन्ही सैन्यांत हत्ती–घोडे जमा होत. हल्ल्याची अन् लढाईची तयारी होई. पण एक बेटी अडचण असे. या हत्ती–घोड्यांना स्वतःच्या पायांनी चालतां पळतां येत नसे !!

शिवबाच्या किल्ल्यांवर शत्रु हल्ला चढवीत. लढाई जुंपे, झेंडे फडफडूं लागत. हुकूम सुटत. मोठे मोठे वीर मरून पडत ! फार वेळ मरून पडायची बात नस्से ! शेवटीं जयवाले झेंडा नाचवीत ओरडा करीत.

मातीचे ढिगारे हेंच शिवबाचें राज्य होतें. हेंच त्याचें सिंहासन होतें. शिवबावर खेळांतलें राज्य येत जात होतें. आईसाहेब या बालक्रीडा नित्य पाहात होत्या. फार मोठ्या अपेक्षा त्या मातृदृष्टींत सांठलेल्या होत्या.

हीं बाळें आज फुलपाखरें आहेत; उद्यां गरुड होतील !

* * *

---

**आधारः**—(१) शिचप्रदीप. (२) शिभा ७।८ व ९. (३) शिभा ७।११. (४) शिभा ७।६ व ९. (५) शिभा ७।७. (६) शिभा ६।९२. (७) शिभा ७।१०. (८) शिभा ७।१६. (९) शिभा ७।३३ व १६. (१०) शिभा ७।१७. (११) शिभा ७।५, १३ व १४. (१२) शिभा ७।१७ व २१. (१३) शिभा ७।८ व १६. (१४) शिभा ७।१८. (१५) शिभा ७।२७ व २० ते ३३. (१६) शिभा ७।१७. (१७) शिभा ७।२८. (१८) शिभा ७।३५.



## १६ : शहाजीराजे

शहाजीराजांनी निजामशाहीच्या रक्षणासाठी पराकाष्ठा मांडली. प्रथम तर भीमा आणि गोदावरीच्या दुआबांतील मोंगलांनी जिंकलेला जवळ जवळ सर्व मुलुख त्यांनी परत मिळवला. त्यांच्या या प्रचंड उद्योगाने शाहजहान बादशाह बेचैन झाला. शहाजी, एक मराठा, निजामशाहीच्या नांवाखाली सत्ताधीश बनतो? हें बरें नव्हे! निकर निश्चयाने त्याने आपल्या सरदारांना चढाईचे हुकूम सोडले. तो स्वतः आग्र्यांत होता. ताजमहालचें बांधकाम सुरू झालें होतें.

परिंड्याचा किल्ला निजामशाहींत म्हणजेच शहाजीराजांच्या ताब्यांत होता. हा किल्ला जिंकण्यासाठी महाबतखानाचा पुत्र खानजमान चालून आला. शाहजहानचा पुत्र शाहजादा शुजा खास जातीने दख्खनवर आला. आणि मग मोंगल सेनापति महाबतखानाने बऱ्हाणपूर, जाफरनगर, जालना, बीड, परिंडा अशी प्रचंड आघाडी शहाजीराजांविरुद्ध रांगेत उघडली. तींत फौज, पैसा व युद्धसाहित्य तुफान होतें.

शुजा दक्षिणेंत येतांच महाबतखान व स्वतः शुजा परिंड्यावर खानजमानला मदत करून किल्ला लौकर काबीज करण्यासाठी रवाना झाले. शहाजीराजांनी व विजापूरच्या आदिलशाही सरदारांना परिंड्याच्या सभोवतालचा सर्व मुलुख बेचिराग करून टाकला.

ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २४४७६ वि: ...
क्रमांक १८४ नों. दि: ...

मोंगलांची परिंड्याच्या वेढ्यांत उपासमार होऊं लागली. शिवाय राजांचे मराठी हल्ले चालू झाले. शाहजादा आणि दोन अत्यंत मोठे सरदार अखेर राजांच्या परिंड्यापुढे हरले! त्यांची दैना उडाली आणि मुकाट्याने मान खाली घालून शुजा व महाबतखान परिंड्याहून बऱ्हाणपूरला निघून गेले! या पराभवाने शाहजहान अत्यंत संतापला. त्याने महाबतची कडक शब्दांत हजेरी घेतली. ती वर्मी लागून आधीच रोगजर्जर झालेला हा खान मरण पावला (ऑक्टोबर १६३४).

शहाजीराजांचा दरारा खूपच वाढला. रोज ब रोज राजांची सरशी होत होती. मुरार जगदेव व रणदुल्लाखान इतर आदिलशाही सरदारांसह शहाजीराजांना मनापासून मदत करीत होते. अशाच विजयी दिमाखांत आणखी एक वर्ष गेलें. दरम्यान राजे एकदा थोडा काळ शिवनेरीस गेले व शिवबाला व जिजाबाईसाहेबांना वैजापुरास घेऊन आले.[१]

मुरार जगदेवांनी यापूर्वीच ती जगप्रसिद्ध तोफ 'मुलुखमैदान' परिंड्याहून विजापुरास नेली. नेतांना पंतांना फारच कष्ट पडले. ही तोफ अत्यंत प्रचंड आहे. भीमा नदींतून नेतांना तिची नावच बुडाली. मोठेच कष्ट बाहेर काढतांना पडले. हे पावसाळ्याचे दिवस होते. अखेर हें अतिप्रचंड धूड विजापुरांत आलें. विजापूरच्या पश्चिमेस सर्जे बुरुजावर तिला चढविण्यांत आलें[२] (दि. २२ सप्टेंबर १६३२).

पंत मुरार जगदेव रक्त आणि घाम गाळीत आदिलशाहाची अशी सेवा करीत होते. शहाजीराजांसाठीहि धडपडत होते. पण आदिलशाही दरबारला त्यांच्या सेवेचें काय? कांही झालें तरी अखेर पंत होते काफर! दखनी!

आता स्वतः शाहजहानच शहाजीराजांचा मोड करण्यासाठी निघाला (दि. २९ सप्टेंबर १६३५). आणि तडक दौलताबादेस आला.[२]

शाहजहानने प्रथम विजापुरास आदिलशाहाला असें दमदाटीचें व

तितकेंच आमिषाचें पत्र पाठविलें की, त्यामुळे सगळें पारडेंच फिरलें! तें पत्र असें होतें, ‘ जर तुम्ही शहाजीला मदत करण्याचें बंद न कराल तर याद राखा. आम्ही शहाजीला तर बुडविणार आहोंतच, पण त्याच्याबरोबर तुम्हालाहि बुडवूं. पण तुम्ही आम्हाला मदत कराल तर मात्र शहाजीची निजामशाही तुम्हाला निम्मी देऊं. ’

बाण बरोबर लागला. आणि तेवढ्यांत विजापुरांत भयंकर प्रकार घडला. महंमदशाह आदिलशाहानें मुरार जगदेवांना कैद करून, त्यांची जीभ छाटून, त्यांची शहरांतून धिंड काढली व त्यांचे तुकडे तुकडे करून त्यांना ठार मारलें![४] वजीर खवासखानाचाहि खून पडला व मुस्तफाखान वजीर बनला. हा मुस्तफा शहाजीराजांचा भयंकर द्वेष करीत असे. (मुरारपंत वध ऑक्टो. १६३५.)

पारडें फिरलें. शहाजीराजांचा उजवा हातच तुटला. आदिलशाही फौजा राजांविरुद्ध मोंगलांना मिळाल्या. तुंबळ शत्रु राजांवर उठले. राजांनी मूर्तिजा निजामशाहाला घेऊन माहुलीचा किल्ला गाठला. शिवनेरीवरून त्यांनी शिवबाला आईसाहेबांसह माहुलीला आणलें.

खानजमानने माहुलीला वेढा घातला. आता हा अखेरचा संग्राम!

राजांनी हें आपलें अप्रत्यक्ष स्वराज्य टिकविण्याची शिकस्त केली. त्यांनी पोर्तुगिझांच्या गोरेंदोराला चौलला पत्र पाठवून विचारलें की, मला आणि निजामशाह मूर्तिजाला तुमच्या चौलच्या किल्ल्यांत आश्रय देतां का? फिरंग्यांचा जबाब आला, ‘ नाही ’. म्हणून. उपाय हरले. माहुलीला गळफास पडला.

राजांना अत्यंत वाईट वाटत होतें. इतक्या धडपडीने मांडलेला डाव हातचा चालला. गेल्या तीन वर्षांत त्यांनी व त्यांच्या पदरच्या सर्व मंडळींनी श्रमांची सीमा केली होती.

माहुलीच्या वेढ्यांत खानजमान मोगलांचा सेनापति होता. त्याच्या

मदतीस विजापुराहून मुस्तफाखान वजिराने मलिक रेहान, सिद्दी मर्जान व रणदुल्लाखान यांना पाठविलें होतें. रणदुल्लाखानाला शहाजीराजांबद्दल फार प्रेम वाटे. त्याचें मन फार मोठें होतें. त्याला राजांच्या कर्तबगारीची ही होत असलेली नासाडी पाहावेना.

पण ती थांबवणेंहि त्याच्या हातीं नव्हतें. त्यांतल्या त्यांत त्याने धडपड चालविली. रणदुल्लाने राजांशीं गुप्तपणें बोलणीं चालविलीं. त्याने विजापुरास आपल्या आदिलशाही दरबारांत बादशाहाशींहि बोलणें सुरू केलें व राजांना विजापूर दरबारने आपल्या पदरीं जहागीर देऊन ठेवून घ्यावें अशी खटपट केली. आदिलशाहाने मान्यता दिली. खानजमानने वेढा इतका जारी केला की, अखेर शहाजीराजांनी दुःखी मनाने समशेर टेकविली. माहुलीचे दरवाजे उघडले. मूर्तिजा निजामशाहाला मोंगलांनी ताब्यांत घेतलें.[५] राजे जड पावलांनी गडावरून शिवबा व जिजाबाई-साहेबांसह उतरले. रणदुल्लाखानाने त्यांना आदराने आपल्या तंबूंत नेलें.

निजामशाही बुडाली! म्हणजे शहाजीराजांचे मराठशाहीचे प्रयत्न बुडाले!

शाहजहानने व आदिलशाहाने निजामशाही मुलखाची वांटणी करून घेतली. भीमेच्या उत्तरेचा मुलुख शाहजहानने घेतला, दक्षिणेचा व कोकणांतील मुलुख आदिलशाहाने घेतला शाहजहानने राजांबद्दल एक अट आदिलशाहाला निक्षून घातली की, तुम्ही वाटल्यास शहाजीला आपल्यां पदरीं ठेवून घ्या. पण त्याला महाराष्ट्रांत आजिबात ठेवूं नका! दूरच्या प्रांतांत कुठे तरी ठेवा!

याचा अर्थ स्पष्ट होता. महाराष्ट्रांत व सह्याद्रीच्या सान्निध्यांत ठेवलें तर हा सिंह पुन्हा उठेल! कारण सह्याद्रि अशा सिंहांना फूस देतो!

आदिलशाहाने राजांची भीमा व नीरा यांच्या दुआबांतील जहागीर त्यांच्याकडेच पूर्ववत् ठेवली व शिवाय कर्नाटकांत कामगिरी सांगण्याचें

ग्रा. क्र. ८८५५.

ठरविलें. म्हणजे सह्याद्रीचा संबंध तोडला! जें जें घडेल तें पाहाणें व मान्य करण राजांना भाग होतें.

या सर्व धावाधावींत एक मराठी हाड राजांसाठी फार तळमळत होतें. राजांवर त्याची फार माया जडली होती. त्याचें नांव कान्होजी नाईक जेधे देशमुख. कान्होजी नाईक रणदुल्लाखानाच्या पदरीं चाकरीस होते. त्यांचे कारभारी दादाजी कृष्ण लोहकरे हेहि तेथेच होते. राजांनी कान्होजीचें प्रेम जाणलें. त्यांनी रणदुल्लाखानापाशीं एक मागणें मागितलें,[६]

"खानसाहेब एवढा हा तुमचा माणूस आम्हाला द्या!"

खानसाहेबांनी खुषीने कबूल केलें. कान्होजी जेध्यांना दादाजीपंत लोहकऱ्यांसह खानाने राजांच्या पदरांत घातलें.

राजे रणदुल्लाखानाबरोबर विजापुरास रवाना झाले. ते विजापुरांत पोहचले. ते आतापर्यंत वजीर होते. आज पुन्हा साधे सरदार उरले. दरबारांत आदिलशाहापुढे गेले. आदिलशाहाने त्यांना कर्नाटकांत बेंगळूरला जाण्याचा हुकूम दिला.

राजांनी कुर्निसाताकरिता मान वाकविली.

या वेळी शिवबाचें वय सहा वर्षांचें होतें.

* * *

---

आधारः—(१) मंडळ त्रै. वर्ष व अंक १ पृ. १९. (२) शिचवृंसं २ पृ. १०. (३) आघइ पृ. १६०. (४) आघइ पृ. १७५. (५) आघइ पृ. १७२. (६) जेधे करिणा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २४४७६ वि: लेखनालंकार
क्रमांक १६५४ नों: दि: १२-२-५९

# आधार-ग्रंथ

शिवचरित्राच्या पहिल्या भागांत वापरलेले आधार–ग्रंथ व त्यांचे संक्षेप:

( १ ) वाल्मीकि रामायण.

( 2 ) Epigraphia Indica vol. X X III; Vol; XXV; Vol: X III. ( Epgr. Ind. ).

( 3 ) Bombay Gazetteer Vol. I, Part II ( Bombay Gaz ).

( ४ ) राजप्रशस्ति–हेमाद्रि पंडित ( राजप्र. ).

( ५ ) महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास–डॉ. शं. दा. पेंडसे; (मसांइ.).

( ६ ) ज्ञानखंड, पुणें विद्यापीठ बुलेटीन.

( ७ ) मराठी वाङ्मयाचा इतिहास–ल. रा. पांगारकर ( मवाइ ).

( ८ ) ज्ञानेश्वरी व विवेकसिंधु.

( ९ ) खलजीकालीन भारत–डॉ. सय्यद रिजवी ( खलजीभा ).

(१०) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें. वार्षिक अहवाल ( मंडळ अ. ).

(११) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें. वार्षिक संमेलन वृत्त ( मंडळ संवृ. ).

(१२) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें. वार्षिक त्रैमासिक ( मंडळ त्रै. ).

(१३) राजपुतानेका इतिहास–गौरीशंकर ओझा ( राजइ ).

(१४) बहामनी राज्याचा इतिहास–अनुवादक बा. प्र.मोडक (बराइ).

(१५) मुधोळ घोरपडे घराण्याचा इतिहास–कै. द. वि. आपटे ( मुघोघइ ).

(१६) शिवचारित्र साहित्य खंड १ ते ११–भा. इ. सं. मं. प्रकाशन ( शिचसा ).

(१७) वऱ्हाड प्रांताचा इतिहास–कै. या. मा. काळे (वऱ्हाड इति. ).

( 18 ) Rise of Portuguese Power In India–Danvers ( R. P.P. In India ).

( 19 ) A Forgotten Empire–Robert Sewell ( सीवेल ).

(२०) शिवभारत–कवींद्र परमानंद–संपादक, स. वि. दिवेकर (शिभा).

(२१) शिवचरित्र प्रदीप–द. वि. आपटे–स. वि. दिवेकर ( शिचप्र ). ( जेधे शकावली, जेधे करिणा, शिवार्कोदय, राजव्यवहारकोश, भोसले वंशावली-हीं साधनें शिवचरित्रप्रदीपांत छापलेलीं आहेत.)

(२२) सनदा पत्रें–वाड ( सपत्रें ).

(२३) सभासद बखर–कृष्णाजी अनंत सभासद ( सभासदब ).

(२४) ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड १ ते ४–प्रा. ग. ह. खरे ( ऐफासा ).

(२५) शिवचरित्र वृत्त खंड १–प्रा. पां. भि. देसाई ( शिचवृ ).

(२६) शिवचरित्र वृत्त खंड २–३ प्रा. ग. ह. खरे ( शिचवृ ).

(२७) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें–वि. का. राजवाडे ( राजखंड ).

(२८) तुकारामाचे संतसांगाती–वा. सी. बेंद्रे.

(२९) शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ ते ३ ( शिकापसासं ).

(३०) पुरंदरे दफ्तर भा. ३–कृ. वा. पुरंदरे ( पुरंदरे द. ).

(३१) शिवचरित्र संशोधन वृत्त भा. १-२–प्रा. ग. ह. खरे ( शिचसंवृ. ).

(३२) तुकाराम गाथा व चरित्र–पु. मं. लाड.

(३३) इतिहास संग्रह ऐति. स्फुट लेखक—द. ब. पारसनीस. ( इसंऐस्फुले ).

( 34 ) Boletim Do Instituts, Vasko Da Gama No 68; 1952.

(३५) आदिलशाही घराण्याचा इतिहास—बा. प्र. मोडक (आघइ.)


यांशिवाय संतांचे गाथे, लीळासंवाद, स्थानपोथी, महाराष्ट्राचीं चार दैवतें, गाथा सप्तशती, मासीर उल् उमरा, पेशवे दप्तर जमावविभाग, मराठी रुमाल, शिवशाहीचा लेखनालंकार, सावंतवाडी संस्थानचा इतिहास वगैरे.

* * *

(19) A Forgotten Empire–Robert Sewell ( सीवेल ).
(२०) शिवभारत–कवींद्र परमानंद–संपादक, स. वि. दिवेकर (शिभा).
(२१) शिवचरित्र प्रदीप–द. वि. आपटे–स. वि. दिवेकर ( शिचप्र ).
( जेधे शकावली, जेधे करिणा, शिवार्कोदय, राजव्यवहारकोश, भोसले वंशावली-हीं साधनें शिवचरित्रप्रदीपांत छापलेलीं आहेत.)
(२२) सनदा पत्रें–वाड ( सपत्रें ).
(२३) सभासद बखर–कृष्णाजी अनंत सभासद ( सभासदब ).
(२४) ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड १ ते ४–प्रा. ग. ह. खरे ( ऐफासा ).
(२५) शिवचरित्र वृत्त खंड १–प्रा. पां. भि. देसाई ( शिचवृ ).
(२६) शिवचरित्र वृत्त खंड २–३ प्रा. ग. ह. खरे ( शिचवृ ).
(२७) मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें–वि. का. राजवाडे ( राजखंड ).
(२८) तुकारामाचे संतसांगाती–वा. सी. बेंद्रे.
(२९) शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ ते ३ ( शिकापसासं ).
(३०) पुरंदरे दफ्तर भा. ३–कृ. वा. पुरंदरे ( पुरंदरे द. ).
(३१) शिवचरित्र संशोधन वृत्त भा. १-२–प्रा. ग. ह. खरे ( शिचसंवृ. ).
(३२) तुकाराम गाथा व चरित्र–पु. मं. लाड.
(३३) इतिहास संग्रह ऐति. स्फुट लेखक—द. ब. पारसनीस. ( इसंऐस्फुले ).
(34) Boletim Do Instituts, Vasko Da Gama No 68; 1952.
(३५) आदिलशाही घराण्याचा इतिहास—बा. प्र. मोडक (आघइ.)

यांशिवाय संतांचे गाथे, लीळासंवाद, स्थानपोथी, महाराष्ट्राचीं चार दैवतें, गाथा सप्तशती, मासीर उल् उमरा, पेशवे दप्तर जमावविभाग, मराठी रुमाल, शिवशाहीचा लेखनालंकार, सावंतवाडी संस्थानचा इतिहास वगैरे.

* * *




REFBK-0009875